


**अमेरिकन लोकशाही ?**
अच्युत गोडबोले

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
३१ ऑक्टोबर २०२०
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

## बिहार : तेव्हा आणि आता
राजा शिरगुप्पे

## चक्रव्यूहात अडकलेले नितीश कुमार ?
संपादकीय













MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
www.mkcl.org/mscit
MS-CIT करा आणि डिजिटल युगात स्वावलंबी व्हा!
२१व्या शतकातील
२०० + डिजिटल स्किल्स शिका
Basic IT Awareness
Smart Typing Skills
Daily Life Skills
Office Productivity Skills
Study Skills
Citizenship Skills
Cyber Security Skills
Netiquettes
Ergonomics
Go Green
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
KLiC Tally मध्ये शिका व्हाउचर एन्ट्री, बिलिंग, लेजरचे एकत्रीकरण, GST टॅक्सेशन, इन्व्हेंटरी, ऑर्डर, पेरोल, बँकिंग, ऑडिट, बजेटिंग,....
KLiC Advanced Excel मध्ये शिका विविध फॉर्म्युले, डेटा फिल्टरिंग, भिन्न चार्ट, पिव्होटटेबल्स, डेटा विश्लेषण,....
MKCL Tally with GST
KLiC
Gateway to Knowledge Lit Careers
MKCL Advanced Excel
KLiC
Gateway to Knowledge Lit Careers
www.mkcl.org/join
या लिंकवरून आजच प्रवेश घ्या किंवा नजिकच्या MS-CIT/KLiC केंद्राशी संपर्क साधा.
मिस्ड कॉल नंबर :
022 43661642
MKCL

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
३१ ऑक्टोबर २०२०
वर्ष ७३ / अंक - ११
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : **गिरीश सहस्रबुद्धे**
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा. लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा. लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph. : 020-24451724 /**
**Mob. : 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635
वार्षिक वर्गणी :
**एक वर्षांसाठी : ८०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १६०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २४०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ. /डी. डी. /चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र. **60025586634, IFSC MAHB 0000001, बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. )

# अनुक्रम

४ । संपादकीय
**चक्रव्यूहात अडकलेत नितीशकुमार?**

७ । **बिहार : तेव्हा आणि आता**
राजा शिरगुप्पे

११ । **अमेरिकन लोकशाही?**
अच्युत गोडबोले

१७ । **नोव्हेंबर : दिवस सुगीचे सुरू जाहले!**
विश्वास वसेकर

२३ । **सरकारी धोरणाचा वांदा**
धनंजय सानप

२७ । **इकडे आड, तिकडे विहीर**
अपर्णा दीक्षित

३० । **विज्ञान चळवळीची ताकद, मर्यादा आणि भाबडा विज्ञानवाद**
अनंत फडके

३४ । **भोवंडून टाकणाऱ्या वर्तमानाचा अस्वस्थ करणारा आरसा**
परेश राजश्री मनोहर

३७ । **कृतार्थतेने व कृतज्ञतेने आयुष्य जगलेले विक्रम साराभाई**
दिलीप धोंडगे

३९ । **प्रतिसाद**
**सुभाषचंद्र वाघोलीकर, लखनसिंह कटरे, अशोक बंग, ॲड. नकुल पार्सेकर, विवेक सबनीस**

## संपादकीय

# चक्रव्यूहात अडकलेत नितीशकुमार ?

लोकसंख्या व क्षेत्रफळ या दोन्ही दृष्टींनी मोठ्या असलेल्या भारतातील राज्यांमध्ये बिहारचा समावेश केला जातो. आणि जिथे अधिक गुंतागुंतीचे राजकारण चालते अशा राज्यांमध्येही बिहारचा समावेश करावा लागतो. त्यातही मागील तीस वर्षे तेथील राजकारण बरेच नाट्यपूर्ण राहिले आहे. या नाट्यात काँग्रेसचा वाटा कमी कमी होत गेला आहे, भाजपचा वाटा क्रमाक्रमाने वाढत गेला आहे. मात्र ते नाट्य घडवण्यात प्रामुख्याने सहभाग राहिला आहे तो मूळ जनता दलातून फुटलेल्या तीन पक्षांचा. त्यातील एक पक्ष लालूप्रसादप्रणीत राष्ट्रीय जनता दल, दुसरा नितीशकुमार नेतृत्व करीत असलेला जनता दल युनायटेड आणि तिसरा रामविलास पासवान यांचे नेतृत्व होते तो लोकजनशक्ती पक्ष. १९८९ मध्ये हे तीन मोठे नेते आणि त्यांच्यासोबत जॉर्ज फर्नांडिस व शरद यादव हे आणखी दोन मोठे नेते, एवढे सर्व जनता दलात होते. १९९७ पर्यंत ते बरोबर राहिले. त्यानंतर झालेल्या तीन तुकड्यांपैकी लालूप्रसाद यांचा सर्वांत मोठा व रामविलास यांचा सर्वांत लहान तुकडा होता. उर्वरित तीन नेते समता पार्टी या नावाखाली भाजपसोबत गेले, त्यांच्यातील नितीशकुमार तेवढे आता पक्षात आहेत.

१९९० ते २००५ या पंधरा वर्षांत लालूप्रसाद बिहारच्या सत्तेवर होते आणि त्यानंतरची १५ वर्षे नितीशकुमार सत्तेवर आहेत. त्यामुळे बिहारचे मागील तीस वर्षांचे राजकारण म्हटले की, हे दोन प्रमुख नेते समोर येतात. पंधरा वर्षांच्या लालूप्रसाद राजवटीच्या काळात बिहारची प्रतिमा क्रमाक्रमाने अधिक खराब होत गेली आणि शेवटच्या दहा वर्षांत तर 'जंगलराज' अशी संभावना देशभर झाली. त्यानंतर सत्तेवर आलेल्या नितीशकुमार राजवटीच्या काळात बिहारची प्रतिमा उजळ होत गेली आणि त्यातील आधीची दहा वर्षे तर सुशासनाचे / विकासाचे बिहार मॉडेल अशी संभावना देशभर होत राहिली. मात्र गंमत अशी आहे की, लालूप्रसाद यांच्या बाबतीत भ्रष्टाचार व कुप्रशासन यांची चर्चा होत राहिली, पण त्यांनी सर्व काळ आघाडी केली वा सत्ता मिळवली ती सेक्युलर मानले जाणाऱ्या पक्षांना सोबत घेऊन. याउलट, नितीशकुमार यांनी सत्ता मिळवली ती मुख्यतः भाजपला सोबत घेऊन. मात्र त्यांची अडचण अशी राहिली की, त्यांना स्वतःला सेक्युलर प्रतिमा हवी होती आणि साथसंगत भाजपची घ्यावी लागत होती. शिवाय, तत्त्वनिष्ठ राजकारणी अशी ओळख हवी होती आणि त्याच वेळी व्यवहार्य राजकारण करायचे होते. आश्चर्य म्हणजे, ही कसरत त्यांनी मागील २२ वर्षे केली आहे आणि आतापर्यंत तरी ते त्यात यशस्वी ठरत आले आहेत. त्यांच्या वाटचालीवर ओझरता दृष्टिक्षेप टाकला तर ही कसरत तीन टप्प्यांमध्ये स्पष्ट दिसते.

नितीशकुमार यांचा या संदर्भातील पहिला टप्पा म्हणून १९९७ ते २००४ या सात वर्षांच्या कालावधीकडे पाहावे लागेल. त्या काळात ते जॉर्ज फर्नांडिस व शरद यादव या दोन ज्येष्ठ नेत्यांसोबत भाजपप्रणीत रालोआमध्ये गेले. अटलबिहारी वाजपेयी मंत्रिमंडळात ते तिघेही मंत्री होते. मात्र त्यांच्यात अधिक उजळ व उमदा अशी प्रतिमा राहिली ती नितीशकुमार यांचीच. रेल्वेमंत्री व कृषिमंत्री म्हणून त्यांनी आलटून-पालटून काम केले. एका मोठ्या रेल्वे अपघातानंतर त्यांनी राजीनामा दिला, तेव्हा अनेकांना लालबहादुर शास्त्री यांची आठवण झाली होती. पन्नाशीच्या आत-बाहेर वय असणाऱ्या त्या टप्प्यावर त्यांचे वक्तृत्व व साधेपणा लोकांना विशेष भावणारा होता. शिवाय, त्या वेळी झालेल्या दोन्ही लोकसभा निवडणुकांमध्ये रालोआचे नेतृत्व करणाऱ्या भाजपच्या वाट्याला १८२ पेक्षा कमी जागा आल्या होत्या,

काहीसे उदार मानले जाणारे वाजपेयींचे नेतृत्व होते आणि अडवाणींनी आपला आक्रमकपणा काहीसा कमी केला होता. अर्थात, राजकीय अस्पृश्यता संपुष्टात आणण्यासाठी भाजपने जे प्रयत्न आरंभले होते, त्या रणनीतीचाही तो भाग होता. शिवसेना व अकाली दल यांच्या पाठोपाठ जॉर्ज, शरद, नितीश यांचा पक्ष त्यांना अधिक भरवशाचा पाठीराखा वाटत होता. या सर्व कारणांमुळे, नितीशकुमार यांची लोकप्रियता केवळ बिहारच नाही, तर देशभरातील अन्य राज्यांतही (विशेषतः हिंदी भाषिक राज्ये) वाढली होती. त्यांची प्रतिमा काही प्रमाणात तरी वाजपेयी यांच्यासारखी झाली होती.

नितीशकुमार यांचा दुसरा टप्पा २००५ ते २०१३ हा आठ वर्षांचा म्हणता येईल. २००५ मध्ये दोन वेळा विधानसभा निवडणुका बिहारमध्ये झाल्या. पहिल्या निवडणुकीचे निकाल त्रिशंकू लागले. कोणत्याच आघाडीला बहुमत मिळाले नाही. त्यामुळे औटघटकेचे मुख्यमंत्री बनून नितीश यांनी राजीनामा दिला होता. मात्र वाजपेयी यांनी १९९६ मध्ये असेच औटघटकेचे पंतप्रधान होऊन राजीनामा दिल्यानंतर जशी सहानुभूतीची लाट देशभर आली होती, तसेच काहीसे नितीश यांच्याबाबत बिहारमध्ये घडले. आणि मग काहीच महिन्यांनी झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला सोबत घेऊन ते मुख्यमंत्री झाले होते. त्या वेळी त्यांच्या आघाडीला पूर्ण बहुमत मिळाले होते. परिणामी बिहारमध्ये नव्या बदलाचे वारे वाहायला लागलेय, जंगलराज संपुष्टात येईल, सुशासन अनुभवायला मिळेल, अशा अपेक्षा सर्व स्तरांवर व्यक्त होऊ लागल्या. आणि अर्थातच नितीशकुमार यांनी पहिल्या पाच वर्षांत इतके धडाकेबाज काम केले की, २०१० च्या विधानसभा निवडणुकीत त्यांचा विजय निश्चित मानला गेला. तो प्रचार त्यांना फारच सोपा गेला. त्या वेळी सागरिका घोष यांनी नितीशकुमार यांचा उल्लेख 'अमोल पालेकर ऑफ इंडियन पॉलिटिक्स' असा केला होता. त्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाला ११५ जागा मिळाल्या होत्या आणि भाजपलासुद्धा ९१ जागा मिळाल्या. (२४३ सदस्यांच्या बिहार विधानसभेत) म्हणजे तब्बल ८५ टक्के जागा नितीशप्रणीत आघाडीला होत्या. त्यामुळे बिहारची पुढील पाच वर्षांची वाटचाल बिनधोक होणार हे उघड होते. आता तर नितीश यांच्या मार्गात भाजप कोणतेही अडथळे आणू शकणार नव्हते, कारण नितीश यांच्या पक्षाला एकट्याच्या बळावर सत्ता स्थापन करणे शक्य होणार होते (त्यासाठी त्यांना केवळ सात जागा आवश्यक होत्या.) परिणामी पुढील तीन वर्षांत, नितीशकुमार यांच्या नावाचा व विकासाच्या बिहार मॉडेलचा बोलबाला देश-विदेशात होत होता. तेव्हा विकासाचे गुजरात मॉडेल आणि विकासाचे बिहार मॉडेल, यांची चर्चा मोठ्या प्रमाणात होऊ लागली. शिवाय त्यादरम्यान भाजपला देशभर मरगळ आली होती, खंबीर नेतृत्व केंद्रस्थानी नव्हते.

आणि नेमके या वळणावर नितीशकुमार यांचा तिसरा टप्पा सुरू झाला, तो सात वर्षांचा राहिला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीचे पडघम वाजू लागले होते, काँग्रेसप्रणीत संयुक्त पुरोगामी आघाडीचे दुसरे सरकार कमालीचे भ्रष्टाचार, अकार्यक्षमता इत्यादी आरोपांमुळे अप्रिय ठरत होते आणि ती वेळ साधून भाजपने नरेंद्र मोदी यांचे नाव पंतप्रधान पदासाठी पुढे केले. तेव्हा ते रालोआचे उमेदवार असतील तर आमच्याशी चर्चा का केली नाही, असे कारण सांगून नितीशकुमार यांनी आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय तडकाफडकी घेतला. त्यामागे दोन कारणे उघड होती- एक तर मोदी यांचे विचार, कार्यशैली व गुजरातमधील कर्तृत्व यांच्याशी नितीश यांना नाते सांगणे जड जात होतेच, दुसरे- आघाडीतून बाहेर पडूनही त्यांचे बिहारमधील सरकार काँग्रेस व अपक्ष यांच्या सात सदस्यांच्या पाठिंब्यावर चालू शकणार होते. म्हणजे त्या वेळी नितीश यांनी बिहारच्या सत्तेतून भाजपला बाहेर काढले होते. त्या निर्णयाचे समर्थन करणारे त्यांचे विधानसभेतील भाषण अप्रतिम ठरले होते. त्यानंतर देशातील भाजपविरोधी शक्तींचे नितीश हे मोठे आशास्थान बनले होते. मात्र वर्षभराने झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला पूर्ण बहुमत मिळून नरेंद्र मोदी पंतप्रधान बनणार हे उघड झाले. याउलट जनता दल युनायटेडला लोकसभेत केवळ दोन जागा मिळाल्या. तेव्हा त्या निकालाच्या दुसऱ्याच दिवशी नितीशकुमार यांनी या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारून मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यांनी तसे बोलून दाखवले नाही, पण रालोआतून बाहेर पडण्याचा आपला निर्णय जनतेला आवडला नाही, असे त्यांचे मनोगत असावे. तेव्हा त्यांनी जीतनराम मांझी यांना मुख्यमंत्री केले, पण त्यांच्याशी सूर जुळले नाहीत आणि मग त्यांना हटवून पुन्हा मुख्यमंत्रिपद घेतले. त्यानंतर आठच महिन्यांनी येणारी २०१५ ची बिहार विधानसभा निवडणूक कशी लढवायची हा पेच होता. तेव्हा स्वबळाचा नारा लावण्यापेक्षा लालूप्रसाद यांचा राजद व काँग्रेस यांच्यासोबत महाआघाडी करून त्यांनी

मोदी-शहा यांच्या आक्रमक व विखारी प्रचाराला परतावून लावत सत्ता मिळवली. तेव्हा त्यांनी मोदींच्या भाजपला शह दिला ही कौतुकास्पद बाब होती, पण त्यासाठी त्यांना राजदशी हातमिळवणी करावी लागली होती. ही निश्चितच नामुष्कीची बाब होती, कारण लालूंचे जंगलराज संपवून तर ते सत्तेवर आले होते.

त्यानंतर त्यांना बरीच पडती बाजू घ्यावी लागली, कारण त्यांना ७१ जागा होत्या तर लालूंच्या पक्षाला ८१ जागा होत्या, तरीही मुख्यमंत्रिपद मिळाले होते. साहजिकच उपमुख्यमंत्री लालूपुत्र तेजस्वी यादव यांच्यासोबत जुळवून घेणे त्यांना अधिक अवघड जाणार होते. दरम्यानच्या काळात नितीश यांच्याकडे देशातील काही भाजपविरोधक मोदींना शह देऊ शकणारा नेता व पंतप्रधानपदाचा संभाव्य दावेदार अशा पद्धतीने पाहात होते, पण तो भाबडेपणा होता. स्वतः नितीश यांना बिहार सरकार चालवणे, असह्य बनत चालले होते. कशीबशी २० महिने सरली आणि मग नितीश यांनी पुन्हा एकदा भाजपला बरोबर घेण्याचे ठरवले, ही त्यांच्यासाठी आणखी मोठी नामुष्की होती. त्यानंतरची तीन वर्षे त्यांनी भाजपसोबत सरकार चालवले खरे, पण नरेंद्र मोदींशी सूर जुळलेले नाहीत हे तेवढेच खरे.

वरील तिसऱ्या टप्प्याचा घटनाक्रम पाहता, यातील पूर्ण पाच वर्षे नितीश यांच्यासाठी या ना त्या प्रकारच्या नामुष्कीची होती, अवहेलनेची होती. दोन मोठ्या (लालूप्रसाद व नरेंद्र मोदी) विरोधकांशी जुळवून घेताना त्यांना बराच त्रास झाला असणार, केवळ रणनीती व अपरिहार्यता म्हणून त्यांना ते करावे लागले असणार. राजकारणात कोणीच कोणाचा कायमचा मित्र वा शत्रू नसतो, हे विधान वापरून वापरून गुळगुळीत झाले आहे. पण नितीश यांच्यासाठी त्या दोघांपुरते तरी ते खरे नसावे. असो.

बिहार विधानसभा निवडणूक २०२० चा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला आहे. विद्यमान सत्ताधारी असलेली जनता दल युनायटेड आणि भारतीय जनता पक्ष यांची एक आघाडी आहे. राजद व काँग्रेस यांचा मुख्य सहभाग असलेली दुसरी आघाडी आहे. या दोनच आघाड्यांमध्ये सरळ लढत होईल, अशी शक्यता महिनाभरापूर्वी व्यक्त केली जात होती. मात्र चिराग पासवान यांनी ज्या पद्धतीने व जी भूमिका घेऊन आपला पक्ष या निवडणुकीत उतरवला आहे, ते पाहता चित्र अधिक गोंधळाचे झाले आहे. मुळात त्यांचा पक्ष भाजपप्रणीत लोकशाही आघाडीत असल्याने, तेही या आघाडीत सामील होतील अशी शक्यता होती. मात्र जागावाटपात जुळले नाही म्हणून त्यांनी स्वतंत्र लढायचे ठरवले आहे. त्यात निवडणूक प्रचार सुरू होण्याच्या दरम्यान रामविलास पासवान यांचे निधन झाल्याने चिराग यांच्या बाजूने काहीशी सहानुभूती निर्माण झाली आहे. त्यात भर म्हणजे, जनता दल युनायटेड पक्षाच्या सर्व उमेदवारांच्या विरोधात उमेदवार उभे करणार आणि निवडणुकीनंतर भाजपसोबत सत्तेत सहभागी होणार, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. त्यामुळे भाजपची बी टीम म्हणून चिराग यांच्याकडे पाहिले जात आहे.

२००५ ला नितीशकुमार मुख्यमंत्री झाले तेव्हा याच संपादकीय स्तंभात आम्ही 'तरच ते बिहारला सावरू शकतील' या शीर्षकाचा लेख लिहिला होता. त्यात स्वपक्षातील, सहयोगी पक्षातील व प्रमुख विरोधी पक्षातील एकापेक्षा एक तगड्या नेत्यांचा सामना करू शकले तरच नितीशकुमार बिहारला सावरू शकतील, असे भाकीत केले होते. त्यानंतर लवकरच जॉर्ज यांना असाध्य आजारामुळे निवृत्त व्हावे लागले, लालूप्रसाद आता तुरुंगात अडकून आहेत, शरद यादव यांनी तीन वर्षांपूर्वी साथ सोडली आणि आता इस्पितळात आहेत, पासवान यांचे अलीकडेच निधन झाले आहे. म्हणजे समवयस्क साथी व विरोधक म्हणावेत असे नेते आता नितीश यांच्यासोबत नाहीत. पंधरा वर्षांच्या राजवटीनंतर स्वपक्षावर तेवढी पकड राहिलेली नाही, बिहारी जनतेच्या वाढत्या अपेक्षा पूर्ण करता आलेल्या नाहीत. आता चहू बाजूंनी कोंडीत सापडल्यासारखी त्यांची स्थिती असणार. म्हणजे ते चक्रव्यूहात अडकलेत का, ते भेदून बाहेर येऊ शकतील का? येत्या १० नोव्हेंबरला कळेल...!

***साधना साप्ताहिकाचे यानंतरचे तीन अंक अनुक्रमे बालकुमार दिवाळी अंक (७ नोव्हेंबर), युवा दिवाळी अंक (१४ नोव्हेंबर) व मुख्य दिवाळी अंक (२१ नोव्हेंबर) म्हणून प्रकाशित होतील. त्यानंतरचे तीन अंक (२८ नोव्हे., ५ डिसेंबर व १२ डिसेंबर) वार्षिक सुट्टीमुळे प्रकाशित होणार नाहीत. मात्र साधना कार्यालयाला दिवाळीची सुट्टी १३ ते १७ नोव्हेंबर हे पाच दिवसच असेल. १९ डिसेंबर पासून नियमीत अंक सुरू होतील. ...संपादक***

निमित्त

राजा शिरगुप्पे



# बिहार : तेव्हा आणि आता

बिहारमधील आजच्या निवडणुका या जरी याच भूमिकेतून होत असल्या तरी भारतीय जनता पक्ष नावाचा चाणक्य आता अधिक सावधपणे बिहारमध्ये आपले हात-पाय पसरण्यात यशस्वी झाला आहे. एकंदर परिस्थिती पाहता, त्याला रोखण्यात नितीशकुमार अपयशी ठरताहेत, हेच पदोपदी जाणवते. त्यामुळे या निवडणुकीत नितीशकुमार पुन्हा एकदा कसेबसे सत्ताधारी होतीलही, पण त्यांचे आतापर्यंतचे खंबीर अस्तित्व मात्र या नव्या परिस्थितीत डळमळीत होणार आहे, हे नक्की. ते जुन्या पद्धतीने आपल्या मित्रपक्षांना वेसण घालू शकतील ही गोष्ट आता थोडी अवघड कोटीतील बनत चालले आहे, हे नक्की. पंधरा वर्षांच्या चाणक्यनीतीनंतर नितीशकुमारांना त्याच पद्धतीने पुढील राजकारण करता येईल, याबद्दलच्या सर्व शक्यता अगदी धूसर झाल्या आहेत- किंबहुना, भारतीय जनता पक्ष आता नितीशकुमारांना वेसण घालेल, हीच शक्यता जास्त आहे.

बिहारच्या विधानसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. कोरोना नावाच्या एका जागतिक अरिष्टात सापडूनही त्या रोगापेक्षा भारतीय माणसाला निवडणुकांचा ज्वर जास्त चढतो, याचा प्रत्यय इथेही येतो आहे. भाजपविरुद्ध काँग्रेस, जदयू आणि राजद यांनी २०१५ मध्ये आघाडी केली होती, त्यात एरवी एकमेकांशी शत्रुत्व निर्माण झालेले लालूप्रसाद यादव व शरद यादवही होते. म्हणजेच शरद यादव अध्यक्ष असलेले व नितीशकुमार नेतृत्वस्थानी असलेले संयुक्त जनता दल आणि लालूप्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल आणि काँग्रेस हे भारतीय जनता पक्षाच्या विरोधात महागठबंधन या नावाने एकत्र आले होते. त्यात ते यशस्वी होऊन बिहारचे सत्ताधारीही झाले. नितीशकुमार पुन्हा एकदा मुख्यमंत्री झाले. या मंत्रिमंडळात लालूप्रसाद यांचे चिरंजीव तेजस्वी यादव हे उपमुख्यमंत्री होते.

दि.२६ जुलै २०१७ मध्ये नितीशकुमारनी आपल्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. याचे मुख्य कारण राजदचे लालूप्रसाद यादव व उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्यामागे सीबीआय चौकशी लागल्यामुळे त्यांनी राजीनामा दिला. दुसऱ्याच दिवशी भारतीय जनता पक्षाच्या पाठिंब्याने त्यांनी पुन्हा एकदा बिहारच्या मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. आता आणखी एकदा मुख्यमंत्री होण्यासाठी ते या महिन्यात निवडणुकीला सामोरे जात आहेत.

हे सांगण्याचे कारण नितीशकुमार हे नेहमीच एक गूढ राजकारणी राहिलेले आहेत. बिहारमध्ये तर त्यांचे विरोधक त्यांना 'निळा कोल्हा' म्हणूनच ओळखतात. दहा वर्षांपूर्वी जवळपास निम्मा बिहार मी पायाखाली घातला आहे. प्रवासाची सांगता करताना नितीशकुमार यांना भेटलो. त्यांच्याशी खूप गप्पा मारल्या. त्या वेळी ते मला म्हणाले होते की, मी तर आता 'आउटगोइंग सीएम' आहे. कारण त्यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाचा कालावधी संपला होता आणि आता ते नव्याने निवडणुकांना सामोरे जाण्याच्या तयारीत होते. तेव्हा मी त्यांना म्हणालो होतो, ''एक प्रक्रिया म्हणून जरी तुमच्या विद्यमान मुख्यमंत्रिपदाचा कालावधी संपला असला, तरी पुढचे मुख्यमंत्री तुम्हीच असणार आहात. कारण जेवढा बिहार मी पाहिला आहे, त्यावरून

मला तुम्ही बिहारी माणसांच्या मनात किती रुजलेले आहात, याची खात्री पटलेली आहे.'' माझे बोलणे ऐकून नितीशकुमार माझ्याकडे पाहून हसले आणि मला कवळा घालीत म्हणाले, ''आपके अल्फाज हम याद रखेंगे.''

निवडणुका झाल्या, नितीशकुमारांचा पक्ष भारतीय जनता पक्षाच्या आघाडीबरोबर सत्तेत आला आणि नितीश-कुमारांनी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्याच्या आदल्या दिवशी मला त्यांच्या कार्यालयातून लाइटनिंग कॉल आला. खुद्द नितीशकुमार बोलत होते. त्यांनी मला शपथविधीसाठी निमंत्रित केले. इतक्या अचानक जाण्याची मी माझी असमर्थता व्यक्त केली, त्यांचे अभिनंदन केले आणि त्यांना म्हटले, ''तुम्ही समाजवादी आहात आणि जयप्रकाशजींचे अनुयायी आहात. तेव्हा तुमच्या राजकारणाची दिशा तीच असायला हवी आणि असेल, अशी अपेक्षा करतो.''

हे सगळे आठवण्याचे कारण संपूर्ण भारतात एक विचित्र अशी राजकीय कोंडी निर्माण झाली आहे आणि भारतीय राज्यघटनेपेक्षा सामान्य जनतेला धार्मिक संहिता जास्त महत्त्वाच्या वाटायला लावण्याची सत्ताधाऱ्यांची धडपड चालू आहे. दहा वर्षांपूर्वी मी बिहारमध्ये हिंडत होतो त्या वेळी नितीशकुमार यांच्याबरोबर भारतीय जनता पक्ष सत्तेत होता, पण नितीशकुमारांनी आपल्या चाणक्य शैलीने त्यांच्या मुसक्या बरोबर आवळून ठेवल्या होत्या. सत्ताधारी असूनही ते प्रभावी कसे होणार नाहीत, याची पुरेपूर काळजी घेतली होती. त्याच वेळी आपल्या इतर विरोधकांनाही पद्धतशीर आपापल्या ठिकाणी हात चोळीत बसवण्यात ते यशस्वी ठरत आले होते. बिहारमध्ये त्यांनी राबवलेल्या अनेक योजना यशस्वीपणे कार्यरत होताना मी पाहिल्या. विशेषत: स्त्रिया, मागासवर्गीय व विद्यार्थी (अगदी बालवाडीपासून विद्यापीठीय स्तरापर्यंतचे) यांच्यासाठी राबवलेल्या विविध योजना व शिक्षणवृद्धीसाठी केलेले विविध प्रयोग, त्यामागची प्रामाणिकता हे पाहिले होते. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे भारतीय जनता पक्ष सत्तेत होता, पण नितीशकुमारांच्या रांगेत तो अगदी शेवटच्या स्थानावर होता. सामान्य माणसामध्ये तो फारसा रुजला नव्हता. त्यामुळे लालूप्रसाद यांच्यासारखा आक्रमक आणि तळागाळातल्या लोकांना बऱ्यापैकी प्रिय वाटणारा माणूस फारसा प्रभावी ठरू शकला नाही. शिवाय त्यांना अडकवलेल्या कायदेशीर बंधनातून सुटका करून घेण्यातच त्यांचा बराचसा काळ गेला व जातो आहे.

त्या भेटीत नितीशकुमार मला जरी ते भारतीय जनता पक्षाबरोबर असले, तरी खूप आश्वासक नेतृत्व वाटत होते. पण हळूहळू भारतीय जनता पक्षाने सर्व देशभरच स्वत:चे एक राजकीय मायाजाल उभे केले. त्याला तथाकथित धर्माच्या नावे आशेचे लुकलुकते तारे लटकवले. येनकेन प्रकारे स्वत:ची सत्ता अधिकाधिक बळकट करण्याचे प्रयत्न चालवले आहेत. विरोधकांना तात्त्विक भूमिकेने संपवण्याऐवजी कुटील डावपेच वापरून आणि त्यांच्या अभिव्यक्तिस्वातंत्र्याचा गळा घोटून आपल्याला शाबूत ठेवण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. सध्याचा काळ तर देशाच्या आणि जगाच्या पातळीवर भयावह स्थितीचा एक आहे. ही स्थिती नैसर्गिक आपत्तीपेक्षा राजकीय आणि आर्थिक स्थितीने जास्त भयाण बनवली आहे. अशा परिस्थितीत नितीशकुमार पुन्हा एकदा निवडणुकीला सामोरे जात आहेत. जवळपास १९८५ पासून राजकारणात सक्रिय असलेले आणि किमान १५ वर्षे मुख्यमंत्रिपद भोगलेले नितीशकुमार पुन्हा एकदा सत्तेच्या आणि मुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीत आहेत. २०१० मधली स्थिती आता नाही, याचेही भान त्यांना असेल, अशी आशा करू या. त्यांनी बाटलीत ठेवलेल्या हैवानाचा आता बाटलीतून बाहेर पडून अवाढव्य असा अजस्र प्राणी झाला आहे. बिहारमधला भाजप हा २०१० मध्ये संघप्रभावित नव्हता, तर तो एकूणच प्रस्थापित सत्तेच्या विरोधातून संघटित झालेली शक्ती होता. पण आज स्थिती ती नाही. तिथे निर्माण झालेल्या या पक्षाच्या जोरावर संघाने आपला हिंदुत्ववादी अजेंडा इथे बऱ्यापैकी प्रस्थापित करण्यात यश मिळवले आहे. नितीशकुमार २०१० सारखे या जाग्या झालेल्या सर्पाला काबूत ठेवणारे कुशल गारुड्याच्या क्षमतेचे राहिलेले नाहीत, हे आजची बिहारमधील परिस्थिती पाहताना जाणवते. या निवडणुकीत भाजपने कुटील नीतीप्रमाणे आणखी एक चाल खेळली आहे. रामविलास पासवानांचे पुत्र चिराग व त्यांचा लोक जनशक्ती पक्ष मैदानात उतरवला आहे. भाजपची ही नेहमीचीच खेळी आहे. इसापनीतीतल्या कोल्ह्यासारखे दोन सिंहांना झुंजायला लावून त्यांना गलितगात्र करणे.

बिहारमधील राजकारणाकडे पाहिले की, आपल्याकडे ग्रामपंचायत व नगरपालिकांच्या निवडणुकांत जे स्थानिक गटांचे तत्त्वहीन युतीचे राजकारण चालते, तेच विधानसभेच्या पातळीवर तिथे चालताना दिसते. महाराष्ट्रातल्या ग्रामपंचायत आणि नगरपालिकांच्या



२०१० मध्ये नितीशकुमार यांच्या कार्यालयात राजा शिरगुप्पे

निवडणुकांमध्ये पक्षविचारांपेक्षा स्थानिक पातळीवरचे वैय्यक्तिक हितसंबंध अधिक प्रभावी ठरतात, तेच आपल्याला बिहारच्या विधानसभा निवडणुकीतही पाहायला मिळते. बिहारमधील आजच्या निवडणुका जरी याच भूमिकेतून होत असल्या, तरी भारतीय जनता पक्ष नावाचा चाणक्य आता अधिक सावधपणे बिहारमध्ये आपले हात-पाय पसरण्यात यशस्वी झाला आहे. एकंदर परिस्थिती पाहता, त्याला रोखण्यात नितीशकुमार अपयशी ठरताहेत, हेच पदोपदी जाणवते. त्यामुळे या निवडणुकीत नितीशकुमार पुन्हा एकदा कसेबसे सत्ताधारी होतीलही, पण त्यांचे आतापर्यंतचे खंबीर अस्तित्व मात्र या नव्या परिस्थितीत डळमळीत होणार आहे, हे नक्की. ते जुन्या पद्धतीने आपल्या मित्रपक्षांना वेसण घालू शकतील ही गोष्ट आता थोडी अवघड कोटीतील बनत चालली आहे, हे नक्की. पंधरा वर्षांच्या चाणक्यनीतीनंतर नितीशकुमारांना त्याच पद्धतीने पुढील राजकारण करता येईल, याबद्दलच्या सर्व शक्यता अगदी धूसर झाल्या आहेत- किंबहुना, भारतीय जनता पक्ष आता नितीशकुमारांना वेसण घालेल, हीच शक्यता जास्त आहे. नितीशकुमारांना २०१० मध्ये भेटताना तेच पुन्हा मुख्यमंत्री व्हावेत, असे मला आवर्जून वाटले होते; पण बिहारमधल्या माझ्या मित्रांकडून परिस्थितीची माहिती घेतल्यावर नितीशकुमार नावाचा सिंह आता अशक्त होत चालला आहे, हेच मला प्रकर्षाने जाणवत आहे. बिहारमधील एके काळी नितीशकुमारांचे चाहते असलेले माझे समाजवादी मित्र आज पर्याय म्हणून काँग्रेसला साथ देताहेत, तर काही राजदला मदत करताहेत. पण त्यांच्याशी खोलवर चर्चा केल्यावर लक्षात आले की, त्यांना या परिस्थितीतही नितीशकुमारच यशस्वी होतील आणि बिहारच्या राजकारणात भारतीय जनता पक्षाला अग्रभागी आणतील, अशी भीती वाटते आहे.

नितीशकुमारांबद्दल माझ्या मनात २०१० मध्ये जी भावना होती, आजच्या परिस्थितीत ती आता नक्कीच उरलेली नाही. एक कार्यकर्ता म्हणून जनतेबद्दल माझे मत कायमच असे आहे की- जनता नेहमीच शहाणी असते, सावध असते आणि योग्य वेळी योग्य निर्णय घेते. बिहारी जनता या निवडणुकीच्या निमित्ताने माझा हा विश्वास सत्य ठरवेल, अशी आशा करतो.

**राजा शिरगुप्पे**
आजरा, जि.कोल्हापूर
Mob.: 9423287320
raja_ shirguppe@yahoo.co.in

## २०१० मध्ये राजा शिरगुप्पे यांनी केलेली

# शोधयात्रा ग्रामीण बिहारची



नितीशकुमार यांचा मुख्यमंत्रिपदाचा पहिला पाच वर्षांचा कालावधी ऑक्टोबर २०१० मध्ये पूर्ण होत होता, तेव्हा विकासाचे बिहार मॉडेल चर्चेत येऊ घातले होते. तेव्हा राजा शिरगुप्पे यांना साधना साप्ताहिकाच्या वतीने फेलोशिप देऊन बिहारला पाठवण्यात आले होते. दीड महिना त्यांनी अर्ध्याहून अधिक बिहार पायाखालून घातला आणि त्या अभ्यासावर आधारित २५ हजार शब्दांचा दीर्घ वृत्तान्त लिहिला. तो २०१० च्या साधना दिवाळी अंकात प्रसिद्ध केला होता. तब्बल ६० पानांचा तो मजकूर साप्ताहिक साधनाच्या आर्काइव्हवर युनिकोडमध्ये उपलब्ध आहे, शिवाय त्या अंकाची pdf सुद्धा तिथे आहे. वाचायची इच्छा असेल तर भेट द्या **weeklysadhana.in** या वेबसाईटला.

---

## २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीवर विशेष लेखमाला

# 'कर्तव्य साधना' या डिजिटल पोर्टलवर

बिहार विधानसभा निवडणुकीचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आहे, येत्या १० नोव्हेंबरला या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. अनेक कारणांमुळे ही निवडणूक चुरशीची ठरत आहे. त्यामुळे २० ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर या महिनाभराच्या काळात 'कर्तव्य साधना' या डिजिटल पोर्टलवर प्रत्येक आठवड्यात दोन ते तीन म्हणजे महिनाभरात मिळून दहा ते बारा लेख प्रसिद्ध होणार आहेत. युनिक ॲकॅडमी, पुणे आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा राज्यशास्त्र विभाग या दोन्ही ठिकाणच्या अभ्यासकांकडून हे लेख लिहून घेतले जाणार आहेत.

या लेखमालेचे संपादन करताहेत **डॉ. विवेक घोटाळे**

लेखमाला वाचण्यासाठी क्लिक करीत राहा **kartavyasadhana.in**

चिकित्सा

अच्युत गोडबोले



# अमेरिकन लोकशाही ?

अमेरिका या देशातील अनेक चांगल्या गोष्टी मला माहीत आहेत, तिथल्या कित्येक चांगल्या गोष्टींचे आकर्षण आहे, त्यासाठी मी अमेरिकेचा प्रवासही अनेक वेळा केला आहे. मात्र गेली अनेक दशकं जगातली सगळ्यात जुनी लोकशाही आणि जगातील लोकशाहीचं संरक्षण करणारा देश असं अमेरिका स्वत:ला म्हणवून घेते; अनेक अमेरिकनांची तशीच समजूत आहे, मतदारांना मतपेटीत आपली मतं टाकता येतात, हे खरं असलं तरी, अमेरिकेमध्ये खऱ्या अर्थाने लोकशाही आहे का? एक म्हणजे, तिथे सगळ्यांना व्यवस्थितपणे मतदान करता येतं का? अमेरिकेमध्ये दर राज्याची अनेक डिस्ट्रिक्टमध्ये विभागणी होते. पण हे डिस्ट्रिक्ट आणि त्यांच्या सीमारेषा (बाउंडरीज) फिक्स्ड नसतात. सध्या जे राज्यकर्ते आहेत, तेच आपल्या मर्जीप्रमाणे या डिस्ट्रिक्टची व्याख्या आणि रचना करू शकतात. खऱ्या लोकशाहीत लोकांनी आपला प्रतिनिधी (रिप्रेझेंटेटिव्ह) ठरवायला हवा. पण इथे उलटंच होतं. इथे रिप्रेझेंटेटिव्ह या डिस्ट्रिक्टची रचना आपल्याला पाहिजे तशी करू शकतात. म्हणजेच थोडक्यात, ते आपले मतदार (व्होटर्स) ठरवू शकतात. ठरावीक लोकांचा गट एखाद्या डिस्ट्रिक्टमध्ये नको असेल, तर ते त्यांच्या वस्त्या वगळून डिस्ट्रिक्टचा नकाशा चक्क बदलू शकतात. याला 'जेरीमँडरिंग' असं म्हणतात. ही पद्धत १८१२ मध्ये सुरू झाली. त्याच्यावर एक डॉक्युमेंटरीही आहे. रिपब्लिकन्स आणि डेमॉक्रॅट्स दोघंही त्याचा वापर करतात. खरं म्हणजे, यावर कायद्यानं बंदी आणण्याची गरज आहे.

व्होटर सप्रेशन हा अमेरिकतला एक मोठा प्रश्न आहे. कित्येक मतदान केंद्र बंदच केली गेली आहेत. उदाहरणार्थ– २३ जून २०२० रोजी केंटुकी राज्यामध्ये प्रायमरीज होत्या. सर्वसाधारणपणे केंटुकीमध्ये ३७०० मतदान केंद्रं असायला पाहिजे होती. पण त्यांची संख्या २०० पेक्षा कमी करण्यात आली. तिथे एक मतदान केंद्र असं आहे की, ते ७.५ लाख रहिवाशांसाठी आहे! यामुळे बहुतेक मतदारांना मत देण्यासाठी ८–१० तास थांबावं लागतं. शिवाय ती सुट्टी नसून तो कामाचा दिवस असेल, तर ही संख्या आणखीनच कमी होते. यामुळे मग मतं देण्यासाठी फारसं कुणी बाहेर

अमेरिकेमध्ये प्रचंड विषमता आहे. तिथे सगळ्यात श्रीमंतांपैकी फक्त तीन जणांकडे तळातल्या १६ कोटी (४८.४८ टक्के) अमेरिकनांपेक्षा जास्त संपत्ती आहे. ॲमेझॉनचा संस्थापक जेफ बेझोस एका मिनिटात जेवढी कमाई करतो, ती सर्वसाधारण अमेरिकन दोन वर्षांत जेवढे मिळवतो त्यापेक्षाही जास्त आहे! आज अमेरिकेतले चार कोटींपेक्षा जास्त लोक दारिद्र्यरेषेखाली राहतात, तर आणखीन एक कोटी लोक अगदी काठावर आहेत. हे मिळून लोकसंख्येच्या १५–१६ टक्के होतात. (इंग्लंडमध्ये हेच प्रमाण कोव्हिडच्या अगोदरच २० टक्के होतं, आता तर विचारूच नका!) आज अमेरिकेमध्ये सहा–सात लाख लोक बेघर आहेत. सध्या लोकांना जागेचं भाडं देण्यासाठी सवलत (मोरेटोरियम) दिलेली होती. पण जर ही सवलत काढून घेतली, तर काही कोटी लोक बेघर होतील, अशी भीती व्यक्त केली जातेय. अमेरिकेमध्ये अधिकृतरीत्या आठ ते नऊ टक्के लोक बेकार आहेत.

पडतच नाही. त्यातून या वर्षी कोव्हिडमुळे ही संख्या आणखीनच घटेल.

आजसुद्धा अमेरिकेतल्या अनेकांना मतदान करता येत नाही, यावर अनेकांचा विश्वास बसणार नाही. यावर 'राइझ अप : कन्फ्रॉंटिंग ए कंट्री ॲट दी क्रॉसरोड्स' या नावाचं एक पुस्तक सप्टेंबर २०२० मध्ये अल् शार्पटन (Al Sharpton) यानं लिहिलं आहे.

जिथे कृष्णवर्णीय आणि इतर अल्पसंख्याक लोकांची वस्ती जास्त आहे, तिथे मतदान कक्ष कमी असणं, मतदारयादीतून कित्येकांची नावं गायब होणं, मतदानाच्या वेळा विचित्र किंवा कमी ठेवणं, व्होटर आयडीचे नियम जरा जास्तच कडकपणे पाळणं (७ टक्के अमेरिकनांकडे फोटो आयडीज नाहीयेत आणि हे प्रमाण कृष्णवर्णीय व हिस्पॅनिक्स यांच्यामध्ये तर यापेक्षा खूपच जास्त आहे.) असे प्रकार आजपर्यंत चालू आहेत. खरं तर अशांविरुद्ध 'व्होटिंग राईट्स ॲक्ट' होता. पण २०१३ मध्ये अमेरिकेतल्या सुप्रीम कोर्टानंच तो कायदा जास्त मिळमिळीत केला. त्यामुळे अनेक कृष्णवर्णीयांना आणि इतरांना मतदान करताना बराच त्रास पडतो, असं न्यूयॉर्क युनिव्हर्सिटीमधल्या 'दी ब्रेनन सेंटर' या निवडणुकांसंबंधी संशोधन करणाऱ्या संस्थेनं म्हटलं आहे. ''आपण प्रगत लोकशाही आहोत असं म्हणतो, पण आपणच कित्येकांना मतदान न करण्यासाठी प्रवृत्त करतो'' असं खुद्द बराक ओमाबांनी एका इंटरव्ह्यूमध्ये म्हटलं होतं. या सगळ्यामुळे २०१६ च्या निवडणुकांमध्ये कृष्णवर्णीयांनी ७ टक्के कमी मतदान केलं.

अमेरिकेत २०१६ च्या अध्यक्षीय निवडणुकीत फक्त ५६ टक्के मतदान झालं. इतर देशांपेक्षा हे प्रमाण खूपच कमी होतं. बेल्जियममध्ये ८७.२ टक्के- स्वीडनमध्ये ८२.५.६ टक्के, डेन्मार्कमध्ये ८०.३ टक्के अशा अनेक देशांमध्ये हे प्रमाण अमेरिकेपेक्षा खूप जास्त आहे. मतदानाच्या प्रमाणाबाबत जगामध्ये अमेरिकेचा खूपच खालचा नंबर लागतो. हे झालं अध्यक्षीय निवडणुकांचं. कॉंग्रेसमधल्या इतर प्रतिनिधींच्या निवडणुकांमध्ये तर हे प्रमाण आणखीच कमी- म्हणजे साधारणपणे ३५ ते ४० टक्के असतं.

यामध्येही एक पॅटर्न आहे. सर्वसाधारणपणे कृष्णवर्णीय, हिस्पॅनिक हे कमी मतदान करतात. उच्च मध्यमवर्ग आणि श्रीमंतवर्गापेक्षा गरीब लोक कमी मतदान करतात. थोडक्यात, मतदानामध्ये श्रीमंत व सुशिक्षितवर्गाचंच प्रतिनिधित्व होतं आणि निवडणुकांना बडे कॉर्पोरेट्स हेच पैसे देतात. त्यामुळे त्यांच्याच आशा-अपेक्षांचं प्रतिबिंब निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींमध्ये दिसतं.

थोडक्यात, मतदानाचा किंवा लोकशाहीचा हक्क हा सगळ्यांना सहजपणे मिळत नाही. जेव्हा इतर देशात मतदानाचे घोटाळे होतात, तेव्हा अमेरिका त्यांना 'फ्रॉड्युलंट' म्हणते आणि ते सरकार जर त्यांच्या- म्हणजेच अमेरिकन कॉर्पोरेट्सच्या- पसंतीतलं नसेल, तर सोईस्कर रीत्या 'त्यातलं सरकार कसं लोकशाहीविरुद्ध आहे' असा प्रचार करून ते सरकार पाडायलाही अमेरिका मागे-पुढे बघत नाही. पण हाच नियम अमेरिका स्वत:ला लावत नाही.

बहुतेक वेळा अध्यक्षीय डिबेट्स म्हणजे एक फार्सच असतो. त्यामध्ये देशाच्या किंवा जगाच्या दृष्टीनं महत्त्वाचे प्रश्न चर्चिलेच जात नाहीत. उदाहरणार्थ- वाढणारी राक्षसी विषमता, बेकारी, पर्यावरणाचा ऱ्हास, वाढता लष्करी खर्च, अमेरिकेची जगावर चाललेली दादागिरी आणि युद्धं, बेघरांची संख्या, विद्यार्थ्यांवरचा कर्जाचा वाढता बोजा, वंशद्वेष, हिंसाचार आणि गन कंट्रोल यांच्याविषयी फारशी चर्चा नसतेच. चर्चा होते ती इराक, इराण, उत्तर कोरिया, चीन यांच्याविषयीची धोरणं, कोण करांचे दर कमी करेल, कोण बेल आऊट पॅकेज किती देईल- अशांबद्दलच आणि त्या बाबतीत दोन्ही पक्षांमध्ये खूपच कमी फरक असतो. हा ट्रेंड जगभर चालू आहे.

अमेरिकेप्रमाणे ब्रिटन, भारत अशा देशांमध्येही दोनच मुख्य पक्ष आहेत. त्यांच्या धोरणांमध्ये प्रचंड असा फरक नाहीये. निओलिबरल धोरणं १९८० नंतर सगळीकडे सुरू झाली. कामगार संघटना मोडून काढणं, असंघटित कामगार कंत्राटावर ठेवणं, श्रीमंतांवरचे कर कमी करणं, सरकारच्या कल्याणकारी योजना कमी-कमी करत आणणं, पर्यावरणाच्या रक्षणासाठी असलेले कायदे काढून टाकणं, खासगीकरण करणं- अशा अनेक बाबतींत दोन्ही पक्षांमध्ये संगनमतच झालेलं असतं. (१९८० च्या दशकात डेमॉक्रेटिक पक्षाचा जो बायडन हा तर सरकारी खर्च कमी करणं, श्रीमंतांवरचे कर कमी करणं अशा निओलिबरल धोरणांच्या बाबतीत रोनाल्ड रेगनच्या रिपब्लिकन प्रेसिडेंटच्याही पुढे होता!) त्यामुळे दोन्ही पक्षांतला फरक खूपच वरवरचा किंवा कॉस्मेटिक असतो. त्यामुळे जनतेचे खरे प्रश्न समोर येतच नाहीत.

हे दोन्ही पक्ष कॉर्पोरेट्सच्या तालावर नाचतात. म्हणूनच अमेरिका, ब्रिटन आणि भारत अशा सगळ्या निओलिबरल जगात गेल्या ४० वर्षांत शिक्षण-आरोग्य-सार्वजनिक वाहतूक यांच्यावरचा खर्च वाढवणं, पेन्शन-बेकारभत्ता अशा सामाजिक सुरक्षेचं कवच सशक्त करणं, पर्यावरणाच्या रक्षणासाठी फॉसिल फ्युएल्सच्या कंपन्यांवर बंधनं घालणं- असे सर्वसामान्य जनतेच्या हिताचे निर्णय होणं सोडाच, उलट त्याच्या उलटच धोरणं या सरकारनी घेतली आणि तीही सगळ्यांनी निवडून दिलेल्या सरकारांनी- मग सरकार कुठल्याही पक्षाचं असो! हीच लोकशाहीची सगळ्यात मोठी शोकांतिका आहे.

'टेस्टिंग थिएरीज ऑफ अमेरिकन पॉलिटिक्स' नावाचा मार्टिन गिलेन्स आणि बेंजामिन पेज यांनी लिहिलेला एक रिपोर्ट प्रिन्स्टन विद्यापीठानं २०१४ मध्ये प्रकाशित केला. त्यामध्ये कित्येक गोष्टी दिसून आल्या.

कुणाच्या मतांना अमेरिकन राजकारणात महत्त्व आहे किंवा कुणाची मतं राजकारणी विचारात घेतात, हा यातला कळीचा मुद्दा होता. या संशोधनात्मक अभ्यासामध्ये त्यांनी सरकारच्या २००० धोरणांचा अभ्यास केला. सरकारकडून काय अपेक्षा आहेत, ते त्यांनी अनेकांना विचारलं. खरं तर सरकारला मत सर्वसामान्यांनी दिलं असल्यामुळे त्यांच्या आशा-आकांशा सरकारी धोरणांमध्ये दिसून यायला पाहिजे होत्या. उदाहरणार्थ- चांगले शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, पर्यावरणरक्षणासाठी सरकारनं पैसे जास्त खर्च करावेत, असं सर्वसामान्यांना वाटत होतं. पण प्रत्यक्षात सरकारची धोरणं याच्या अगदी विरुद्ध फक्त कॉर्पोरेट-धार्जिणीच होती, असं त्यांना दिसून आलं. उदा. श्रीमंतांवरचे कर कमी करणं, सरकारी खर्च कमी करणं, खासगीकरण करणं, लष्करावरचा खर्च वाढवणं वगैरे. मग सरकार दोनपैकी कुठल्याही पक्षाचं का असेना! यामुळे ही खरी डेमॉक्रसी नसून ही प्लुटॉक्रसी किंवा ऑलिगार्की- म्हणजे मूठभर धनिकांचं बहुतांशी सामान्य जनतेवर राज्य- आहे, असं या लेखामध्ये म्हटलंय.

थोडक्यात, सामान्यांच्या मतांना सरकारी धोरणांमध्ये काहीच महत्त्व नव्हतं. पण मग त्यांच्याकडून दर चार वर्षांमध्ये मतं का मागितली जातात? याचं कारण म्हणजे, यामुळे लोकशाहीचा देखावा करता येतो. दोन्हीपैकी कुठलाही पक्ष सत्तेवर आला तरी किरकोळ फरक सोडले तरी मूलभूत असे फरक दोघांमध्ये नाहीत. एक तर तिसरा पक्ष उभा राहू शकत नाही आणि जर बर्नी सँडर्ससारखा कोणी खरंच लोकहिताच्या गोष्टी बोलायला लागला, तर त्याला कॉर्पोरेट्स पुढे येऊ देत नाहीत. त्यामुळे मग अशा लोकशाहीत फारसा अर्थ उरत नाही. हेच चित्र थोड्या फार फरकानं ब्रिटन किंवा भारत अशा निओलिबरल





व्यवस्थांमध्ये दिसतं. पण लोकांच्या मतांवर निवडून आल्यामुळे एका बाजूला 'लोकशाही' असल्याचा दावा करता येतो आणि तरीही फक्त ५-१० टक्के लोकांच्या हितांची धोरणं राबवता येतात.

या अभ्यासाच्या निष्कर्षांमध्ये अमेरिकेमध्ये 'मेजॉरिटी'चं राज्य नसून ते काही कॉर्पोरेट्सच्या हातात आहे, असं म्हटलं होतं; ते आजही खरं आहे. अमेरिकेतले टॅक्सचे नियम श्रीमंतांना जास्त फायदा करून देतात, तर पर्यावरणाचे कायदे कॉर्पोरेट्सना फायदा करून देतात. सगळ्या युनियन्स खचल्या असल्यामुळे कामगारांची 'बार्गेनिंग पॉवर' खूपच कमी झालीय. अमेरिकेतला मीडिया व न्यूज नेटवर्क्सवर इंग्लंड आणि भारत यांच्याप्रमाणेच बड्या कॉर्पोरेट्सचीच मालकी आहे. आपली आरोग्यव्यवस्था फार्मा कंपन्या व बडी हॉस्पिटल्स यांच्यासाठीच चालते आणि मग ती सामान्यांना परवडेनाशी होते. हे सगळं चालू असताना दोन पक्षांचे दोन अध्यक्षीय उमेदवार एकमेकांवर उथळ टीका करून लोकांचं लक्ष मुख्य प्रश्नांपासून भरकटवतात. दर काही वर्षांनी ते एकमेकांची जागा घेतात, पण सामान्यांच्या परिस्थितीत काहीच फरक पडत नाही. कॉर्पोरेट्स मात्र जास्त श्रीमंत होत जातात. त्यामुळे दोन पक्षांमधली मारामारी म्हणजे त्यांच्यातलं लुटुपुटूचं खोटं-खोटं युद्ध वाटतं.

अध्यक्षीय निवडणुकीला आपला उमेदवार पाठवणारे अमेरिकेत फक्त रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक हे दोनच राजकीय पक्ष आहेत. या दोन्ही पक्षांची अमेरिकेत दादागिरी आहे. हे दोघे राजकारणात एकमेकांचे विरोधक असले तरी दोघांना तिसरा कोणी पक्ष नको असतो. डेमॉक्रॅटिक आणि रिपब्लिकन पक्षाच्या 'ड्युऑपॉली'च्या दुष्परिणामांविषयी हार्वर्ड बिझिनेस रिव्ह्यू (HBR) मध्ये चांगले लेख आले होते. हे दोन पक्ष सोडून तिसऱ्या पक्षाला किंवा गटाला राजकारणात शिरायला किती प्रचंड त्रास आणि अडथळे येतात (बॅरियर्स टु एन्ट्री) याविषयी त्यात सविस्तर विवेचन केलं होतं. एका डोनरला दर वर्षी मुख्य दोन पक्षांना ८.५५ लाख डॉलर्स देता येतील, पण दर दोन वर्षांनी होणाऱ्या निवडणुकीत कोणी स्वतंत्र उमेदवार उभा राहिला, तर त्याला मात्र जास्तीत जास्त ५६०० डॉलर्स देता येतील असा नियमच या ड्युऑपॉलीनं केला आहे! यामुळेच १८५४ पासून अमेरिकेत एकही नवा पक्ष निर्माण झालेला नाही!

याशिवाय अमेरिकेत भारताप्रमाणेच 'फर्स्ट पास्ट दी पोस्ट (FPTP)' ही पद्धत वापरली जाते. त्यातून इलेक्टोरल कॉलेजच्या 'विनर टेक ऑल' या पद्धतीमुळे तर आणखीच गोंधळ होतो. समजा- एका राज्यात १०० जागा असतील आणि रिपब्लिकन्सना ५२ तर डेमोक्रॅटस्‌ना ४८ जागा मिळाल्या, तर रिपब्लिकन्सना जास्त जागा मिळाल्यामुळे सगळ्या १०० जागा रिपब्लिकन्सला मिळाल्या, असं धरलं जातं. यात कुठल्या पक्षाला किती मतं पडली याला महत्त्व नसतं. यामुळेही लोकशाहीला धक्का पोहोचतो. अमेरिकेत हेच झालं. हिलरी क्लिंटनला २०१६ मध्ये डोनाल्ड ट्रम्पपेक्षा २८.७ लाख जास्त मतं मिळूनही डोनाल्ड ट्रम्प निवडून आले होते. भारतातलं चित्रंही काही फारसं वेगळं नाही आहे. उदाहरणार्थ- भारतातही २०१४ मध्ये भाजपला काँग्रेसच्या दीडपट मतं मिळाली असली, तरी सीट्स मात्र ६.५ पट मिळाल्या. भाजपला फक्त ३१ टक्के मतं पडूनही म्हणजे ६९ टक्के लोकांनी त्यांना मत दिलं नसतानाही त्यांनी सरकार स्थापन केलं. थोडक्यात, या पद्धतीतच काही तरी गोंधळ आहे. 'प्रपोर्शनल रिप्रेझेंटेशन (PR)' व्होटिंग सिस्टीम हा यावर एक उपाय सुचवला जातो. त्यावर विचार करायला पाहिजे. ही पद्धत पूर्णपणे निर्दोष नक्कीच नाहीये. पण आज ८८ देश कुठल्या तरी PR पद्धतीनं मतदान करतात आणि सरकारं स्थापतात.

पत्रकारांसाठी सगळ्यात धोकादायक देशांच्या यादीत २०१८ मध्ये अमेरिकेचं नाव झळकलं. अमेरिकेत वंशवाद खूप मोठा आहे. आता तर जॉर्ज फ्लॉईडच्या मृत्यूमुळे हे चित्र आणखीनच भयावह झालंय (उदाहरणार्थ- व्हाईट सुपरिमॅसिस्ट्स), हे लोकशाहीसाठी चांगलं नाही.

अमेरिकेमध्ये प्रचंड विषमता आहे. तिथे सगळ्यात श्रीमंतांपैकी फक्त तीन जणांकडे तळातल्या १६ कोटी (४८.४८ टक्के) अमेरिकनांपेक्षा जास्त संपत्ती आहे. ॲमेझॉनचा संस्थापक जेफ बेझोस एका मिनिटात जेवढी कमाई करतो, ती सर्वसाधारण अमेरिकन दोन वर्षांत जेवढे मिळवतो त्यापेक्षाही जास्त आहे! आज अमेरिकेतले चार कोटींपेक्षा जास्त लोक दारिद्र्यरेषेखाली राहतात, तर आणखीन एक कोटी लोक अगदी काठावर आहेत. हे मिळून लोकसंख्येच्या १५-१६ टक्के होतात. (इंग्लंडमध्ये हेच प्रमाण कोव्हिडच्या अगोदरच २० टक्के होतं, आता तर विचारूच नका!) आज अमेरिकेमध्ये सहा-सात लाख लोक बेघर आहेत. सध्या लोकांना जागेचं भाडं देण्यासाठी सवलत (मोरेटोरियम) दिलेली होती. पण जर ही सवलत

काढून घेतली तर काही कोटी लोक बेघर होतील, अशी भीती व्यक्त केली जातेय. अमेरिकेमध्ये अधिकृतरीत्या आठ ते नऊ  टक्के लोक बेकार आहेत. पण ही आकडेवारी कोव्हिडपूर्वीची आहे. आज हीच बेकारीची आकडेवारी २५ ते ३० टक्क्यांपर्यंत गेली असल्याचं तज्ज्ञ सांगतात.

निओलिबरल धोरण १९८० पासून सुरू झालं, तेव्हापासून गेल्या ४० वर्षांत अमेरिकेच्या तळातल्या ५० टक्के लोकांचं खरं उत्पन्न (महागाई वजा करून) तेवढंच राहिलं आहे किंवा चक्क कमी झालंय आणि तेही कामाचे तास वाढून व कामाचं स्वरूप खालावूनही. यामुळेच कित्येकदा कित्येकांना फक्त एक नोकरी करून भागत नाही. ते दोन-तीन नोकऱ्या करून आपला संसार चालवतात.

आज बहुतांशी विद्यार्थी कर्जबाजारी आहेत. कित्येकांनी तर आयुष्यभर नोकरी केली तरी ते कर्ज फिटणार नाही, अशी परिस्थिती आहे. अमेरिकेतील आरोग्यव्यवस्था प्रगत राष्ट्रांमधल्या आरोग्यव्यवस्थेमध्ये सगळ्यात वाईट समजली जाते. ती इतकी महाग आहे की, तळातल्या ५० टक्के लोकांना ती परवडत नाही! त्यामुळे दर वर्षी हजारो लोक कर्जबाजारी तरी होतात किंवा मृत्यू पावतात. अमेरिकेतल्या तळातल्या कोट्यवधी लोकांना शिक्षण परवडत नाही. तळातल्या २० टक्के लोकांकडे संपत्ती जवळपास शून्य आहे. म्हणजे ते कफल्लक तरी आहेत किंवा कर्जबाजारी तरी आहेत. त्यातही ब्लॅक्स, हिस्पॅनिक्स आणि स्त्रियांची परिस्थिती जास्त बिकट आहे. पण अमेरिकेत फक्त एक टक्का श्रीमंतांकडे अमेरिकेती  ४३ टक्के संपत्ती आहे.

हे कोव्हिडपूर्वीचे आकडे आहेत. आता तर हे प्रमाण खूपच वाढलेलं असेल, हे नक्की. नोबेल लॉरेट पॉल क्रूगमनच्या मते- ही विषमता खूप वाढली, तर ती लोकशाहीला धोका ठरते. त्या हिशेबानं अमेरिकेत निरोगी लोकशाही नक्कीच नाहीये. उद्योगविश्वात तर मीडिया, टेलिकॉम, कॉम्प्युटर्स, सोशल मीडिया, ऑटोमोबाइल्स, ऑईल, फार्मा, म्युझिक, अकाऊंटिंग अशा सगळ्या क्षेत्रांत मोठमोठ्या मोनोपॉलीज आणि ऑलिगोपॉलीजमध्ये प्रत्येकी चार-पाच बड्या कॉर्पोरेट्सचं राज्य आहे. ॲडम स्मिथनं कल्पिलेली स्पर्धेची अर्थव्यवस्था पूर्णपणे समाप्त झाली आहे. त्यामुळे नवे उद्योग काढणं प्रचंडच अवघड आहे. थोडक्यात, 'दी वर्ल्ड इज नॉट फ्लॅट'. इथे इकॉनॉमिक डेमॉक्रसी नाहीये. त्यामुळेही सशक्त राजकीय लोकशाहीही उभी राहू शकत नाही.

'इकॉनॉमिस्ट इंटेलिजन्स युनिट (EIU)' २००० पासून वेगवेगळ्या देशांसाठी लोकशाहीचा इंडेक्स प्रकाशित करते. जर हा इंडेक्स ८ ते १० च्या मध्ये असेल, तर ती पूर्ण किंवा चांगली लोकशाही समजली जाते. यातला वाईट भाग हा की, १६७ देशांपैकी फक्त २२ देश- म्हणजे जगातल्या ७३५ कोटी लोकसंख्येपैकी फक्त ४३ कोटी लोक (५.८ टक्के) 'पूर्ण लोकशाही'मध्ये आहेत! आणि त्या यादीत जगातली सर्वांत जुनी लोकशाही म्हणजे अमेरिका आणि सर्वांत मोठी लोकशाही म्हणजे भारत हे दोन्हीही देश नाहीत! हा इंडेक्स ६ ते ८ असेल, तर त्याला 'सदोष लोकशाही' म्हणतात. आपण दोन्ही देश त्यात मोडतो. यापेक्षा सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, स्वत:ला लोकशाहीचा रक्षक म्हणवणारी अमेरिका इतर देशांशी कसं वागते ते बघणं.

गेल्या ७० वर्षांत अमेरिकेनं जगातल्या जवळपास १०० देशांविरुद्ध आर्थिक, राजकीय आणि लष्करी आक्रमणं केलेली आहेत. याला अनेक कारणं आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपियन देशांची सत्ता खूपच घटली आणि तेव्हापासून अमेरिकेनं जगाचा 'पोलीस' म्हणून सगळीकडे चक्क दादागिरी चालू केली. गेल्या ७० वर्षांत अमेरिकेनं ज्या राष्ट्रांवर आक्रमणं केली, त्याची यादी पाहिली की धक्काच बसतो.

चीन- १९४९-५०, आल्बेनिया- १९४९-५३, पूर्व जर्मनी-१९५० चं दशक, इराक-१९५३, १९९१, २००१, ग्वाटेमाला- १९५४, कोस्टारिका- १९५५, सीरिया- १९५६-५७, इंडोनेशिया- १९५७-५८, इराण- १९६३, व्हिएटनाम - १९४५-७३, कंबोडिया- १९५१-७०, लाओस- १९५८-६०, इक्वेडॉर- १९६०-६३, कॉंगो - १९६५,  क्युबा- १९५९ ते आत्तापर्यंत, बोलिव्हिया- १९६४, घाना- १९६६, चिले- १९६४- ७३, ग्रीस- १९६७, अंगोला- १९७५, १९८०, पोर्तुगाल- १९७४-७६, जमैका- १९७६-८०, ग्रेनेडा- १९८३, येमेन- १९८२-८४, फिजी- १९८७, लिबिया- १९८०, २०११, निकाराग्वा- १९८९-९०, पनामा- १९८९, बल्गेरिया- १९९०, अल्बेनिया- १९९१, अफगाणिस्तान- १९८०, २००१, व्हेनेझुएला- २००२, हैती- २००४, सोमालिया- २००० ते आत्तापर्यंत, सीरिया- २०१२

अशा अनेक देशांमध्ये अमेरिकेनं प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे हस्तक्षेप करून तिथली सरकारं पाडली किंवा पाडण्याचा प्रयत्न केला. पण या गोष्टींची सर्वसामान्य

लोकांना कल्पनाही येणार नाही, याची कॉर्पोरेट मीडियानं काळजी घेतलेली असते. याविषयी अनेक पुस्तकं आहेत. त्यातलं विल्यम ब्लमनं लिहिलेलं 'किलिंग होप' हे पुस्तक वाचावं.

अमेरिकेमध्ये आज प्रचंड मोठा मिलिटरी-इंडस्ट्रियल कॉम्प्लेक्स आहे. अमेरिका आपल्या मिलिटरीवर जेवढा खर्च करते, तो त्यापुढच्या १० राष्ट्रांच्या मिलिटरी बजेट्सच्या बेरजेपेक्षा जास्त आहे! अमेरिकेमध्ये बोइंग, जनरल इलेक्ट्रिक, लॉकहिड मार्टिन, रेथॉन टेक्नॉलॉजीज, बीईए सिस्टीम्स, एअरबस, रोल्स रॉईस, जनरल डायनॅमिक्स अशा ४७ एक कंपन्या युद्धसामग्री तयार करतात. त्यांनी निर्माण केलेली शस्त्रं खपावीत म्हणून अमेरिकेला सतत कुठे तरी युद्ध करावं लागतं. त्याकरता एक शत्रू लागतो. अनेक दशकं कम्युनिझम हा शत्रू होता, १९९१ मध्ये सोव्हिएत युनियन पाडल्यानंतर टेररिझम शत्रू झाला आणि आता चीन झालाय.

अमेरिकेनं १९५० च्या नंतर लॅटिन अमेरिकेतल्या ५६ लष्करी बंडांमध्ये प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे भाग घेतला होता. याशिवाय मध्य पूर्वेमधल्या इराक, इराण, सीरिया, लिबिया, येमेन, लेबॅनन, गाझा, इजिप्त, सुदान आणि आफ्रिकेतल्याही अनेक देशांत अमेरिकेनं ढवळाढवळ केली आहे. कित्येकदा लोकशाहीनं निवडून आलेली सरकारंही अमेरिकेनं उलथवून टाकली आहेत. त्यातल्या डझनावारी उदाहरणांपैकी फक्त काही बघू.

मोहम्मद मोसाद्देघ या इराणच्या निवडून आलेल्या लोकप्रिय पंतप्रधानानं जेव्हा इराणमधल्या ब्रिटिश खासगी तेल कंपन्यांचं राष्ट्रीयीकरण केलं, तेव्हा ब्रिटननं अमेरिकेकडे मदत मागितली. तेव्हा सीआयएच्या मदतीनं त्याचं सरकार १९५३ मध्ये उलथवून इंग्लंड-अमेरिका यांना पाहिजे तशा 'शहा ऑफ इराण' या हुकूमशहाला अमेरिकेनं कसं राज्यावर बसवलं याची कबुली १९ ऑगस्ट २०१३ रोजी सीआयएनंच जाहीरपणे दिली.

ग्वाटेमालामध्ये १९५४ मध्ये तेच झालं. तिथे 'जॅकोबो अर्बेनेझ' नावाचा अध्यक्ष निवडून आला होता. पण त्यानं जमीन सुधारणा (लँड रीफॉर्म्स) केले, तेव्हा 'युनायटेड फ्रूट कंपनी' या अमेरिकन कंपनीचीसुद्धा जमीन या कायद्यानं जाईल, अशी भीती वाटल्यामुळे अमेरिकेनं सीआयएच्या मदतीनं ग्वाटेमालाची नाकेबंदी केली आणि शेवटी बंड घडवून आणून तिथे लष्करी राजवट आणली. या ऑपरेशनला 'ऑपरेशन पीबी सक्सेस' असं नाव दिलं होतं. मध्ये १९९९ हे उघडकीस आलं.

काँगोमधला पंतप्रधान पॅट्रिस लुमुंबा याचा १९६० मध्ये खून १९६१ मध्ये डोमिनियन रिपब्लिकमध्ये, १९६३ मध्ये दक्षिण व्हिएन्नामध्ये असंच झालं. ब्राझीलमध्ये १९६४ मध्ये निवडणूक जिंकून लोकशाही पद्धतीनं निवडून आलेला अध्यक्ष गुलार्ट (Goulart) याविरुद्ध बंडाळी आणि कट करून लष्करी राजवट आणणं, १९७३ मध्ये लोकशाहीनं निवडून आलेल्या चिलेच्या साल्कादोर ॲलेंदे या अध्यक्षाचा खून करून सीआयएच्या मदतीनं पिनोचे या हुकूमशहाला गादीवर बसवणं अशी अनेक उदाहरणं आहेत.

अमेरिकेला आणि तिथल्या कॉर्पोरेट्सना कम्युनिझम हा सगळ्यात मोठा शत्रू वाटतो. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेनं सोव्हिएत युनियनला हरवण्याकरता हिटलरच्या नाझी जर्मनीबरोबर गुप्त करारही केला होता, हे अनेक दशकांनंतर सीआयएनं मान्य केलं. हिटलरच्या गुप्तहेर संघटनेत गेहलन (Gehlen) नावाचा एक मोठा अधिकारी सोव्हिएट युनियनवर हेरगिरी करण्यात अग्रेसर होता. अमेरिकेतल्या सीआयएनं गेहलनशी संपर्क साधून सोव्हिएट युनियनविरुद्ध कारवाया कशा केल्या, याविषयी मार्टिन ली यानं दि.१ मे २००१ रोजी 'इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिसी स्टडीज'मध्ये सविस्तर लेख लिहिला होता. याशिवाय आयबीएम आणि अनेक बड्या कॉर्पोरेट्सनी नाझी जर्मनीला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत केली होती. याविषयी बरीच पुस्तकंही प्रकाशित झालेली आहेत. अमेरिकेतली लोकशाही कशी फसवी आहे, त्याबद्दल 'हाऊ डेमोक्रसीज डाय' हे स्टीव्हन लेव्हिटस्की याचं आणि 'डेमोक्रॅसी फॉर दी फ्यू' हे मायकेल पॅरेंटी याचं- अशी अनेक पुस्तकं वाचावीत.

अमेरिकेनं ३७ फॅसिस्ट किंवा हुकूमशाही राष्ट्रांना आत्तापर्यंत मदत केली आहे आणि स्वत:ला लोकशाहीचा संरक्षक म्हणून घेता असताना- हे विशेष! EIU नं जेव्हा अमेरिकेला सदोष लोकशाही म्हटलं होतं, तेव्हा या सगळ्या गोष्टी विचारात घेतल्या नव्हत्या. त्यांचाही विचार केला तर आपण अमेरिकेला लोकशाही तरी म्हणू शकू का?

**अच्युत गोडबोले,** पुणे
achyut.godbole@gmail.com
Mob.9820030600

नवे ऋतुचक्र

विश्वास वसेकर



# नोव्हेंबर : दिवस सुगीचे सुरू जाहले!

शेतकऱ्यांच्या जीवनात मोठ्या सुगीत- म्हणजे नोव्हेंबर-डिसेंबरात येणारी खळीदळी. खळं म्हटलं की, ते ज्वारीचं. इतकं साग्रसंगीत खळं इतर कोणत्याही पिकाचं होत नाही. एक प्रकारे सुगीचा कळसाध्याय असतो खळं. पुढील सर्व वर्ष याच पिकावर अवलंबून असतं. पुढील वर्षीची ज्वारी येईपर्यंत ही ज्वारी पुरली पाहिजे, असा ध्यास असायचा. पूर्णपणे पक्व झालेली ज्वारी 'पाडायला' आली की, खळ्याचा सोहळा सुरू होई. पाच-सहा माणसं आपापली पाती धरून ज्वारी पाडायला आरंभ होई.  गोळा केलेल्या ज्वारीच्या पेंढ्या बांधून जिथे खळे करायचे, त्या जागेभोवती गोल रचून ठेवत. पाणी टाकून आणि धम्मस करून ही जागा खळ्यासाठी पक्की करून ठेवत. खळ्याचे सात टप्पे करता येतील. पाडणी, बांधणी, गूड गोळा करणे, मोडणी, मळणी आणि शेवटी उधळणी. पहिले तीन टप्पे पुरुषगडी पार पाडत.

नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला आपण काही वेलींबरोबर रांगणार आहोत. सुरुवात करू या, मायाळूच्या वेलापासून. हा बहुवर्षायू, भराभर वाढणारा आणि खूप पसरणारा वेल आहे. त्याच्या लालसर-जांभळट गुळगुळीत फांद्या आणि खोडे फारच सुंदर दिसतात. पाने हिरवी, मध्यम आकाराची, जाडसर, मऊ, गुळगुळीत असतात. नोव्हेंबरात फुलांचा बहर असतो. मायाळूच्या पानांची भाजी, सूप आणि भजी करतात, ती अतिशय चवदार व पौष्टिक असतात. फळांपासून जांभळा-तांबडा रस निघतो, तो नैसर्गिक खाद्यरंग म्हणून वापरतात. रबरी शिक्क्यांची जांभळी शाई बनविण्यासाठी ही फळे वापरली जातात. छानच वेल आहे हा. कुंडीत, घरातही लावता येतो. जरूर लावावा. मायाळूला वेलबोंडी व पुई अशीही नावे आहेत.

सध्या आंबगूळ किंवा आंबुळगी हा वेलही फुलांनी बहरला आहे. कोवळ्या फांद्या आणि पानांवर चमकदार चंदेरी सूक्ष्म खवले असणे, हे आंबगुळीचे खास वैशिष्ट्य! त्यामुळे वेल सुंदर दिसतो. फुलांच्या तुऱ्यामध्ये मोठ्या संख्येने छोटी फुले असतात. फुलांवरसुद्धा चमकदार चंदेरी केस किंवा खवले असतातच. फुलात जोडली गेलेली चार सूक्ष्म परिदले आणि चार सुटे पुंकेसर दिसतात. फळे खाण्याजोगी आंबट-गोड असून मे महिन्यात पुण्याच्या बाजारात विकायलाही येतात.

मसाल्याच्या पदार्थांतील महत्त्वाचा घटक असणारी काळी मिरी सर्वांनी पाहिलेली असते. तिची चव झोंबणारी आणि तिखटसर असून त्याला विशिष्ट स्वाद असतो. काळ्या मिरीचा वेल असतो. तो दुसऱ्या वृक्षाच्या खोडावर वाढतो. नोव्हेंबरात त्याला फुलोरे येतात आणि उन्हाळ्यात फळे धरतात. अंगावर पित्त उठले की, आजी मला साजुक तुपाबरोबर काळी मिरी चावून खायला लावायची.

बाजीरावी घेवड्याला पेशव्यांचे नाव का दिले, माहीत नाही; पण प्रचंड उंच वाढणारा महावेल आहे हा. ऑक्टोबरपासून त्याच्या फुला-फळाचा हंगाम सुरू होत असला, तरी आता तो ऐन बहरात आहे. त्याच्या कोवळ्या कच्च्या शेंगांची भाजी करतात. एक मोठा वेल चार-पाच कुटुंबांना आठवड्यातील तीन-चार दिवस भाजी पुरवू

शकतो. बियांची उसळसुद्धा छान होते. शेंगांची भाजी पौष्टिक आणि सारक असते. घेवड्याचे आणखी दोन-तीन उपप्रकार ज्ञात आहेत.

ज्येष्ठ समीक्षक डॉ. द. भि. कुलकर्णी यांनी त्यांच्या अंगणात बसलो असताना मला अचानक प्रश्न केला, ''बालकवींनी फुलराणी ही त्यांची कविता कोणत्या फुलावर लिहिली?'' या आकस्मिक प्रश्नानं मी भांबावून तर गेलोच, पण हा प्रश्न आपल्याला कधीच कसा पडला नाही याचे नवल वाटले. मला फार कोड्यात न ठेवता त्यांनी त्यांच्या अंगणातील एक चिरपरिचित गवत दाखवलं. त्याला एका लांब दांडीवर एक-एकटे फूल होते. तीच ती बालकवींची फुलराणी. एखादे दिव्य ज्ञान व्हावे, तशी अनुभूती आली आणि माझ्याशी ती 'फुलराणी' बोलायला लागली. आपली स्वयंवरकथाच तिने मला सांगितली.

फुलराणी (एक दांडी / Tridax procumbens)

पाने, बाप, काका, मामा
पेंगतात, लोळतात
खडबडून उठती
येता मुलगी वयात

कडे करून पानांचे
कौतुकाने उचलते
मीही ठावो न सांडिता
रविकराला भेटते

रूप पाहता दर्पणी
न दिसे वो आपुले
नवरदेवाच्या रूपाचे
मीही छान फूल झाले

(चाल बदलून)
जिराफ मानेखालील माझ्या
कॉलर झाली ताठ त्या क्षणी
द. भि. म्हणाले, माझ्या कवीला
'बालकवींची मी फुलराणी'

एकदांडी, दगडी, जखमजोडी या वनस्पतीची सर्वांना विनंती आहे की, यापुढे तिला फुलराणी हे नाव मिळावे. याच नावाने तिला संबोधले जावे. फुलराणी ही एक विज्ञान कविता आहे. कारण जमिनीवर लोळणारी या जातींतील ही वनस्पती तिला फुलं आली की, उठून उभी राहते.

कारवी नावाचे एक वैशिष्ट्यपूर्ण झुडूप सातारा जिल्ह्यात पाहायला मिळते. याचे वैशिष्ट्य हेच की, त्याला आठ-दहा वर्षांनी एकदाच फुले येतात. मध्य भारतातही ते आढळते. इतर वेळी म्हणजे फुले नसलेल्या वर्षात नुसती हिरवीगार पाने फक्त असतात. फुलाला हिरवी छदे असतात. सुंदर जांभळा रंग फुलांना असतो. कास पठार, आंबोलीचे कावळेसाद पठार, राजगड, माथेरान आदी ठिकाणी कारवी फुलल्याचे कळणे ही पर्यटकांसाठी पर्वणी असते. कारवी मधमाश्यांची फार आवडती फुले आहेत. या मधात काही विशेष औषधी गुण असतो, असे म्हणतात. उघड्या टोपलीच्या आकारात वाढणारी माळ-कारवी हे कास पठाराचं खास वैशिष्ट्य आहे. फुलण्याच्या वर्षी ही फुलं ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्येच येतात.

ज्याच्या असे असण्याची कल्पनाच मोठी सुंदर आहे, त्या लाजाळूच्या झुडुपाला इथेच भेटून घेऊ. हे गुडघ्याइतके उंच होते. याच्या खोडाला काटे असतात. याच्यासंबंधी आश्चर्याची गोष्ट म्हणजे, त्याची पाने आपला अंगस्पर्श जरा जोराने झाला की मिटतात, ही होय. जनावराचेसुद्धा तोंड लागले किंवा जोराने वारा आला, तरीसुद्धा असे घडते. या चमत्काराला पाहून जनावरेसुद्धा बिचकतात. गंमत आहे, नाही?

मी असे एक सुंदर वाक्य वाचले, ज्यामुळे झाडांकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोनच बदलून गेला. ते वाक्य आहे, Ugly tree is yet to be born. जगात कुरूप म्हणता येईल, असे झाड अजून जन्मायचे आहे. प्राणी कुरूप असतात, असू शकतात; पण झाड मात्र कधीही कुरूप असू शकत नाही. फक्त आपला दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. माणसाने केवळ आपल्या उपयुक्ततेच्या भूमिकेतून झाडांकडे पाहणे अन्यायकारक आहे.

बिब्बा या झाडाचे उदाहरण घेऊ. माझ्या आजीला बिब्ब्याचे अनेक औषधी उपयोग माहीत होते. बाकीचे जग मात्र बिब्ब्याला भिणारे, त्याचा तिरस्कार करणारेच मी पाहिले आहे. मला दहा-अकरा वर्षांपर्यंत 'पोटातलं येण्याचा' त्रास होता. एखाद्या भात्यासारखे पोट छातीच्याही वर उडायचे. आजी गोडेतेलाच्या दिव्यावर बिब्बा धरून त्याचे तीन-चार मोठे थेंब दुधात पाडायची आणि ओठ किंवा आजूबाजूला त्याचा संसर्ग होणार नाही, अशी काळजी घेत मला ते प्यायला लावायची. बिब्बा ठेचून, चुन्यात कालवून पायाला लावला तर पाय दुखणे थांबायचे.

सुईच्या अग्राने ती डोळ्यांतसुद्धा बिब्बा लावायची. ठेच लागली तर ठेचून लावलेला बिब्बा जखम त्वरित बरी करायचा. इकडे शाळेत मला मातीचे वांगे आणि बिब्बा ही दोन फळं करायला आवडायची, कारण त्यांचे रंग. काळ्या गोट्याखाली शेंदरी फूल किती गोड असे; फक्त ते खाताना तोटरा बसायचा. मग आम्ही वासणीच्या वेलाचा दोर करून त्यात हे शेंदरी बिब्बेफूल ओवायचो. बिब्ब्यासारखे सुंदर औषध नाही, एवढे मात्र खरे!

दोन सुगंधी पानांनी मला खूप तरसत ठेवलं आहे. त्यातलं एक पान केवड्याचं. कवितेत आणि गाण्यात खूप भेटला, पण प्रत्यक्षात कमी. एक तर त्याचं घडी केलेलं पान एखाद्या पुरंध्रीच्या केशकलापात असायचं किंवा गणपतीच्या पूजेत. कोकणात जेव्हा पहिल्यांदा गेलो, तेव्हा दिवेआगरला समुद्रकिनाऱ्यावर केवड्याचे बन पाहून अक्षरश: वेडा झालो. इतकी झाडं, इतकी कणसं, इतकी पानं... वाह वा! प्रत्येक झाडाला जवळजवळ पंचवीस-तीस पिवळीधम्म कणसे होती. केवड्याचे अत्तर मात्र मला आवडत नाही. उग्र सुगंधाच्या बाबतीत मी रजनीशभक्त आहे. केवड्याच्या पानाचा एक तुकडा भातात शिजवताना टाकला, तर भाताला आंबेमोहोरसारखा वास येतो. केवडाधारी कोकणवासीयांनो, आपण धन्य आहात.

केवड्याला बागेत लावण्याचा प्रश्नच नव्हता; पण दुसरं पान, मरव्याला बागेत लावण्याचा मी अनेकदा प्रयत्न केला- पण हाय! तेही मला जुमानत नव्हते. माझ्याकडे येती ती ही बहुवर्षायू वनस्पती आहे. तीसुद्धा 'शालू हिरवा, पाचू नि मरवा, वेणी तिपेडी घाला' या भौगोलिक अवस्थेत पाहण्यावरच समाधान बाळगावं लागलं. इवलंच पण बोटात पकडून चुरगळावं असं पानआणि फुप्फुसात भरून घ्यावा, असा अनवट गंध. 'स्वामी' कादंबरीत माधवरावांच्या तोंडी 'अत्तर जरी झालं, तरी चुरगळल्याखेरीज दरवळत नाही', हे विप्रलंभ शृंगाराचे वाक्य आहे. मरव्याला ते अधिक लागू आहे. इंदिरा संतांची कविता वाचली नसती, तर कदाचित मरव्यावर एवढे प्रेम जडले नसते!

> असेच काही द्यावे... घ्यावे
> दिला एकदा ताजा मरवा;
> देता घेता त्यात मिसळला
> गंध मनातील त्याहून हिरवा

कसा असतो बरं हा 'हिरवा गंध'? इंदिराबाई असत्या तर त्यांना विचारले असते. भेटलोय मी त्यांना. असे काही विचारले असते, तर त्यांनी फक्त स्मित केले असते.

> रंग बाते करें, और बातोंसे खुशबू आए
> दर्द फुलों की तरह महके, अगर तू आए

ही गझल मला कळते, तर मग मरव्याच्या गंधाचे हिरवेपण का बरे अनुभवता नाही येणार? यायला पाहिजे. मला येतं.

फुलं कोणती असावीत? रंगीबिरंगी का सुगंधी? भारतीय परंपरा सुगंधी फुलांना मानणारी आहे. अध्यात्म रामायणात म्हटले आहे की- जेव्हा अयोध्येत रामाला राज्याभिषेक झाला, तेव्हा सगळी गंधहीन पुष्पे सुगंधी झाली. मी ही मर्यादा स्वत:ला का घालून घेऊ? मला गंध नसलेली पण रंगीबिरंगी फुलंदेखील आवडतात. कारण 'रंग बातें करें'! रंगांची भाषा मला आकृष्ट करते. बोलावते. आणि हे रंगबावरेपण मला तिकडे घेऊन जाते. मी खेड्यातून शहरात आलो नि मला सर्वांत आधी भेटली, ती रंगीत फुलझाडेच. तेव्हा मला त्यांचा नावानिशी परिचय नव्हता. पुढे आम्ही केलेल्या आंदोलनामुळे परभणीला कृषी विद्यापीठ मिळाले. तिथे रंगीत फुलझाडांना स्वतंत्र स्थान होते. तेव्हा मी त्यांचा नावानिशी अभ्यास केला, निरीक्षण केले.

ॲस्टर नावाचे फूल माझ्या अजून लक्षात आहे. लाल, पांढरे आणि निळे अशी ॲस्टरची तीन रंगातील फुले कृषी विद्यापीठात होती. स्तबकात जांभळ्या फुलांची अनेक स्तबके आठवतात. स्तबकात बाहेरची किरण-पुष्पके जिव्हाकृती, द्विलिंगी व फलनक्षम; आतील बिंब-पुष्पके तशीच पण नलिकाकृती असतात. ॲस्टरच्या फुलांना आलेला बहर सुमारे महिनाभर टिकतो.

ड्युरांटाचे झाड मात्र बहुवर्षायू आहे. याची खोडे काटेरी असल्यामुळे याचा उपयोग कुंपणासाठीही करतात. ड्युरांटाच्या दोन जाती आहेत. एकाची फुले पांढरी व दुसऱ्याची निळी असतात. फुलांची पाच संदले असून ती संलग्न असतात. डालियाची उंची एक ते दोन मीटर असून पर्णपत्राची लांबी आठ ते दहा सेंमी असते. याचे खोड काळसर असते. त्यावर पाने समोरासमोर येतात. फुले मुख्य खोडाच्या व फांद्यांच्या टोकाशी येतात. बिंब चार सेंमी असते व ते पिवळे असते. बिंब-पुष्पकाभोवती पापुद्र्यासारखे पारदर्शी वेष्टन असते. किरण-पुष्पकाचे तीन-चार घेर असतात. छदे किरणांपेक्षा पुष्कळ आखूड असतात. प्रदलांचा रंग किरमिजी, जांभळा, पिवळा अथवा पांढरादेखील असतो.

कोयनेल हे प्रसिद्ध झुडूप ड्युरांटाप्रमाणेच कुंपणाच्या कडेने लावतात. फुलोरे तीन फुलांच्या गुच्छाने येतात. फुलांत संदले आणि प्रदले पाच-पाच आणि संलग्न असतात. संदलांचा रंग हिरवा असून त्यांची नळी लहान असते. प्रदलांचा रंग पांढरा असून त्यांची नळी लांब असते. क्लेरोडेंड्रोनचे फूल संध्याकाळी उमलते.

जिरेनियम माझं आवडतं फुलझाड. मी डॉ. सुधीर रसाळ यांच्या बागेत प्रथम पाहिलं. कुंडीत लावलेलं. याचे खोड हातभर उंच वाढते, पण तेवढ्यातच त्याला पाने-फुले येतात. फळे येतात. बी धरते. याची पाने वाटोळेसर असतात. काठाशी तरंग असतो. पान चुरगाळले म्हणजे विशेष सुगंध येतो. पानाच्या बगलेत सहा-आठ फुले येतात, ती विविध रंगांची असतात. डॉ. रसाळांकडे पाहिलेले फूल लालभडक होते. फुलांना सुगंधही असतो. बागशाहीत शोभावे असेच हे झाड. जरबेरा हे असेच शोभिवंत फुलझाड. याचा कंद असतो. वर येणारी पाने वीत-दीड वीत लांब असतात. मधून फुलांचा दांडा येतो. फूल पाच-सहा सेंमी रुंद असते. त्यात बिंब आणि किरण-पुष्पके असतात. त्यांचा रंग नारिंगी असतो. हे सुंदर झाड दक्षिण आफ्रिकेतून आपल्याकडे आले आहे.

झिनिया हे सूर्यफूल कुलातील फुलझाड असून याच्या वीस जाती आहेत. पाने समोरासमोर, बिनदेठाची, खरबरीत, अंडाकृती व सुमारे अडीच सेंमी रुंद असून सुंदर फुलोरे फांद्यांच्या टोकास येतात. स्तबकातील किरण-पुष्पके व बिंब-पुष्पके यांचे विविध रंग असतात, पण त्यात हिरवा व निळा हे रंग नसतात.

सध्या गॅलार्डियाला फुले आलेली आहेत. याची उंची पन्नास ते शंभर सेंमी असते. याचे खोड चपटे व किंचित त्रिकोनी असते. पाने एकांतराने येतात. फुलांचे गेंद चार सेंमी रुंद असतात. प्रदले किरमिजी असून त्यांची टोके पिवळी असतात. कॉसमॉस हे मेक्सिकोतून भारतात आणलेले एक सुंदर फूल असून, त्या नावाच्या बँकेत नोकरी करणाऱ्याला तरी हे फूल परिचित असायला हवे. आत्ता, सध्या त्याला फुलं आलेली आहेत. त्यात थोडीशीच किरणे असतात. ती रुंद-रुंद असतात. प्रदलांचा रंग पांढरा किंवा गुलाबी असतो. अशी ही सुंदर ती दुसरी दुनिया.

ही होती विदेशी, रंगीबिरंगी फुलांची झुडपं. आता दोन-चार विदेशी रंगीबेरंगी फुलांच्या वृक्षांकडे वळू या. पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरासमोरून जाताना राणीच्या पुतळ्यामागे काही अशी फुलं पडलेली असायची की, मला वाटायचं- पाडळ या माझ्या लाडक्या फुलांचं ते उत्क्रांत रूप नाही ना? पण पाडळ हा खास भारतीय आहे. मग मला त्या फुलांचे नाव कळाले- ट्रम्पेट फ्लॉवर. ट्रम्पेट म्हणजे तुतारी. प्रचंड संख्येने खाली पडलेली फुलं जवळ घेऊन पाहिली, तर ती नलिकाकार, कर्ण्यासारखं पसरलेलं तोंड असलेली होती. चांगली तीन-चार इंच लांबीची फुलं. फिकट गुलाबी-पांढरट रंगाच्या, पातळ झालरीच्या फुलांच्या अंतर्भागात जाणवेल न जाणवेल असा हलकासा पिवळा रंग असतो. गगनभेदी उंची, ऐसपैस पसारा आणि बारमाही फुलांची संगत बाळगणारे हे वृक्ष. त्यांना वीतभर लांबीच्या शेंगाही येतात.

सध्या स्पॅथोडिया या पूर्व आफ्रिकेतून आलेल्या झाडाला लाल-केशरी रंगाची भडक फुलं आलेली आहेत. ट्युलिप ट्री हे त्याचं आणखी एक नाव. चांगला वाढला तर तीस-पस्तीस फूट उंची सहज गाठतो. याला वर्षातून दोनदा बहर येतो. नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये एकदा आणि फेब्रुवारी-एप्रिलमध्ये एकदा. तळव्याएवढे मोठे कळ्यांचे गुच्छ आधी येतात. त्यामध्ये एकात एक अशा वर्तुळाकार रचनेत बाहेर मोठ्या, तर मध्याकडे कच्च्या कळ्या असतात. फुलांचा आकार ट्युलिप फुलासारखा असून फुलांचे तोंड आकाशाकडे असते. रत्नागिरी भागात हे झाड मोठ्या प्रमाणात दिसेल.

माझ्या बायकोने- प्रज्ञाने एका नव्या फुलाचा शोध लावला. फुलाच्या रचनेत महादेवाची पिंड आणि त्यावर नागाचा फणा धरलेला- असे होते. छान सुगंधही होता. आम्ही आनंदाने महाजनसरांना फोन करून वर्णन सांगितले. तेव्हा त्यांनी त्या फुलाचे नाव सांगितले, कैलासपती. कोकणात देवाचिये द्वारीदेखील विकायला ठेवलेली ही फुले दिसली. बालगंधर्व रंगमंदिरात, पुणे मनपाच्या मुख्य इमारतीबाहेर अशी ही झाडं शोधण्याचा नादच लागला. पण जेव्हा कळले की- हे भारतीय झाड नसून, दक्षिण अमेरिकेतून आलंय, तेव्हा फार विरस झाला.

कैलासपतीचं वनस्पतीशास्त्रीय नाव आहे- कौरोपिटा गायनेन्सिस. हा दहा ते वीस मीटर उंच वाढतो. त्याचे खोड मजबूत, खरखरीत, गर्द तपकिरी रंगाचे असते. हिवाळ्यात तो फुलायला आरंभ करतो. त्याचे वैशिष्ट्य म्हणजे, फुले मुख्य खोडावर आणि मोठ्या फांद्यांवर लोंबणाऱ्या जाडसर शाखांवर येतात. ॲस्टर, ड्युरांटा, जिरेनियम, झिनिया

नावानं विदेशी झाडं ही. पण ज्यांच्याजवळ ती असतात, त्यांना केवढं सुख देतात! मला तर बुवा बायको आणि प्रेयसी, आई आणि वडील, नातेवाईक आणि मित्र या सर्वांनी मिळून जेवढं प्रेम दिलं असेल, त्यापेक्षा किती तरी जास्त प्रेम झाडांनी दिलंय. पुढील शेर मी प्रियजनांना उद्देशून कधी म्हटला नसेल, एवढा माझ्या वृक्षवल्लींना उद्देशून म्हणालो आहे- खरंच!

आप जिनके करीब होते है
वो बडे खुशनसीब होते है

मी माझ्या झाडांशी खूप-खूप गप्पा मारल्या आहेत. त्यांना उद्देशून गाणी म्हटली आहेत. विद्यानगरमध्ये शिरीषाजवळ प्लॉट घेऊन मी घर बांधले, तेव्हा तर मी केवळ झाडांमध्येच दंग होतो. तिथे फुलारी नावाचे माझे मित्र सख्खे शेजारी होते. त्यांनी आणि मी एका वेळी अळूचे (चमकोरा) गड्डे आणून लावले. तीन महिन्यांत त्यांचे अळू वाळून गेले. मला त्यांनी जाब विचारला, तेव्हा मी म्हणालो, 'मी रोज त्यांना गाणं म्हणतो.' फुलारी माझ्या घराला चिकटून पण वरच्या मजल्यावर राहायचे. त्यांनी तळमजल्यावरच्या त्यांच्या भाडेकरूला खरे-खोटे विचारले. ते म्हणाले, 'खरं आहे. तो तुमचा मित्र वेडाच आहे.'

याच घरात मी लॉन लावण्याचा प्रयत्न केला. मला मलेरिया झाला. महाजनसरांनी लिहिलं होतं, 'लॉन लावू नये.' म्हणून मी लॉनपुढे हात जोडून म्हणालो, 'सॉरी. पण मला तुम्ही नकोत.' पंधरा दिवसांत लॉन स्वत:हून जळून गेलं.

आणखी एक घटना याच घरातली. घरातून गेटपर्यंत जाताना डाव्या हाताला मी 'दिन का राजा' नावाचे झाड लावले होते. माझ्याएवढेच ते उंच झाले होते. येता-जाता त्याच्या शेंड्यावरून मी प्रेमानं हात फिरवायचो आणि स्नेहार्द्र दृष्टीने त्याच्याकडे पाहायचो. हा भास नाही, पण त्याच्यापर्यंत पोहाचायच्या आतच दिन का राजा जाणवेल इतका माझ्याकडे झुकत असे. हे मी जगदीशचंद्र बोस यांच्या सिद्धान्तावरून किंवा पुस्तकी अनुभवावरून सांगत नाही.

अलीकडचा अनुभव. पुण्यात २०११ मध्ये फ्लॅट घेतला आणि वाटले- छोटी का असेना, पण आपली बागशाही हवीच. बायकोचे आवडते म्हणून पहिले झाड अनंताचे आणले. पाच वर्षे पाणी घालून मेलो, पण गडी फूल काही देईना. त्यानंतर अनंत भालेराव यांची जन्मशताब्दी आली. ते एक माझं जिव्हाळघरटं होतं. ती साजरी करण्याचा भाग म्हणून अनंताचे नवे रोप आणले. अनंतरावांना मी 'अण्णा' म्हणायचो. याही रोपाशी अण्णा म्हणून मी वागायला, बोलायला लागलो. एकदा-दोनदा तर रडलोही त्यांच्याजवळ. रोज पाणी देताना त्यांच्या पाया पडायचो, तसा नमस्कार करायचो. बोलायचो. जन्मशताब्दी वर्षात टपोऱ्या सहा-सात कळ्या आल्या आणि 'अण्णा' खुलले!

मी मूलत: आणि अंतिमत: एक शेतकरी. शेतकऱ्यांच्या जीवनात मोठ्या सुगीत- म्हणजे नोव्हेंबर-डिसेंबरात येणारी खळीदळी आणि बागायती शेती असेल, तर उसाचं गुऱ्हाळ ही फार मोठी आणि महत्त्वाची घटना असते. मराठवाड्यात ज्वारी हेच महत्त्वाचे पीक आणि वर्षभर खावयाचे धान्य असल्यामुळे ज्वारीच्या खळ्याला अतिशय महत्त्व असे. खळ्यांचा काळ कदाचित थोडाबहुत पुढे जात असेल, पण उसाची गुऱ्हाळं सुरू होण्याचा हंगाम याच महिन्यातला, यात शंका नाही.

खळं म्हटलं की, ते ज्वारीचं. इतकं साग्रसंगीत खळं इतर कोणत्याही पिकाचं होत नाही. एक प्रकारे सुगीचा कळसाध्याय असतो खळं. पुढील सर्व वर्ष याच पिकावर अवलंबून असतं. पुढील वर्षीची ज्वारी येईपर्यंत ही ज्वारी पुरली पाहिजे, असा ध्यास असायचा. पूर्णपणे पक्व झालेली ज्वारी 'पाडायला' आली की, खळ्याचा सोहळा सुरू होई. पाच-सहा माणसं आपापली पाती धरून ज्वारी पाडायला आरंभ होई. हे करताना कंबरेला आडवे पोते बांधत. ज्वारी उपटण्याच्या कामात अंगावरचे धोतर फाटता कामा नये.

गोळा केलेल्या ज्वारीच्या पेंढ्या बांधून जिथे खळे करायचे, त्या जागेभोवती गोल रचून ठेवत. पाणी टाकून आणि धम्मस करून ही जागा खळ्यासाठी पक्की करून ठेवत. खळ्याचे सात टप्पे करता येतील. पाडणी, बांधणी, गूड गोळा करणे, मोडणी, मळणी आणि शेवटी उधळणी. पहिले तीन टप्पे पुरुषगडी पार पाडत. मोडणीसाठी महिलांना पाचारण करीत. पेंढ्याची कणसे मोडून ती 'मदना'त टाकणे हे त्यांचे काम. मोडणीचे काम पूर्ण झाले की, शेताचा मालक कणसांच्या स्वरूपात बायकांना मजुरी अदा करत असे. हे सगळे हास्यविनोद करत, खेळीमेळीच्या वातावरणात चाले. बायकांना उखाण्यातून नवऱ्याचे नाव घ्यायचा आग्रह होई. बायका नाव घ्यायला उशीर लावीत. त्या वेळचे त्यांचे लाजणे, नखरे, मनाशी शब्दयोजना आठवणे- हे चेहऱ्यावरचे भाव पाहण्यासारखे असतात. त्यांच्या

उखाण्यातूनही निसर्ग आणि कृषिसंस्कृतीचे मनोज्ञ दर्शन घडत असे–

दात मोठा नांगराचा । फूल मोठं कापसाचं
धर्म मोठा कुणब्याचा । अन् मन मोठं... रावांचं

त्यातही पुन्हा प्रचंड आशावाद आणि आत्मविश्वास...

दुधी भोपळ्याचा वेल
छपरावर फुलणार
....रावांनी केला पेरा
पीक भरपूर येणार...

केशवने आपल्या ललितगद्यात या सगळ्यांचे सुंदर वर्णन केले आहे. मोडणी झाली की, मळणी सुरू व्हायची. खळ्याच्या आकाराप्रमाणे दोन–चार असे बैल खळ्याच्या मध्यभागी रोवलेल्या मेढीला (खांब) बांधून त्यांच्या तोंडाला मुंगसे बांधून मळणी सुरू करीत. किती तरी घंटे ही मळणी सुरू राहायची. दाताळ्याने कणसं खालीवर करावी लागायची. मळणी झाल्यानंतर बैल सोडून खाकऱ्या व कंडऱ्या गोळा करून बाहेर टाकायच्या. त्यानंतर भुसासह ज्वारी खळ्याच्या एका बाजूस गोळा करायची. हे ज्वारीचे मदन आता तिवशावरून उधळायचं असतं. तिव्ह्यावरचा हात उंच करून वाऱ्याच्या अंदाजानुसार उधळीत राहायचं. खळ्याच्या सोहळ्याचा शेवट घरात धान्य येणे आणि कणगीत भरून ठेवणे यात व्हायचा.

खळ्यापेक्षा गुऱ्हाळाचा सांस्कृतिक, सामाजिक आणि कौटुंबिक आशय महत्त्वाचा असतो. मराठवाड्यात गुऱ्हाळासाठी 'थळ' हा शब्द आहे. गुऱ्हाळ सुरू झाले की, महिना–महिना चालू राहायचे. एखाद्या गोष्टीची लांबण लागली त्यासाठी 'गुऱ्हाळ लावणे' हा वाक्प्रचार आहे, तो याच कारणाने. किती तरी प्रकारची कौशल्ये असलेली माणसे गुऱ्हाळासाठी काम करीत असत. ऊसतोड कामगार, प्रत्यक्ष चरकावर आणि भट्टीवर काम करणारे. प्रत्येकाला आगळेवेगळे नाव. गुळण्या काय, जाळण्या काय! चुलांगणावर ठेवलेल्या कढईतून गूळ काढण्याचे काम करतो तो गुळण्या, तर चुलांगणात जाळ घालण्याचे काम करतो तो जाळण्या. चरकात घातलेल्या उसाची चिपटी पलीकडच्या बाजूने निघायची आणि खाली रसाची धार लागायची. रस आटवण्याची भली मोठी कढई एक–दीड फूट उंच व आठ–दहा फूट लांबीच्या घेराची असायची. ही कढई चुलांगणावर ठेवून तिला खालून सारखा जाळ लावत. रसाचे गुळात रूपांतर होईपर्यंत जाळ लावला जाई. उकळी फुटताना फेस म्हणजे मळी वरच्या बाजूस जमा होई. गुळव्या भल्या मोठ्या (लाकडी) उलथण्याने रस ढवळीत राही आणि मोठ्या झाऱ्यासारख्या साधनाने येणारी मळी बाहेर काढी. आता गूळ तयार होतोय. मग ही कढाई उतरून घेत. जमिनीत ढेपीच्या आकाराचे खड्डे करून ठेवलेले असत. या खड्ड्यांवर कापड टाकून त्यात, थोडा थंड झाल्यावर रस ओतला जात असे. दुसऱ्या दिवशी घट्ट होऊन गुळाची ढेप तयार व्हायची. गुऱ्हाळावर येणाऱ्या बिनओळखीच्या माणसांनासुद्धा उसाचा रस मोठ्या प्रेमाने दिला जाई. या निमित्ताने सगळे पाव्हणे–रावळे जमा होत. लेक–जावई, विहीण–व्याही– सगळे. एक आनंदोत्सव असे. मला गुळाचा पाक फार आवडायचा. भाकरीसोबत तो असला की, बाकी जेवणात कशाची गरज नसे. गुळाच्या पाकाला इकडे काकवी म्हणतात. आनंदाची गोष्ट ही आहे की, गूळ कालबाह्य कधी झाला नाही न् होणार नाही. पुरणाची पोळी ही गुळाचीच छान होते. साखर हा गुळाचा पर्याय कधीही होणार नाही, उलट सध्या सेंद्रिय गुळाची एक लाट आलेली आहे. गुऱ्हाळ शब्द गेला, तरी गुळाचे कारखाने निर्माण झाले आहेत. काही खाद्य पदार्थ तर गुळाचेच चांगले लागतात. अनारसे, कैरीचे पन्हे, आंबट वरण, तिळाचे लाडू, गुडदाणी! माझ्या घरी लाडवाचा एक खास प्रकार केला जातो– गुळपापडीचे लाडू!

नोव्हेंबर महिना एकंदरीत आनंदाचा असतो. घरात आणि शेतात दोन्हीकडे. गुऱ्हाळासारख्या घटनेने तर घराचे नंदनवन होते. ही गुऱ्हाळाच्या निमित्ताने माहेरी आलेली लेक काय म्हणते बघा–

चला जाऊ पाह्या ऽ तेच्या गुऱ्हाळघराला ऽऽ
मखमालीचं पडदं ऽ सोडलंत मांडवाला ऽऽ
हाकावर ऽ हाका ऽ गुराळाच्या लेका ऽऽ
सांगा गुळण्याला ऽ तुझी कव्हई आली पाका ऽऽ
कव्हई आली पाका ऽ लोणी टाकून थीर करा ऽऽ
बंधव्याला माझ्या ऽ गुळण्याला हाका मारा ऽऽ
शेजी गऽ नटऽती ऽ मान्याच्या ताकायाला ऽऽ
सक्याच्या गुराळाऽ त ऽ आली कव्हई पाकायाला ऽऽ
कव्हई आली पाका ऽ इंद्रसभंला गेला वास ऽऽ
असा भागेवान बंधू ऽ वरसाभरा ऽ लावी ऊस ऽऽ

**प्रा. विश्वास वसेकर,** पुणे
Mob. : 9922522668

कांद्याची कैफियत : ५



धनंजय सानप

# सरकारी धोरणांचा वांदा

आतापर्यंतच्या लेखांमध्ये सर्वांत महत्त्वाचा हा शेवटचा पाचवा लेख आहे. शेतीचा हा राजकीय प्रश्न आहे, त्यामुळे त्याचा संबंध राजकीय व्यवस्थेशी कुठल्या ना कुठल्या प्रकारे येतोच. या संपूर्ण अभ्यासदौऱ्यात सरकारच्या भूमिकेबद्दल असो वा धोरणाबद्दल– शेतकऱ्यांमध्ये प्रचंड प्रमाणात राग आणि संतापाच्या भावना दिसून आल्या. 'सरकारच्या आडमुठ्या धोरणामुळे आमचं जीवन उद्ध्वस्त झालं' इथपासून ते 'माध्यम म्हणजे सरकारचे चमचे' इथपर्यंतच्या शेतकरी, व्यापारी आणि अभ्यासकांकडून प्रतिक्रिया आल्या. अर्थात प्रत्येकाच्या त्या तत्कालीन आणि भावनिक पातळीवरील प्रतिक्रिया असतील असे गृहीत धरले, तरीही त्या निर्माण होण्याची कारणे कोणती आणि यात खरंच किती तथ्य आहे, याचा आढावा सरकारी धोरणांना मध्यवर्ती ठेवून घेण्याचा हा प्रयत्न आहे.

या लेखात विस्तृत विवेचनाच्या मर्यादा असल्याने थोडक्यात, पण थेट अशा पद्धतीने हा विषय हातळण्याचा प्रयत्न राहील. आणखी एक मोठी शोकांतिका म्हणजे, कांदा ह्या पिकासाठी सरकारचे ठाम असे कुठलेही धोरण नाही. म्हणून त्यावर शेतकऱ्यांची–अभ्यासकांची अपेक्षा आणि मते लक्षात घेणे आवश्यक वाटले. या लेखात काही लेखकांच्या लेखांचा, पुस्तकांचा आणि मतांचा उल्लेख करण्यात आला आहे. सरकारची धोरणे, सरकारी निर्णय, शेतकऱ्यांसाठीच्या योजना, शेतकऱ्यांच्या अपेक्षा, निर्यात–आयात आणि अनुदान इत्यादी विषयांचा आढावा घेतला आहे.

**धोरणांचा लकवा**

'डोळ्यांत पाणी आणणारा कांदा', हे वाक्य आपण कुठे तरी ऐकलेलं असेलच. त्यामुळे सर्वसामान्य लोकांसमोर मात्र कांद्याची नकारात्मक प्रतिमा तयार करण्यात आलेली आहे, असा प्रचार माध्यमांनी केला. यात माध्यमांची चूक आहे हे मान्य केले, तरी एक वास्तव नाकारता येत नाही. ते म्हणजे, आतापर्यंतच्या सर्वच सत्ताधारी व राजकीय पक्षांनी कांद्याला सातत्याने मध्यमवर्गीय लोकांना आपल्याकडे वळवून ठेवण्याचे साधन म्हणून पाहिले आहे. हे ठाम धोरणाच्या अभावाला काही प्रमाणात कारणीभूत आहे.

निर्यात–आयातीचे खेळ खेळून सरकार शेतकरी वर्गाला जेरीस आणण्याशिवाय काहीही एक करत नाही. आजवरच्या कृषिक्षेत्रातील स्थित्यांतरांच्या अनुषंगाने विचार केला तर असे दिसेल की, एक दीर्घ काळ एकाच समस्येवर एकाच वेळी विविध क्षेत्रातील व्यक्तींनी लक्ष घातले तर ती समस्या सुटते. म्हणजे सध्याच्या कालखंडात कांद्यासंबंधित उत्पादनापासून ते निर्यातीपर्यंत अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत, अशा वेळी अर्थकारण, राजकारण, तंत्रज्ञान, माध्यम आणि कृषी क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींनी एकत्र येऊन सर्वच क्षेत्राचा सहानभूतीपूर्वक विचार करून उत्पादकांच्या प्रश्नांची सोडवणूक केली पाहिजे. कांदाउत्पादक वर्ग आज ज्या प्रकारे या विविध क्षेत्रातील लोकांबद्दल मनात एक प्रकारे राग, संताप आणि द्वेष बाळगून आहे ते लक्षात घेता या दोन सामाजिक घटकांमधील दरी रुंदावत जाईल. यास सामाजिक समूह म्हणून आपल्यातला प्रत्येकजण जबाबदार असेल.

कृषी-अभ्यासक रमेश जाधव म्हणतात, ‘‘मागील किमान दोन दशकांपासून कांद्याच्या दरातील चढ-उतारांचं ठरावीक चक्र आपण अनुभवत आहोत. भाव वाढले किंवा कमी झाले तरी दोन्ही परिस्थितींमध्ये सरकारचा एक ठरलेला प्रतिसाद असतो. यातून मूळ प्रश्नावर तोडगा मात्र निघत नाही. ही स्थिती बदलण्यासाठी काही दीर्घ कालावधीच्या उपयायोजनांची आवश्यकता आहे. एक म्हणजे, कांद्याच्या लागवडीचे क्षेत्र आणि उत्पादनाचा संभाव्य अंदाज याची अचूक आकडेवारीच सध्या मिळत नाही. त्यामुळे सरकारचे सगळे नियोजनच फसते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आणि शेतकऱ्यांना सहभागी करून घेऊन या समस्येवर मार्ग काढणे सहज शक्य आहे.’’

सरकारच्या स्तरावर चालणारा हा गोंधळ कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या जीवावर उठतो. भाव वाढले आणि भाव पडले, म्हणून दोन्ही बाजूने थंड राहणाऱ्या सरकारी यंत्रणेने गाजर दाखवण्याचे काम सातत्याने केले आहे. सटाणा तालुक्यातील शेतकरी भूषण भदाणे म्हणतात, ‘‘आता बघा ना- भाव चढले म्हणून सरकारने कांद्यावरची किमान आधारभूत किंमत वाढवली, दुसरीकडे साठवणीवर मर्यादा आणली. एवढे काय ते पुरे नव्हते, म्हणून निर्यातीवर बंदीचा शिका मारला. अशा चक्रात शेतकऱ्यांला फसवले आहे.’’

धोरणलकव्याने कृषी क्षेत्राला कमी-अधिक फरकाने जेरीस आणले आहे. कांद्याचे पुढच्या पाच वर्षांचे निर्यात धोरण आणि हमीभाव ठरवण्यासाठी केंद्र सरकार कधी तरी बैठक घेते. मात्र त्यामध्ये काय निर्णय होतात, याबाबत संभ्रमाची स्थिती अधिक असते. अशा बैठकांमध्ये मात्र कधी शेतकऱ्यांचे प्रश्न मांडले जात नाहीत. फार तर तात्पुरते निर्णय जाहीर करून मलमपट्टीचा उपाय तेवढा अमलात आणला जातो. रमेश जाधव यांच्या मते, ‘‘आजघडीला कांदा साठवण्यासाठी तुटपुंज्या सुविधा उपलब्ध असल्यामुळे सुमारे ९५ टक्के कांदा ताजाच खपवावा लागतो. विकसित देशांप्रमाणे साठवणुकीची साधने भारतात उपलब्ध नाहीत.’’

शेतमाल बाजार अभ्यासक दीपक चव्हाण यावर म्हणतात, ‘‘भारतात पारंपरिक चाळींमध्ये ६० लाख टन कांदा साठवला जातो. यातील ८० टक्के कांदा महाराष्ट्रातला असतो. पारंपरिक साठवणुकीमुळे यातील २० टक्के वाया जातो. म्हणजे हाच वीस टक्के जवळपास १२ लाख टन कांदा जर उपलब्ध राहिला, तर सरकारपुढे भाववाढीचा प्रसंग उभा राहणार नाही.’’

२० टक्के कांदा वाया जातो म्हणजे त्याचा भार एकूण उत्पादनक्षमतेवर येतो. ज्या काळात निसर्ग साथ देत नाही, अशा वेळी वाया जाणाऱ्या कांद्यात वाढ होते. परिणामी, देशात कांद्याचा तुटवडा निर्माण होतो. भाववाढ व्हायला लागली की, आयात करण्यापासून ते साठवणीवर मर्यादा आणण्यापर्यंतचे निर्णय घेतले जातात. भाववाढीमुळे शेतकऱ्यांना होणारा फायदा सरकारच्या ऐनवेळी घेतलेल्या आडमुठ्या निर्णयामुळे हिसकावून घेतला जातो. अशा वेळी बाजारपेठा नियंत्रित करणाऱ्या सरकारला मात्र शेतकऱ्यांचा विचार करावा वाटत नाही.

**भाव कसे पडतात?**

नाशिक जिल्ह्यातील लासलगाव येथील बाजारपेठेतून लाल कांद्याची मोठ्या प्रमाणात निर्यात केली जाते. नाफेडमार्फत ही निर्यात व्हायची, पण आता त्यात अनेक एजन्सींची भर पडली आहे. उच्च प्रतीचा आणि चांगला पोसलेला कांदा भारतातून निर्यात केला जातो. जागतिक बाजारपेठांत भारताचा १२ टक्के कांदा निर्यात होतो. सन १९५० मध्ये ५ हजार टनांपेक्षा अधिक कांदा निर्यात केला गेला होता, तर २०१६-१७ मध्ये भारताची निर्यात ३४ लाख ९२ हजार टन झाली आहे. म्हणजे मागच्या ७० वर्षांत हजारातील निर्यात टनांच्या लाखात पोहोचली आहे. त्यामुळे भारत हा पारंपरिक निर्यातदार देश आहे, असे म्हणता येते. शेतकऱ्यांनी उत्तम प्रकारे कांद्याचे पीक घ्यावे- जेणेकरून परदेशात निर्यात करता येईल, ही अपेक्षा एनएचआरडीएफकडून केली जाते. एनएचआरडीएफकडून मागच्या दोन वर्षांत निर्यातीची आकडेवारी जाहीर झालेली नाही. अभ्यासकांच्या मते, वर्षभरात अंदाजे चार हजार कोटी रुपयांची कांदा निर्यात झाली आहे. भारतातून या वर्षी ३० लाख टनांवर कांदा निर्यात केली गेली आहे. ही निर्यात प्रामुख्याने आखाती देशांमध्ये केली जाते.

देशात २०१८ मध्ये ५ लाख २० हजार हेक्टरवर कांदा लागवड झाली होती, २०१९-२० मध्ये एक लाख ८० हजार हेक्टरने वाढली आहे. यात सर्वाधिक वाटा महाराष्ट्राचा आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्रात २ लाख ६७ हजार हेक्टरवर रब्बी कांदा लागवड झाली होती, त्या तुलनेत २०१९ मध्ये ४ लाख १५ हजार हेक्टरपर्यंत लागवडीखालील क्षेत्रात वाढ झालेली आहे. त्यामुळे २०१८ च्या तुलनेत महाराष्ट्रातील क्षेत्र जवळपास ५५ टक्क्यांनी वाढले आहे. परिणामी, २०१९-२० मध्ये कांद्याच्या उत्पन्नात वाढ होईल, असा

अंदाज कृषी मंत्रालयाने व्यक्त केला आहे. कांद्याच्या उत्पादनात दिवसेंदिवस वाढ होत आहे. तशीच कांदा निर्यातीतसुद्धा वाढ होत आहे. मात्र निर्यातीबाबत सरकारने कुठलेही धोरण स्वीकारलेले नाही.

कांद्याचे भाव वाढले की, निर्यातबंदी लादली जाते. ग्राहकांना स्वस्तात कांदा मिळावा म्हणून शेतकऱ्यांच्या मालाचे भाव निर्यातबंदी करून पाडले जातात. रमेश जाधव लिहितात, 'कांद्याचे दर पाडण्यासाठी सरकार निर्यातमूल्यात वाढ करते, निर्यातीवर सरसकट बंदी लादते, आयातीला मोकळे रान दिले जाते, संरक्षित साठ्यातील कांदा बाजारात आणणे- हे उपाय योजले जातात. यातून परिणाम साधला गेला नाही तर सरकार साठवणूक मर्यादा कमी करते. यावरून लक्षात येते की, ह्या उपाययोजना आखण्याचे कारण भाव पाडणे इतके सरळ आहे; मग भलेही शेतकऱ्यांचे नुकसान झाले तरी सरकारला फरक पडत नाही.'

''सरकारने कांद्याचे किमान निर्यातमूल्य वाढवणे, निर्यातीवर बंदी घालणे या उपायांऐवजी कांदा निर्यातीवर कर आकारावेत. या करातून गोळा होणाऱ्या रकमेतून कांदा विकास निधी उभारता येईल. अधिक उत्पादनामुळे कांद्याचे दर पडत असताना शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी हा निधी वापरता येईल.'' असे मत शेतमाल बाजार अभ्यासक राजेंद्र जाधव व्यक्त करतात. याबद्दल शेतकऱ्यांना विचारले असता. शेतकऱ्यांकडून यावर सकारात्मक प्रतिसाद मिळतो. 'काहीही करा, पण निर्यातीची टांगती तलवार तेवढी बाजूला सारा!' असं शेतकरी म्हणतात.

**निर्यात-आयात ही गरज का सोंग?**

या वर्षी नैसर्गिक तुटवडा निर्माण झाल्याने तुर्कस्तानमधून कांदा आयात केला गेला. यामागे कांद्याचे वाढलेले भाव कमी करण्यासाठी हा उपाय केंद्र सरकारने अवलंबला होता. त्यावरून सरकारविरुद्ध शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला. कांदा आयात केल्यानंतर दोन महिन्यांनी कांद्याचे भाव कमी झाले. त्या वेळी आयात केलेला कांदा राज्याने घेऊन जावा, अशा सूचना केंद्र सरकार देत होते. अशा वेळी एकीकडे निर्यातबंदी आणि दुसरीकडे आयात सुरू- असे हे अवकाळी धोरण जानेवारी २०२० मध्ये पाहायला मिळाले.

देशाला एका महिन्यात लागणाऱ्या कांद्याच्या तुलनेत तुर्कस्तानमधून आयात केलेला कांदा हा फक्त ०.६ टक्के आहे. त्यामुळे कांदाआयातीचे प्रमाण कमी असले तरी कांदानिर्यात खुली ठेवणे शेतकऱ्यांसाठी गरजेची आहे.

सरकार कांद्याचा तुटवडा निर्माण झाल्यास आयात करत असते. त्याची आकडेवारी लक्षात घेता, आयातीचे प्रमाण खूपच कमी आहे. दुसरीकडे ३८ लाख टन कांदा २०१६-१७ मध्ये निर्यात केला गेला, तर ३६ लाख टन कांदा २०१७-१८ मध्ये निर्यात केला गेला आहे.

देशभरात २०१६ मध्ये कांद्याचा तुटवडा होता, म्हणून आयात केली होती. तुडवडा निर्माण झाल्यास आयात करणे आवश्यक असते. मात्र ज्या वेळी मुद्दाम भाव पाडण्यासाठी सरकार आयातीचा निर्णय घेते, त्या वेळी मात्र त्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो. हें मात्र नाकारता येत नाही.

**काय उपाय?**

धोरणांच्या बाबतीत काय भूमिका असावी, याबद्दल काही अभ्यासकांची मते लक्षात घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना यावर बोलते करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यावर 'निर्यातबंदी उठवावी, आयात करू नये, सरकारने हस्तक्षेप करू नये' अशा स्वरूपाच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या. म्हणून धोरणांच्या पातळीवर काय करता येईल, याबाबत अभ्यासकांची मते जाणून घेतली.

कांद्याच्या आयात-निर्यातीवरून नाफेड या संस्थेचं नाव वारंवार कानांवर येते. त्याबद्दल कृषीअभ्यासक डॉ. गिरिधर पाटील म्हणतात, ''नाफेड ही राष्ट्रीय स्तरावरची शेतमालाची विक्री व वितरण करणारी यंत्रणा आहे. खासगी दलालांचे प्राबल्य कमी करण्यासाठी जेव्हा-जेव्हा शेतमालाचे दर बाजारात पडतील, तेव्हा या संस्थेने एक समांतर वा पर्यायी व्यवस्था म्हणून बाजारात खरेदीसाठी उतरावे, हे प्रमुख उद्दिष्ट आहे. आपली जबाबदरी ओळखून नियमित काम झाले, तर साऱ्या देशातील पुरवठासाखळ्या जिवंत राहून शेतमालाची कोंडी टाळण्याचे व दलालांचे प्रस्थ कमी करण्याचे काम होऊ शकेल. अशा प्रकारे काम होऊ लागले, तर नाफेड संस्था शेतकऱ्यांच्या हिताची ठरू शकते.''

शेतमाल बाजार अभ्यासक दीपक चव्हाण म्हणतात, ''तेजी-मंदी ही कोणत्याही पिकांच्या वा व्यापारी वस्तूंच्या मागणी-पुरवठ्यातील अपरिहार्य बाब असते. मात्र, टोकाचे चढ-उतार हे निश्चितच मोठ्या संस्थात्मक अपयशाकडे निर्देश करणारे आहेत. या पार्श्वभूमीवर, पुढील दीर्घकालीन उपाययोजना परिणामकारक ठरतील. एक- कांद्याचा देशांतर्गत मागणी-पुरवठा, शिल्लक साठे, आयात-निर्यात यासंबंधी निश्चित धोरण आखून अंमलबजावणीसाठी यंत्रणा उभारणे. दोन- केंद्र आणि राज्यांनी संयुक्तरीत्या खासगी

क्षेत्राच्या साह्याने देशाची एक महिन्याची गरज भागवेल इतक्या, म्हणजे १२ ते १५ लाख टन कांद्याच्या संरक्षित साठ्याची व्यवस्था करणे. तीन- शेतकरी कंपन्यांच्या माध्यमातून १२ ते १५ हजार टन क्षमतेची कांदा शीतगृहे उभारण्यासाठी प्रोत्साहनपर योजना राबवणे. चार- महाराष्ट्राबाहेरही चाळींसाठी अनुदान देणे. पाच- सूक्ष्मसिंचनाला प्रोत्साहन देण्यासाठी किमान ५० टक्के अनुदान देणे. सहा- लागवड, उत्पादनाची आकडेवारी देणारी यंत्रणा सक्षम आणि पारदर्शी करावी. त्यासाठी अमेरिकेतील कृषी खात्याच्या धर्तीवर दर महिन्याकाठी मागणी-पुरवठा आणि शिल्लक साठ्याचा अहवाल प्रसिद्ध करणे. याद्वारे शेतकऱ्यांना पीकनियोजन करणे सोपे जाईल. सात- नाशिक व नगर जिल्ह्यातील कांद्याचा वेगाने निपटारा करण्यासाठी पुरेशा वॅगनची उपलब्धता आणि भाड्यात वाजवी प्रमाणात सूट देणे. अशा प्रकारे कांद्याचे धोरण आखले, तर कांदा नेहमीच्या तेजी-मंदीचे प्रमाण कमी व्हायला मदत होईल.''

''कांदाचाळींचे प्रमाण वाढवण्याबरोबरच कांदा साठवणुकीसाठी नवी डिझाइन्स विकसित करणे यावरही संशोधन होणे गरजेचे आहे. परदेशात कमी खर्चिक अशी अनेक तंत्रे उपलब्ध आहेत. ती भारतातल्या, महाराष्ट्रातल्या स्थानिक परिस्थितीशी अनुरूप करण्यासाठी त्यात काही बदल आवश्यक आहेत. संशोधनाच्या अंगाने त्यावर मोठे काम झाले पाहिजे. उत्तर भारतात बटाट्यासाठी शीतगृहांची सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध झाल्यानंतर दरातील चढ-उतारात कमी होऊन त्यात एक स्थिरता आली. तोच कित्ता कांद्यासाठीही गिरवण्याची आवश्यकता आहे,'' असे कृषी अभ्यासक रमेश जाधव म्हणतात.

कांदा धोरणाबद्दल आलेल्या ह्या तिन्ही प्रतिक्रिया एकूण पाचही लेखांच्या मध्यवर्ती राहिल्या आहेत. अस्तित्वात असलेल्या यंत्रणाचा कार्यक्षम वापर, कांदा धोरणाच्या बाबतीत सरकारची नवी मांडणी आणि शेतकऱ्यांकडून आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार- या तीन महत्त्वाच्या मुद्द्यांचा विचार कमी-अधिक प्रमाणात पाचही लेखांत आला आहे. म्हणून या लेखाच्या शेवटी ह्या प्रतिक्रिया जशाच्या तशा देण्याचे ठरवले होते. त्याचा विचार सर्व बाजूंनी होणे गरजेचे आहे. कारण कांद्याचे समीकरण किंचित बिघडले तर शेतकरी, सरकार आणि ग्राहक या तिन्ही पातळ्यांवर त्याचे तीव्र पडसाद उमटतात. हा प्रश्न वरवर उपाययोजना आखून सुटणार नाही, याची नोंद घेणे आवश्यक आहे.

**सारांश**

जगातील मोठ्या लोकशाही देशात जेव्हा एखादा प्रश्न निर्माण होतो, तेव्हा सहाजिकच त्याचे स्वरूप राजकीय असते. त्यामुळे कृषिक्षेत्राचा प्रश्नही राजकीय आहे, हे समजून घेणे आवश्यक ठरते. तो निव्वळ निवडणुकांच्या मैदानात आश्वासने देऊन सुटणारा नाही, त्यासाठी ठोस व परिणामकारक अशा धोरणांची आणि उपाययोजनांची गरज आहे. सरकारच्या पातळीवर हे नियोजन करावे लागणार आहे. त्याची अंमलबजावणी शेतकऱ्यांच्या कृषिव्यवस्थेला पूरक ठरेल, अशा पद्धतीने होणे आवश्यक आहे. कांदा हा त्याचाच एक भाग आहे. कारण कांदा हा व्यावसायिक दृष्ट्या महत्त्वपूर्ण समजला जातो. म्हणून त्याच्या भाव वाढल्याने सर्वसामान्य मध्यमवर्गीय ग्राहकांच्या डोळ्यांत पाणी येते आणि भाव कमी झाले तर उत्पादक शेतकऱ्यांच्या ताटात माती मिसळली जाते. त्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करणे हे ह्या दोन्ही सामाजिक घटकांकडे दुर्लक्ष करण्यासारखे आहे.

निर्यात-आयातीचे खेळ खेळून सरकार शेतकरी वर्गाला जेरीस आणण्याशिवाय काहीएक करत नाही. आजवरच्या कृषिक्षेत्रातील स्थित्यंतरांच्या अनुषंगाने विचार केला तर असे दिसेल की, दीर्घ काळ एकाच समस्येवर एकाच वेळी विविध क्षेत्रांतील व्यक्तींनी लक्ष घातले तर ती समस्या सुटते. म्हणजे सध्याच्या कालखंडात कांद्यासंबंधित उत्पादनापासून ते निर्यातीपर्यंत अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत. अशा वेळी अर्थकारण, राजकारण, तंत्रज्ञान, माध्यम आणि कृषिक्षेत्रातील अनुभवी व्यक्तींनी एकत्र येऊन सर्वच क्षेत्रांचा सहानभूतीपूर्वक विचार करून उत्पादकांच्या प्रश्नांची सोडवणूक केली पाहिजे. कांदाउत्पादक वर्ग आज ज्या प्रकारे या विविध क्षेत्रांतील लोकांबद्दल मनात एक प्रकारे राग, संताप आणि द्वेष बाळगून आहे तो लक्षात घेता, या दोन सामाज-घटकांमधील दरी रुंदावत जाईल आणि यास सामाजिक समूह म्हणून आपल्यातला प्रत्येक जण जबाबदार असेल.

**धनंजय सानप**, पुणे

dhananjaysanap1@gmail.com / Mob. 9850901073

('कांद्याची कैफियत' या भागातील हा पाचवा आणि शेवटचा लेख. 'रानडे इन्स्टिट्यूट, पुणे' यांच्या वृत्तपत्रविद्या व संज्ञापन विभागाला सादर केलेल्या अहवालावर आधारित आहे.
– **संपादक**)



अपर्णा दीक्षित

# इकडे आड, तिकडे विहीर

तृणमूल काँग्रेसच्या नेत्या महुआ मोईत्रा यांचं नाव गेल्या वर्षभरात त्यांनी लोकसभेत केलेल्या भाषणांमुळे चर्चेत राहिलं आहे. त्यांचं बोलणं तडफदार, नेमकं आणि भेदक आहे. त्याचबरोबर त्यांनी निवडलेल्या विषयाबद्दल त्यांना कळकळ आहे असे वाटते. याशिवाय, राज्यकर्त्यांच्या निर्णयांबद्दल, त्यांच्यातल्या त्रुटींबद्दल उघडपणे बोलण्याची धमक, धाडस आणि हुशारीही त्यांच्याजवळ आहे, हे त्यांच्या भाषणातून दिसून येते. सरकार कोणतेही असेल तरी, अशा प्रकारे बोलणाऱ्या विरोधी पक्षनेत्याची दखल घ्यावी लागेल, असे वाटायला लावणारे एकूण विषयावरचे प्रभुत्व आवेश महुआ मोईत्रांच्या संसदीय भाषणात दिसून येतो. अर्थात त्यांच्या भाषणानंतर त्याबद्दल सर्वसामान्य भारतीयांनी (पुरुषांनी) सोशल मीडियावर आणि इतर अनेक माध्यमांनी जे बोललं व लिहिलं, त्यात अगदी मोजके सूर प्रशंसेचे होते. बहुतेक प्रतिक्रिया या विविध पातळीवरच्या होत्या. त्यांचा आवाज कसा कर्कश आहे इथपासून त्यांच्या वैयक्तिक आयुष्यावर चिखलफेक करण्यापर्यंत मजल गेली. कुणी म्हटलं की, या बाई sexually frustrated आहेत म्हणून 'अशा' बोलतात की काय? तर, दुसऱ्या एकाने 'तुमचा चेहरा हसल्याशिवाय शोभून दिसत नाही' असा सल्लाही दिला. या आणि अशा कॉमेंट्स म्हणजे हिणकस प्रवृत्तींच्या हिमनगाचं केवळ टोक आहे. गेल्या वर्षभरात महुआ मोईत्रा यांचं जे ट्रोलिंग केलं गेलं आहे, ती प्रचंड मोठी भाषिक हिंसा आहे. त्या सगळ्याकडे दुर्लक्ष करणे हेच एक मोठे कौशल्य आहे. या ठिकाणी हे नक्की लक्षात घेतलं पाहिजे की, महुआ मोईत्रा उच्च जातीय आणि उच्च वर्गीय आहेत. तसं असल्यामुळे स्त्रियांना जे कवच काही वेळा मिळतं, ते त्यांना मिळालं असणार आहे. त्यांच्या जागी जर संसद स्त्रीसदस्य दलित व्यक्ती असं बोलली असती, तर होऊ शकणाऱ्या परिणामांचा विचारच केलेला बरा. अशा परिस्थितीत स्त्रीने काय करावे? महुआ मोईत्रा यांनी काय केलं म्हणजे समाजातल्या सर्व स्तरांत त्यांना स्वीकारलं जाईल? संसदेचं कामकाज चालू असताना स्वत:च्या फोनवर पोर्न बघणारे पुरुष सदस्य या देशाने खपवून घेतले आहेत, त्याच देशात समाजातल्या महत्त्वाच्या मुद्यांवर पोटतिडकीने बोलणाऱ्या स्त्रियांचं म्हणणं कधी खपवून घेतलं जाईल?

> शिक्षणाचे धोरण ठरवताना या सगळ्याचे भान असणे आवश्यक ठरते. जोपर्यंत मुलींकडून असलेल्या समान कामगिरीच्या अपेक्षा आणि मूल्यमापनाचे समाजातले असमान निकष यातला गुंता शिक्षण सोडवत नाही, तोवर मुली-स्त्रिया स्पर्धेत आपोआपच पिछाडीवर जाणार. दहावी-बारावीला कायम जास्त गुण मिळवून, जास्त मार्कांनी पास होणाऱ्या मुली त्याच प्रमाणात यशस्वी उद्योजिका, सीईओ, व्यावसायिक, सरकारी अधिकारी होताना दिसत नाहीत. या मुली व्यवस्थेत कुठे विरून जातात, हे डोळे उघडे ठेवून पाहिले पाहिजे. या सगळ्या पिछाडीच्या सूत्रामागे भाषिक विकासाचे नियम आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे; तर दुसरीकडे महुआ मोईत्रा आणि त्यांच्यासारख्या अनेक स्त्रिया जेव्हा या अडथळ्यांच्या शर्यती पार करतात, तेव्हा शेवटी भाषेचाच हिंसक वापर करून स्त्रियांना त्यांची जागा दाखवली जाते. हे दुर्दैवाचे तर आहेच, शिवाय सामूहिक अधोगतीचेही लक्षण आहे.

संसद सदस्य म्हणून जी प्रतिष्ठा आणि मान्यता पुरुषांच्या वाट्याला येते, ती तितकीच काय केल्याने स्त्रियांना सहज मिळेल? स्त्रियांनी आपले म्हणणे 'नम्र'पणे मांडलं किंवा ऐकणाऱ्याच्या कला-कलाने घेत बोललं, तर त्यांच्या म्हणण्याला जास्त किंमत मिळेल का? पुरुषांचं बोलणं आणि तशाच प्रकारचं स्त्रियांचं बोलणं याची सारखी परीक्षा होते का, याचा अभ्यास भाषाशास्त्रज्ञ करत असतात. या अभ्यासातून अनेक मुद्दे समोर येतात. काही उदाहरणं पाहू या.

एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये मुख्य डॉक्टर आणि डायरेक्टर पदी स्त्री डॉक्टर आहेत. त्यांची मीटिंग घेण्याची पद्धत या आधीच्या पुरुष डायरेक्टरपेक्षा वेगळी आहे. टीममधल्या सगळ्यांना त्यांचं मत या डॉक्टर विचारतात आणि मग निर्णय घेतात. त्यांच्या कामाच्या पद्धतीबद्दल टीममधल्या स्त्रिया खूश असतात, तर पुरुषांची प्रतिक्रिया फारच वेगळी असते. 'तुमच्या मनाचेच निर्णय घ्यायचे तर आम्हाला विचारता कशाला? हे सरळ मॅनिप्युलेशन आहे. मी माझं मत सांगण्यात वेळ कशाला घालवू? तुम्ही बॉस आहात, तर सरळ हुकूम ठोका. बॉससारखं वागायला शिका.' अर्थातच हे उदाहरण पाश्चात्त्य देशातल्या एका अभ्यासातून आलं आहे, हे लक्षात ठेवू या. नेतृत्व करण्याच्या वेगवेगळ्या पद्धती असू शकतात. स्त्रिया असे प्रयोग करू शकतात, हे अजून अनेक समाजात रुजलं नाहीये. पुरुषांनी जी वागण्या-बोलण्याची पद्धत घालून दिली आहे ती स्त्रियांनी अंगीकारली, तर आपलं आयुष्य सुकर होईल, असं अनेक स्त्रियांना वाटतं. मात्र ते तर अजिबात खरं नाही. तडफदार बोलणाऱ्या पुरुषांचं जसं भरभरून कौतुक होतं तसं स्त्रियांचं होत नाही, असं महुआ मोईत्रा यांच्या प्रातिधिनिक उदाहरणावरून कळतं.

स्त्री-पुरुषांच्या समान वागणुकीचे, बोलण्याचे वेगवेगळे अर्थ लावण्याची प्रक्रिया खूप लहानपणापासूनच झालेली असते. जी मुलगी स्वत:च्या वागण्याबद्दल खूप ठाम असते किंवा बोलण्यात आत्मविश्वास असणारी असते, तिने शक्यतो तसं असू नये- असे संदेश तिला कधी नकळतपणे, तर कधी स्पष्टपणे दिले जातात. फक्त मुलींच्या गटांचा विचार केला तर एकमेकींसारखं असणं, एकमेकींसारखं बोलणं असं वर्तन जास्त योग्य समजलं जातं. मुलांच्या गटामध्ये एकमेकांशी स्पर्धा असणे, आपण इतरांपेक्षा कसे भारी आहोत हे दाखवून देणे- हे कायम दिसतं. याच्याच बरोबर किशोरवयीन मुली जेव्हा गटात असतात, तेव्हा त्या नातेसंबंध-एकमेकींच्या आवडी-निवडी याबद्दल बोलतात. तर जेव्हा गटात फक्त मुलगे असतात तेव्हा एकत्र करायच्या गोष्टींच्या वेळा ठरवणे, खेळ आणि इतर मित्र-मैत्रिणींबद्दल कॉमेंट करणे असं वागतात, असं दिसून येतं. आता जेव्हा मुली आणि मुलगे एकत्र गटात असतात तेव्हा पुन्हा प्लॅनिंग, खेळ, व इतर मित्र-मैत्रिणींबद्दल कॉमेंट करणे असंच करताना दिसतात. जे लहान मुला-मुलींच्या गटात घडत असतं, त्याचंच दुसरं रूप मोठ्यांच्या वागण्यात दिसतं. जेव्हा पुरुषांचं वर्चस्व असलेले व्यवसाय (अर्थकारण, वकील, जज्, राजकारण, बांधकाम व्यवसाय) स्त्रिया निवडतात, तेव्हा त्यांचं वागणं-बोलणं 'मूळच्या' पुरुषांसारखं असावं, अशी अपेक्षा अगदी सहज केली जाते आणि रास्त मानली जाते. याउलट हे व्यवसाय निवडणाऱ्या स्त्रिया जर पुरुषांसारखं वागल्या तर ती कशी बॉसी आहे, तिला कसं वर्चस्व गाजवायचं आहे- असंही बोललं जातं. हे म्हणजे 'तोंड दाबून बुक्क्यांचा मार' असं आहे. इंग्रजीत याला Damned if you do, damned you don't असं म्हणतात. पुरुषांसारखं बोलावं-वागावं तर बॉसी, वेगळ्या कोणत्या पद्धती अंगीकाराव्यात तर पुरुषांसारखं तुम्हाला साधं बॉस होता येत नाही का, असं कचाट्यात पकडलं जातं.

या सगळ्या कचाट्यात जेव्हा स्त्रिया सापडतात तेव्हा त्याच्या आधी घडलेल्या घटना (लहानपणी झालेले संस्कार, मिळालेली शिकवण) आणि वर्तमानात होणारी सततची चिकित्सा (लेबल लावलं जाणं, पुरुषांशी अन्याय्य पद्धतीनं तुलना होत राहणं, टोमणे मारले जाणं), शिवाय भविष्यातल्या आपल्या प्रतिमेला धक्का लागणार नाही अशा प्रकारे संवादात तोल राखणं- अशी तिहेरी कसरत स्त्रिया करत असतात. स्त्रियांना ही कसरत करावी लागते. यामध्ये भूत-वर्तमान, भविष्य यांची जी गुंतागुंत असते, त्या व्यतिरिक्तही काही मुद्दे असतात. महुआ मोईत्रा किंवा हॉस्पिटलमधल्या डायरेक्टर असणं या सगळ्यांमध्ये तुलनेने 'यशस्वी' स्त्रियांची चर्चा आहे. मात्र अनेक स्त्रिया इथपर्यंत पोहोचतच नाहीत. एकास एक तुलना करून पाहिली तर स्त्रिया अनेकदा पुरुषापेक्षा कमी सकस आहेत, असेही निष्कर्ष निघतात- जे खोटे नाहीत. मात्र स्त्रिया खरोखरीच कायम तशा असतात का, हे समजून घेण्यासाठी हे लक्षात घेतलं पाहिजे की, गुंतागुंतीचे ज्ञान मिळवण्यासाठी काही ठरावीक भाषा अवगत असावी लागते. भाषा अवगत असण्याच्या दोन पातळ्या असतात. त्यातल्या एका पातळीला Basic Interpersonal Communications skills (BICS) असं म्हटलं जातं. ही अशी भाषा आहे जी रोजचे संवाद

करण्यासाठी, समोर असलेल्या घटना-संदर्भांविषयी बोलणे इतकीच सीमित असते. या पातळीवर संवाद घडण्यासाठी भाषेबरोबरच हावभाव, हातवारे, चित्र-आकृत्या या सगळ्यांचा समावेश असतो. दुसरी पातळी म्हणजे Cognitive Academic Language Proficiency (CALP). जास्त गुंगागुंतीच्या विषयांवर लिहू-बोलू शकणे हे यामध्ये अपेक्षित असते. विशेषत: अमूर्त संकल्पना समजावून घेणे, गणिती प्रमेयं भाषेच्या माध्यमातून शिकणे, चित्र-आकृत्या यांच्या मदतीशिवाय मुद्दा समजून घेणे. (अधिक खोलात समजून घेण्यासाठी आकृती पाहावी.)

या संदर्भात स्त्रियांचा भाषेचा वापर हा अनेकदा केवळ पहिल्या पातळीवर मर्यादित राहतो. तो असा मर्यादित का राहतो, याला अनेक कारणं आहेत. त्यातली अनेक कारणं आपल्या शिक्षणव्यवस्थेतून येणारी आहेत. उदाहरणार्थ हा प्रसंग पाहा. शिक्षणामध्ये मुलांचा थेट सहभाग असावा असं राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा २००५ प्रमाणे म्हटलं गेलं. त्याच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून गणित विषयालाही प्रयोग असावेत, असं ठरलं. यामध्ये वजन मोजणे आणि वजनाची तसंच आकारमानाची विविध एककं शिकणे, अशा एका तासाला घडलेला हा प्रसंग आहे. वजन-काट्यावर पाण्याचे वजन पाहावे आणि लिटर व किलो या आकारमान व वस्तुमानाच्या संकल्पना समजून घ्याव्यात, असा धडा होता. यामध्ये मुली आणि मुलगे या सगळ्यांचा समावेश असयला हवा, या हेतूने शिक्षकांनी (पुरुष) मुलींना नळावरून पाणी आणायला सांगितले तर मुलांना वजन पाहायला सांगितले. यातूनच शिक्षण कुठे घडते आहे, हे लक्षात येतं. म्हणायला तर मुलींचा सहभाग आहे; पण तरीही




त्या मूळ ज्ञानापेक्षा दूर राहतात, असंही घडतं. भारतातल्याच एका दुसऱ्या पाहणीदरम्यान असं दिसून आलं की, गणित शिकवत असताना शिक्षक मुलींच्या रांगांकडे बघतच नाहीत. जी तऱ्हा या उदाहरणातून दिसते, म्हणून मुली गणितासारख्या CALP ची जास्त गरज असणाऱ्या विषयात मागे पडतात. तीच गत शिक्षणात अनेक ठिकाणी होते. याव्यतिरिक्त आपल्या पाठ्य-पुस्तकांची भाषा खूप मोठ्या प्रमाणात CALP कौशल्य विकसित असण्यावर अवलंबून असते.

हा झाला पहिला भाग, जिथे मुलींचा भाषिक विकास ठरावीक पातळीवरच अडकतो. त्यामुळे वरच्या स्तरावरचे ज्ञान आत्मसात करणे आणखी अवघड होऊन बसते. दुसरीकडे ज्या मुलींना ज्ञान मिळवण्याच्या महत्त्वाच्या टप्प्यांवर पुरेसा पाठिंबा मिळतो, चांगले शिक्षण मिळते किंवा त्या अडचणींवर मात करत आपले भाषाकौशल्य वरच्या स्तरावर नेतात. त्या अनेकदा नोकरी-व्यवसायाच्या ठिकाणी वर सांगितलेल्या कचाट्यात सापडतात. उत्तम कामगिरी करूनही पुरुषांच्या तुलनेत त्यांचे गुण ओळखले जाणे आणि त्याचं चीज होणे जवळपास अशक्य होते.

या चर्चेमागे भाषेचे ज्ञान आणि ज्ञान मिळवण्यासाठी पुरेसा भाषाविकास झालेला असणे, या दोन्हींची गरज भासते. शिक्षणाचे धोरण ठरवताना या सगळ्याचे भान असणे आवश्यक ठरते. जोपर्यंत मुलींकडून असलेल्या समान कामगिरीच्या अपेक्षा आणि मूल्यमापनाचे समाजातले असमान निकष यातला गुंता शिक्षण सोडवत नाही, तोवर मुली-स्त्रिया स्पर्धेत आपोआपच पिछाडीवर जाणार. दहावी-बारावीला कायम जास्त गुण मिळवून, जास्त मार्कांनी पास होणाऱ्या मुली त्याच प्रमाणात यशस्वी उद्योजिका, सीईओ, व्यावसायिक, सरकारी अधिकारी होताना दिसत नाहीत. या मुली व्यवस्थेत कुठे विरून जातात, हे डोळे उघडे ठेवून पाहिले पाहिजे. या सगळ्या पिछाडीच्या सूत्रामागे भाषिक विकासाचे नियम आहेत, हे लक्षात ठेवले पाहिजे. दुसरीकडे महुआ मोईत्रा आणि त्यांच्यासारख्या अनेक स्त्रिया जेव्हा या अडथळ्यांच्या शर्यती पार करतात, तेव्हा शेवटी भाषेचाच हिंसक वापर करून स्त्रियांना त्यांची जागा दाखवली जाते. हे दुर्दैवाचे तर आहेच, शिवाय सामूहिक अधोगतीचेही लक्षण आहे.

**अपर्णा दीक्षित,** पुणे
aparna.a.dixit@gmail.com
Mob.9881670840



चर्चामंथन

अनंत फडके

# विज्ञान चळवळीची ताकद, मर्यादा आणि भाबडा विज्ञानवाद

भारताच्या राज्यघटनेत १९७६ मध्ये 'वैज्ञानिक दृष्टिकोन'चा समावेश करण्यामागे ही नेहरूप्रणीत समज होती. यामध्ये पुरोगामी विचाराचे शास्त्रज्ञ, विचारवंत, काही मार्क्सवादीही होते. पण त्यातही ही नेहरूवादी समज वेगळ्या भाषेत मांडली होती. भारतातील विज्ञान चळवळीचा, विज्ञान प्रबोधनाचा वैचारिक पाया हा आधुनिक पाश्चिमात्य जगातून आलेला रेनेसाँप्रणीत वैज्ञानिक दृष्टिकोन राहिलेला आहे. त्याला मानवतावादाची जोड देऊन जनवादी परिवर्तनाचे बरेच काम झाले आहे, अजून केले पाहिजे. पण वैज्ञानिक दृष्टिकोनदिनाच्या निमित्ताने मांडणी करताना याचेही भान असावे की, त्यापलीकडे जाऊन आर्थिक-सामाजिक प्रश्नांच्या चिकित्सेत उतरताना सर्जनशील मार्क्सवादी वैज्ञानिक चिकित्सापद्धतीचा उल्लेखही न करता फक्त रेनेसाँप्रणीत 'वैज्ञानिक विचारपद्धती आणि दृष्टिकोना'च्या चौकटीत राहून शास्त्रीय उत्तरे मिळतील असे समजणे, हा भाबडा विज्ञानवाद आहे.

शहीद डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने काढलेला २२ ऑगस्टचा साधनाचा विशेषांक उद्‌बोधक आहे. 'विज्ञानाने मला व समाजाला काय दिले' याबाबत महाराष्ट्रातील काही अग्रणी विज्ञानप्रबोधकांना 'साधना'ने या निमित्ताने लिहिते केले, हे छान झाले. या अंकाच्या निमित्ताने विज्ञानाची, विज्ञानचळवळीची ताकद आणि मर्यादा थोडक्यात नोंदवायचा हा प्रयत्न.

या सर्व अंकात विज्ञान म्हणजे निसर्गविज्ञान असे गृहीत आहे. आपण शिकलेल्या (निसर्ग) विज्ञानाने आपल्याला काय ज्ञान व दृष्टी दिली आणि त्याचा स्वत:साठी, समाजहितासाठी आपण काय उपयोग करू शकलो, हे या निरनिराळ्या विज्ञानप्रबोधकांनी मांडले आहे. निसर्ग-विज्ञान (निसर्ग समजून घेण्याचे ज्ञान), तंत्रविज्ञान (निसर्गात बदल करण्याचे ज्ञान), वैज्ञानिक विचारपद्धती आणि वैज्ञानिक दृष्टिकोन याला मानवतावादाची जोड देऊन किती व्यापक समाजहित साधता येते याचे उद्‌बोधक विवेचन या लेखांमध्ये आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे काम हे याचे आणखी एक उत्तम उदाहरण आहे. लोकविज्ञान-संघटना याच प्रकारचे काम करत होती, याचाही उल्लेख आला आहे. एकूण समाजपरिवर्तनात अशा प्रकारच्या कामाचे निर्विवादपणे महत्त्वाचे स्थान आहे. अशा कामाला-विचारव्यूहाला खूप मर्यादा आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे. त्यासाठी युरोपात निसर्गविज्ञानाच्या विकासासोबत झालेल्या 'रेनेसाँ'च्या म्हणजे प्रबोधनाच्या प्रक्रियेत जन्मलेली वैज्ञानिक विचारपद्धती आणि वैज्ञानिक दृष्टी यांचे नेमके स्वरूप काय आहे, हे पाहिले पाहिजे.

**रेनेसाँप्रणीत वैज्ञानिक विचारपद्धती आणि वैज्ञानिक दृष्टी**

'लोकविज्ञान चळवळ कशासाठी?' या १९८० च्या लोकविज्ञान संघटनेच्या पुस्तिकेत हे थोडक्यात मांडले आहे. आपल्याभोवती जे भौतिक जग आहे, ते निश्चित अशा वस्तुनिष्ठ नियमांनुसार चालते. प्रत्येक घटनेमागे एक भौतिक कारणपरंपरा असते. एक म्हणजे, या कारणपरंपरांचे व नियमांचे आकलन मानवाला होऊ शकते आणि वैज्ञानिक विचारपद्धती हाच असे आकलन घेण्याचा योग्य व सर्वोत्तम

मार्ग आहे. विश्वव्यापारामागे काही तरी एक गूढ अतिभौतिक, दैवी शक्ती आहे असे न मानता किंवा ग्रंथप्रामाण्य वा व्यक्तिप्रामाण्य न मानता, या विचारपद्धतीतून मिळणारे ज्ञान हेच खरे व खात्रीलायक ज्ञान असते. दुसरे म्हणजे, या वैज्ञानिक शोधप्रक्रियेतून ताबडतोबीने सर्व उत्तरे मिळतीलच असे नाही. काही प्रश्न आज अनुत्तरित राहतील, काही उत्तरे ही अपुरी वा चुकीची होती, हे विज्ञान जास्त विकसित झाल्यानंतर विज्ञानाच्याच लक्षात येते. तरीही भौतिक जगाचे वास्तविक अस्तित्व, त्यांचे वस्तुनिष्ठ यथार्थ ज्ञान मिळवण्याचा वैज्ञानिक विचारपद्धती हाच एकमेव खात्रीलायक मार्ग आहे. वरील विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन हा तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोन आहे, डोळस विश्वास आहे. एखाद्या ठोस वैज्ञानिक सिद्धांताप्रमाणे त्याचा खरे-खोटेपणा ताबडतोबीने तपासता येत नाही. पण आजवरच्या प्रदीर्घ मानवी इतिहासक्रमात त्याचा खरेपणा सिद्ध झालेला आहे.

वैज्ञानिक चिकित्सापद्धत, वैज्ञानिक दृष्टिकोन याचा वापर इतिहासात ठिकठिकाणी शेकडो वर्षे होत आला आहे. त्याचा युरोपमध्ये भांडवलशाहीसोबत विकास-प्रसार होऊन तिथे त्याला १६ व्या शतकापासून अधिकाधिक मान्यता मिळू लागली. कोपर्निकस, ब्रुनो, गॅलिलिओ, आदींचे लढे, तसेच दैववादाच्या विरोधात युरोपात समाजसुधारकांनी-तत्त्ववेत्यांनी रेनेसाँच्या प्रक्रियेत विकसित केलेला, पसरवलेला वैज्ञानिक दृष्टिकोन युरोपीय साम्राज्यशाहीसोबत जगभर पसरला. तीच गोष्ट विवेकवाद, बुद्धिप्रामाण्यवाद याबाबत आहे. आधुनिक पाश्चिमात्य जगातून आलेला हा 'रेनेसाँप्रणीत वैज्ञानिक दृष्टिकोन' हा भारतातील विज्ञान चळवळींचा वैचारिक पाया काही प्रमाणात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे राहिलेला आहे.

या विज्ञानाने, वैज्ञानिक दृष्टिकोनाने जगाकडे-समाजाकडे पाहायची दृष्टी दिली, असे म्हणताना हे लक्षात घ्यायला हवे की- निसर्गातील घडामोडींकडे पाहायची दृष्टी यापुरतीच ही वैज्ञानिक दृष्टी असते. आपल्यासमोरील आर्थिक-सामाजिक घडामोडी, त्यातील महागाई, बेकारी, भाववाढ, पुरुषसत्ताक हिंसा यासारख्या प्रश्नांचे विश्लेषण करायला ही दृष्टी पुरेशी पडत नाही. त्यासाठी समाज-वैज्ञानिक विश्लेषणपद्धती, दृष्टी आवश्यक असते. समाज-विज्ञानाच्या विश्लेषणपद्धतीत निसर्गविज्ञानाला सामाईक अशा अनेक बाबी आहेत. तसेच काही वेगळी गृहीतकृत्ये आणि विश्लेषणपद्धतीही आहे. रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र या दोन शास्त्रांमध्ये जसा-जेवढा फरक आहे, तसाच-तेवढाच नाही तर अधिक मूलभूत प्रकारचा फरक आहे. तो असा :

निसर्गातील घडामोडी मानवी समाजातील सामाजिक हितसंबंधांवर अवलंबून नसल्याने निसर्गातील घडामोडींकडे आपण निरपेक्षपणे, तटस्थपणे पाहू शकतो. उदा. चंद्रावर कोणती मूलद्रव्ये आहेत किंवा क्लोरोफिलचे कार्य कसे चालते, याचा सामाजिक हितसंबंधांशी संबंध नसतो. त्यामुळे त्याबाबतची चिकित्सा शास्त्रज्ञ तटस्थपणे, निरपेक्षपणे करू शकतात. निसर्ग-वास्तव, त्याबाबतची कारणमीमांसा याबद्दल शास्त्रज्ञांमध्ये असलेल्या मतभेदांचा, समाजातील हितसंबंधांचा सहसा जैवसंबंध नसतो. याला काही अपवाद आहेत. उदा. प्रतिगामी शक्ती डार्विनचा सिद्धांत नाकारतात. दुसरे उदाहरण म्हणजे, पृथ्वीचे आज वाढत चाललेले तापमान हे मानवी अधिक्षेपामुळे (नफाकेंद्री तसेच अनिर्बंध औद्योगिकीकरणवादी अर्थ-व्यवस्था) नसून पृथ्वीच्या लाखों-कोटी वर्षे चाललेल्या स्वयंभू निसर्गचक्राचा तो भाग आहे. ही मांडणी खनिज-ऊर्जा क्षेत्रातील भांडवलदारांच्या पथ्यावर पडते. मात्र सूर्य पृथ्वीभोवती नव्हे तर पृथ्वी सूर्याभोवती फिरते, हे नैसर्गिक घडामोडींबाबतचे सत्य मांडायला विरोध करणाऱ्या युरोपमधील सरंजामी हितसंबंधांचा पाडाव झाल्यानंतर नैसर्गिक घडामोडींबाबतचे सत्य मांडणे याभोवती सहसा सामाजिक वर्गकलह माजलेला नाही.

याउलट आर्थिक-समाजिक प्रश्नांबाबत (उदा.बेकारी, महागाई, भ्रष्टाचार इत्यादींवर उपाय) अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ यांच्यातील सर्व महत्त्वाचे वाद मात्र समाजातील कोणत्या ना कोणत्या सामाजिक स्तरांच्या हितसंबंधांशी ठोसपणे-जैवपणे जोडलेले असतात. एवढेच नव्हे तर- स्वत: त्या शास्त्रज्ञाची एकूण सामाजिक समज किंवा वर्ग/जात/लिंग/देश याचाही या शास्त्रज्ञाच्या विश्लेषणाशी संबंध असू शकतो. उदा.स्त्रियांच्या आरोग्याच्या प्रश्नाचा अभ्यास करणारे पुरुष-संशोधक हे स्त्रियांच्या आरोग्याचा कोणता प्रश्न घेतात/घेत नाहीत, त्याकडे ते कोणत्या दृष्टीने बघतात, तो प्रश्न कसा अभ्यासतात, पुढे आलेल्या माहितीचा कसा अर्थ लावतात- यांवर ते पुरुष असण्याचा परिणाम होऊ शकतो. निसर्ग-विज्ञानाबाबत अपवाद वगळता असे नसते. निसर्ग-विज्ञानात शास्त्रज्ञाने निरपेक्ष-तटस्थ असणे ही शास्त्रीयतेची

कसोटी असते, तर समाजविज्ञानात हे शक्य नसते. 'बाजू घेणे' हे रेनेसाँप्रणीत वैज्ञानिक दृष्टिकोनमध्ये अशास्त्रीय समजले जाते. पण वैज्ञानिक विचारपद्धतीत झालेल्या मार्क्सप्रणीत क्रांतीमुळे लक्षात आले की, सामाजिक संबंधांबाबत बाजू घेणे आणि शास्त्रीय असणे यात अंतर्विरोध असतोच असे नाही.

निसर्गविज्ञानात असणाऱ्या मतभेदांबाबत अधिक चर्चा, अधिक पुरावा या आधारे काही काळानंतर बहुसंख्य शास्त्रज्ञांमध्ये एकमत होते. शिल्लक राहिलेले मतभेद सहसा सामाजिक हितसंबंधांमुळे नसतात. तसे समाजशास्त्र, अर्थशास्त्र याबद्दल नसते. सामाजिक प्रश्नांबाबतचे निरनिराळे सिद्धांत, विश्लेषणे ही अटळपणे कोणत्या ना कोणत्या सामाजिक गटाचे-वर्गाचे हितसंबंध जोपासणारी असतात. उदा. जयंती घोष व रघुराम राजन हे दोघेही अव्वल अर्थशास्त्रज्ञ आहेत. पण भारतातील दारिद्र्य हटवण्यासाठी करायचे उपाय यांबाबत त्यांच्यातील मतभेद न मिटणारे आहेत. हे वैयक्तिक कारणामुळे नाहीत, तर वेगवेगळ्या सामाजिक शक्तींचे प्रतिनिधित्व करणाऱ्या त्यांच्या भूमिका आहेत, म्हणून. दुसरे उदाहरण- पर्यावरणीय प्रश्न सोडवण्यासाठी बाजारपेठी मार्ग वापरले पाहिजेत असे मानणारे अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ आणि याउलट आपली अर्थव्यवस्था बाजारपेठी नियमांनुसार चालवण्यामुळे पर्यावरणीय प्रश्न निर्माण झाले आहेत असे मानणारे समाजशास्त्रज्ञ यांच्यात एकमत कधीच होणार नाही. भांडवली अर्थविचार व मार्क्सवादी अर्थविचार हे दोन्ही शास्त्रीय विचार मानले जातात, पण त्यांच्यात अनेक गोष्टींबाबत एकमत होणे शक्य नसते.

**मार्क्सप्रणीत वैज्ञानिक विचारपद्धती, दृष्टिकोन**

सामाजिक वास्तवाचे विश्लेषण करण्यासाठी वैज्ञानिक चिकित्सपद्धतीचा वापर करण्याचा पहिला पद्धतशीर, काटेकोर प्रयत्न मार्क्सने १९ व्या शतकाच्या मध्याला केला. असे करताना त्याने एक वैचारिक क्रांतीच केली. चिद्वादी व भौतिकवादी तत्त्वज्ञान यांच्यात शेकडो वर्षे चाललेला वाद, झगडा हा त्याने तत्त्वज्ञानाच्या क्षेत्राबाहेर काढला. समाजाची ऐतिहासिक, भौतिकवादी चिकित्सा त्याने मांडली आणि ही तत्त्वज्ञाने व त्यांच्यातील वाद सामाजिक संबंधांतील अंतर्विरोधातून कसे जन्मतात, कोणाच्या ना कोणाच्या हितसंबंधांचे कसे रक्षण करतात याकडे त्याने लक्ष वेधले. उदा. दैवी शक्ती, देव अस्तित्वात नाही याबाबतचे तत्त्वज्ञानात्मक युक्तिवाद किंवा शास्त्रीय पुरावे तो मांडत बसला नाही; तर देव-धर्म या कल्पना समाजविकासाच्या एका टप्प्यावर ज्यासाठी निर्माण झाल्या ती परिस्थिती दूर केली तर दैवी शक्ती, देव या कल्पनांचे राज्य विलयाला जाईल, हे त्याने मांडले. अशा प्रकारे विज्ञान आणि तत्त्वज्ञान या समांतर जाणाऱ्या विश्लेषण-पद्धतींमधील द्वैत ओलांडून त्याने इतिहासाची द्वंद्वात्मक भौतिकवादी चिकित्सा या शास्त्रीय सिद्धांतात विलीन केली. वेगळ्या शब्दांत सांगायचे तर या वादांचे तत्त्वज्ञानात्मक चर्चा हे स्वरूप मार्क्सने बदलले आणि सामाजिक संबंधांची चिकित्सा व हे संबंध बदलण्याचा मार्ग हा चर्चेचा आखाडा केला. ही epistemological, ontological revolution (ज्ञानशास्त्र-सत्संबंधीशास्त्रामधील क्रांती) होती.

मार्क्सने वैज्ञानिक चिकित्सपद्धतीचे क्षेत्र विस्तारले, आर्थिक-सामाजिक वास्तव विज्ञानाच्या कक्षेत आणले. त्या काळातील अर्थशास्त्र (उदा. स्मिथ-रिकारर्डो), तत्त्वज्ञान (उदा. हेगेल), विचारसरणी (उदा. फ्रेंच-प्रवाह) यांचा प्रवास समांतर रेषेत चालला होता. या तिन्ही प्रवाहांच्या पलीकडे जाऊन केवळ वैचारिक क्षेत्रातील घुसळण/वाद-विवाद हे त्यांचे स्वरूप मार्क्सने बदलले. माणसाचा इतिहास, त्याचे भौतिक वास्तव हे केंद्रस्थानी ठेवणाऱ्या 'इतिहासाचे किंवा मानवाचे विज्ञान' असे नवे सिद्धांतन उभारले. (स्टॅलिनप्रणीत वा माओप्रणीत राजवटीत सैद्धांतिक भ्रष्टीकरण झाले. त्यातून मार्क्सवादाच्या नावाखाली एक सर्वंकष, थिजलेले तत्त्वज्ञान मांडले गेले. मार्क्सविचारात तत्त्वज्ञानात्मक पैलू असला तरी ते तत्त्वज्ञान नाहीये, हे लक्षात घेऊन मूळ मार्क्सविचारातील शास्त्रीय प्रेरणा अंगीकारून निरनिराळ्या मार्क्सवाद्यांनी मार्क्सवादाचा सर्जनशील विस्तार केलेला आहे. उदा. जातीय, पितृसत्ताक इ. बिनवर्गीय उतरंडी, पर्यावरणीय विनाश यांचाही आपल्या सिद्धांतनात समावेश केला आहे.)

हे सर्व लक्षात न घेता, आर्थिक-सामाजिक प्रश्नांचेही शास्त्रीय विश्लेषण करू असे म्हणायचे; निसर्गविज्ञान आणि समाजविज्ञान यातील सामाइकतेसोबत त्यातील मूलभूत फरक लक्षात घ्यायचे नाहीत; मार्क्सने मांडलेली विशिष्ट शास्त्रीय चिकित्सापद्धत, त्यातील विशिष्ट वैज्ञानिक गृहीतकृत्ये, विश्लेषणपद्धती, त्यांचा झालेला विकास हे सर्व बाजूला ठेवून समाजाचे शास्त्रीय विश्लेषण करू

बघायचे– हा एक प्रकारचा भाबडा विज्ञानवाद होईल.

वर म्हटल्याप्रमाणे रेनेसाँप्रणीत ‘वैज्ञानिक दृष्टिकोना’ला जनहितवादी भूमिकेची जोड देऊन अंधश्रद्धा निर्मूलन चळवळ, लोकविज्ञान चळवळ यांचे बहुमोल काम निरनिराळ्या संघटना व व्यक्ती यानी केले. नैसर्गिक घडामोडींचे स्पष्टीकरण करताना अतिभौतिकशक्तीचा आधार घेणाऱ्यांना विरोध करणे, देवा–धर्माच्या नावाने जादूटोणा किंवा ‘चमत्कार’ करून केल्या जाणाऱ्या फसवणुकीला किंवा निरर्थक कर्मकांडांना विरोध करणे इत्यादी गोष्टी डॉ.दाभोलकरांच्या नेतृत्वाखाली अंनिस करत होती, आजही करत आहे. सामान्य जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांबाबत (दुष्काळ, आरोग्यसेवेची वानवा, अणुयुद्धाचा धोका, पर्यावरण विनाश इ.) वैज्ञानिक जागृती करणे, त्यातील तंत्रवैज्ञानिक पैलूंचा उलगडा करणे व आधुनिक तंत्र–विज्ञानाचा मानवाच्या भल्यासाठी उपयोग करण्यासाठी आग्रह धरणे, हे लोकविज्ञान चळवळीचे काम निरनिराळ्या संघटना–व्यक्ती यांनी केले, करत आहेत. हे सर्व खूप महत्त्वाचे आहे. अंधश्रद्धाविरोध, ‘वैज्ञानिक दृष्टिकोना’चा पुरस्कार हे सर्व काम आज तर विशेष महत्त्वाचे आहे, कारण संघप्रणीत शक्ती सरकारी आशीर्वादाने अंधश्रद्धा, दैववाद इत्यादी गोष्टी जोरात पसरवीत आहेत. या कामाच्या व त्यामागील आधारभूत संकल्पनांच्या मर्यादा याचीही स्पष्ट कल्पना हवी. वाढत्या बेकारीसारखे कळीचे आर्थिक–सामाजिक प्रश्न हे ‘विज्ञान–चळवळी’चे कार्यक्षेत्र नाही, विज्ञान–चळवळीतर्फे पसरवला जाणारा रेनेसाँप्रणीत (निसर्ग) वैज्ञानिक दृष्टिकोन यासाठी पुरा पडणारा नाही.

**वैज्ञानिक दृष्टिकोनाची नेहरूप्रणीत मांडणी**

वर उल्लेखिलेल्या भाबड्या विज्ञानवादाची सुरुवात भारतात पंडित नेहरूंनी केली. भारतापुढे असलेले प्रश्न सोडवण्यासाठी कशाची आवश्यकता आहे, हे मांडताना "Discovery of india' (१९४५) मध्ये पंडित नेहरूंनी ‘वैज्ञानिक दृष्टिकोना’चा पुरस्कार केला होता. ते म्हणतात – What is needed is the scientific approach, the adventurous and yet critical temper of science, the search for truth and new knowledge, the refusal to accept anything without testing and trial, the capacity to change previous conclusions in the face of new evidence, the reliance on observed fact and not on pre-conceived theory, the hard discipline of the mind- all this is necessary, not merely for the application of science but for life itself and the solution of its many problems. ही भूमिका अर्थातच स्वागतार्ह होती. पण त्यात एक घोळ होता. निसर्गातील घडामोडींकडे भौतिकवादी–वैज्ञानिक दृष्टिकोनातून बघितले पाहिजे, एवढाच अर्थ त्यात अभिप्रेत नाही. भारतीय समाजापुढील प्रश्न सोडवण्यासाठी कोणती दृष्टी अंगीकारली आहे, हेही अभिप्रेत असताना मार्क्सनंतर १०० वर्षांनी मार्क्सचा उल्लेखही नेहरू करत नाहीत! वर्गीय अंतर्विरोध, ऐतिहासिक दृष्टिकोन हे मार्क्सच्या समाजशास्त्रीय विश्लेषण–पद्धतीचा कळीचा भाग होते. पण साम्राज्यवादी, भांडवली हितसंबंध आणि भारतातील जनतेचा विकास यातील अंतर्विरोध नेहरूंच्या ‘आधुनिक विकासवादी, विज्ञानवादी’ भूमिकेत नजरेआड झाले; कारण ते पुरोगामी, भांडवली विकासाचे प्रणेते व वैचारिक–राजकीय नेते होते.

भारताच्या राज्यघटनेत १९७६ मध्ये ‘वैज्ञानिक दृष्टिकोन’चा समावेश करण्यामागे ही नेहरूप्रणीत समज होती. नंतर १९८१ मध्ये "Scientific Temper Statement' बनवण्यामध्ये अनेक पुरोगामी विचाराचे शास्त्रज्ञ, विचारवंत, काही मार्क्सवादीही होते. पण त्यातही ही नेहरूवादी समज वेगळ्या भाषेत मांडली होती. त्यामध्ये सामाजिक संबंधांमधील अंतर्विरोध, त्याची ऐतिहासिकता या मार्क्सवादी संकल्पनांचा समावेश न करता भारतातील प्रश्न सोडवण्याचा संकल्प मांडला होता. हा एक प्रकारचा भाबडा विज्ञानवाद होता.

सारांश सांगायचा तर– भारतातील विज्ञान–चळवळीचा, विज्ञानप्रबोधनाचा वैचारिक पाया हा आधुनिक पाश्चिमात्य जगातून आलेला रेनेसाँप्रणीत वैज्ञानिक दृष्टिकोन राहिलेला आहे. त्याला मानवतावादाची जोड देऊन बरेच जनवादी परिवर्तनाचे काम झाले आहे, अजूनही केले पाहिजे. पण वैज्ञानिक दृष्टिकोनदिनाच्या निमित्ताने मांडणी करताना याचेही भान असावे की– त्यापलीकडे जाऊन आर्थिक–सामाजिक प्रश्नांच्या चिकित्सेत उतरताना सर्जनशील मार्क्सवादी वैज्ञानिक चिकित्सापद्धतीचा उल्लेखही न करता फक्त रेनेसाँप्रणीत ‘वैज्ञानिक विचारपद्धती आणि दृष्टिकोना’च्या चौकटीत राहून शास्त्रीय उत्तरे मिळतील असे समजणे, हा भाबडा विज्ञानवाद आहे.

**अनंत फडके**, पुणे
anant.phadke@gmail.com / Mob. 9423531478

नवे पुस्तक

परेश राजश्री मनोहर

# भोवंडून टाकणाऱ्या वर्तमानाचा अस्वस्थ करणारा आरसा

या कादंबरीला अद्भुतिका म्हणत असला, तरी मला ती आजच्या रोजच्या जगण्याला अत्यंत टोकदारपणे भिडणारी वास्तववादी कादंबरी वाटते. प्रणवच्या सगळ्याच लिखाणातून हा कन्स्ट्रक्ट अगदी ठळकपणे जाणवत असतो. तो म्हणजे– आपल्या जगण्याशी संबंधित वेगवेगळे पैलू घेऊन त्यांची वाचकांना अपरिचित अशा वेगळ्याच जगात मांडणी करण्याचं त्याचं कसब. या कादंबरीमध्येही आपण वाचताना अनेक वेळा अडखळतो, कारण आपल्याला परिचित असणाऱ्या वस्तू वेगळ्याच भूमिकेतून आपल्यावर येऊन आदळतात. ज्या गोष्टी आपण रोजच वापरत असतो, त्यांचा इतका वेगळा वापर कथावस्तू म्हणून होताना आपण बघतो, तेव्हा आपल्याला सेट व्हायला काही काळ लागतो. पण एकदा का आपली नजर आणि मन स्थिरावलं की, मग आपणही मयंकसोबत त्या ‘९६ मेट्रोमॉल’मध्ये जाऊन उभे राहतो.

ॲमेझॉनवर ४० ते ६० टक्के डिस्काऊंटची ऑफर आहे मम्मा... फोर सीझनमध्ये बंपर ऑफरची जाहिरात बघितली पप्पा... ड्यूड, हा फोन आऊटडेटेड झालाय, तो बघ काल आलेला नवा रापचिक पीस... मला न घालायला कपडेच नाहीयेत धड... फक्त आणि फक्त आमचीच शाळा, फक्त आणि फक्त आमचाच पक्ष... फक्त आम्ही म्हणू तेच खरे, आम्ही आहोत ना, मग विचार कसला करताय...

या आणि अशा सगळ्या वातावरणात आपण जेव्हा जगतो– नव्हे, आपण जेव्हा आरामात जगतो; तेव्हा ‘९६ मेट्रोमॉल’ची गरज असते... आपण काय करायला हवं, आपल्या जगण्यासाठी कोणत्या गोष्टी महत्त्वाच्या, कोणत्या नाहीत, आपल्याला काय घ्यायला हवं, काय नको– हे जेव्हा जाहिराती ठरवतात, तेव्हा ‘९६ मेट्रोमॉल’ची गरज असते... कोणत्या पक्षाला आपण मत द्यायला हवं, कोणाशी लग्न करावं, कोणाला टाळावं, आपण जे आहोत ते बरोबर नसून जे असायला हवं ते जेव्हा दुसरेच सांगतात; तेव्हा ‘९६ मेट्रोमॉल’ची गरज असते...

गेल्या दीड–दोनशे वर्षांत झालेल्या सामाजिक सुधारणा, स्वातंत्र्य चळवळ व शिक्षणप्रसारातून आजवर शिक्षणाच्या कवेत न आलेला बहुसंख्य समाज शिकायला आणि त्यातून बदलायला लागलेला आपल्याला दिसतो. या टप्प्यावर लोक भोवतालच्या चौकटीला धक्के देताना दिसतात आणि नव्या गोष्टी करण्याचे प्रयत्न करताना दिसतात. यातही समाजातील रूढ अर्थाने वरच्या स्तरातले आणि सत्तास्थानाच्या जवळ असणारे लोक येणारे बदल प्रथम स्वीकारतात आणि मग त्याचं अनुकरण खाली झिरपत जाताना दिसतं. खुला विचार हा कायमच सामूहिकतेकडून व्यक्तिगततेकडे घेऊन जाणारा असतो. आलेलं शिक्षण आणि त्यातून येणाऱ्या नव्या विचाराने जगणं आतून–बाहेरून बदलायला सुरुवात होते... आणि अशा वेळी भाषा, खाणं–पिणं, कपडे, घर, नातेसंबंध अशा सगळ्याच गोष्टी बदलत जातात.

याच सगळ्या बदलांकडे, यातील मुळात असणाऱ्या बदलाच्या आकांक्षांकडे आणि मूलभूत प्रेरणेकडे लक्ष ठेवून बसलेला एक अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे बाजार. (जो

या कादंबरीतला मुख्य घटक आहे) हा बाजार लोकांच्या गरजा पूर्ण करतो, हे बरोबरच, पण लोकांच्या गरजा निर्माण करणं, त्यांच्या वाढत्या गरजांच्या माध्यमातून त्यांच्या आकांक्षा आणि जगण्याला आकार द्यायचं कामही बाजार करत असतो. आधी बाजार हा तुलनेने स्थानिक होता आणि स्थानिक लोकांच्या गरजांप्रमाणे पुरवठा करणं हे त्याचं मूळ उद्दिष्ट होतं. हजारो वर्षांच्या वेगवेगळ्या टप्प्यांतून जाताना बाजार शक्तिशाली होत गेला आणि आता गेल्या तीसेक वर्षांमध्ये बाजार सर्वव्यापी बनला. आता तर माझ्या गावाच्या दुकानात काय विकलं जावं, याचा निर्णयही एखाद्या भलत्याच विकसित देशातली कंपनी करत असते. अनेक देशांच्या एकूण उत्पन्नापेक्षाही मोठाले टर्नओव्हर असणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आज आपल्या जगण्याचे निर्णय घेतात.

बाजारू कंपन्यांसोबतच मानवी जगण्यातील एक महत्त्वाचा भाग असलेला मनोरंजन उद्योग एका बाजूला गाणी, सिनेमा, मालिका अशा सगळ्या माध्यमांतून लोकांचं मनोरंजन करतो आणि दुसऱ्या बाजूला त्यातूनच समाजाच्या सामूहिक व व्यक्तिगत अशा दोन्ही पातळ्यांवरील धारणांना आकार देण्याचं कामही करतो. मानवी भावभावना, परस्पर-नातेसंबंध, प्रेम, धर्म- अशा सर्वच धारणा गेल्या शतकांत मनोरंजन माध्यमाच्या आधाराने वेगळ्या स्वरूपात पुढे आलेल्या आपल्याला दिसतात. आपल्या कोणत्याही भावना- मग त्या अत्यंत खासगी असोत किंवा सामूहिक- त्या व्यक्त करताना आपल्याला या मनोरंजन माध्यमाने दिलेल्या साधनांचा वापर करावा लागतो.

वेगवेगळ्या स्थानिक पातळीवर विखुरलेला बाजार जेव्हा संघटित स्वरूप घ्यायला लागला, तेव्हा वस्तू तयार करणं हे जसं आव्हान होतं तसंच ते विकणं हेही मोठं आव्हान झालं. याच टप्प्यावर जाहिराती, मार्केटिंग क्षेत्र आणि मीडिया आपली भूमिका घेऊन येतो. आधी हळुवार विनंती करणारी, आपलं उत्पादन घ्यावं म्हणून आर्जव करणारी ही व्यवस्था मग बाजाराच्या बदलत्या स्वरूपाप्रमाणे आता भयंकर ॲग्रेसिव्ह होत आपल्या जगण्याच्या सर्वच कक्षा व्यापून पुढे जाते आहे. आपल्या भोवतालातील सगळ्याच अवकाशाला जाहिरातींनी घेरलं आहे. आता आपण कोणते कपडे घालावेत, काय प्यावं, कधी खावं, काय खावं, दिसावं कसं, शिकावं कसं- हे सगळं बाजार ठरवायला लागला आहे. जी पिढी या चक्रवाताच्या आधी जन्माला आलेली आहे, ती किमान आधी आणि नंतर असा फरक करायचा प्रयत्न तरी करते; पण जी नवतरुण पिढी- आजच्या भाषेत मिलेनिअल्स- जे या धुवांधार वर्षावात जन्मले, त्यांना हा सगळा गोंधळ आणि उन्माद म्हणजेच 'हॅपनिंग लाईफ' वाटते. आणि सलग, सातत्याचा एखादा विचार करण्याची पद्धत आउटडेटेड वाटते.

मीडियाने, या बाजाराने आपल्या जगण्याचं काय करून ठेवलं आहे याचे पुरावे आपण पदोपदी बघत असताना प्रणव सखदेव लिखित '९६ मेट्रोमॉल' ही लघुकादंबरी आपल्या हाती येणं हा योगायोग नाही, तर ती गरज आहे. या कादंबरीचं प्रमुख पात्र मयंक नावाचा एक विशीतला, उच्चवर्णीय आणि उच्चवर्गीय नवतरुण आहे. पण या कादंबरीचा प्रोटोगॉनिस्ट हा बाजार आहे. हा मयंक भयंकर दारू पिऊन चिल मारताना, 'फुलटास' होतो आणि एका मायावी राज्यात पोहोचतो. तिथे त्याला त्याच्या रोजच्या जगण्यातले मोबाईलड्यूड, कोल्ड्रिंक्स, टॅब्ज आणि वेगवेगळी गॅझेट्स भेटतात. फरक एकच असतो- मयंकच्या रोजच्या जगण्यात तो त्यांना वापरत असतो आणि इथे या अद्‌भुत राज्यात ही गॅझेट्स मयंकला वापरत असतात. या सगळ्या भोवंडून टाकणाऱ्या प्रवासात मयंक भरकटतो, गोंधळतो, हतबल होतो आणि येईल त्या अनुभवाला सामोरा जात राहतो- कोणताही विचार न करता. करून तर बघू, ट्राय मारते है- या अभिनिवेशात. वेगवेगळ्या पार्ट्यांना जाण्याचा मोह न सोडता आल्याने जाईल तिथे त्रास करून घेतो आणि पळत राहतो ऊर फुटेस्तोवर. इथे मयंकला भेटते एक मीडियाराणी. या मीडियाराणीला दोनच मिती असतात. तिला तिसरी मितीच नाही, जी गोष्टींचे पूर्ण रूप समजून घेण्यासाठी अत्यंत आवश्यक असते. मयंक आधी तिच्याकडे ओढला जातो आणि मग त्या भोवऱ्यात सापडून पळत सुटतो. हा सगळा प्रवास म्हटलं तर एका रात्रीचा आहे, म्हटलं तर एका पिढीचा आहे. या प्रवासात भेटणारी सगळीच गॅझेट्स आपल्या भोवतालचे मानवी व्यवहार आणि भावना घेऊन येतात. इथे सगळ्यांनाच फक्त उपभोग घ्यायचा असतो. इथला प्रत्येक जण (पक्षी : वस्तू) आपण विकले जाणार का, या विवंचनेत असतो आणि त्यात मीडियाराणी आपल्याला सोबत घेणार की नाही, या शंकेने घेरलेला असतो. स्वत: विकले जाण्याच्या प्रक्रियेत या वस्तू त्यांच्या उपभोक्त्यालाच गिळंकृत करायला बसलेल्या आपल्याला दिसतात. तरुण मुलं आणि पुरुषांना नादी

लावणारी पोर्न इंडस्ट्री असो, नाही तर रोजच्या जगण्यातल्या पेन्सीलपासून फ्रीजपर्यंतच्या गोष्टी- प्रत्येक जण मीडियाराणीला अंकित झालेला असतो.

वंडरलँडच्या ॲलिसला प्रणवने ही लघुकादंबरी अर्पण केली आहे. खरं तर लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांना या ॲलिसची अद्‌भुत कथा अजूनही भुरळ घालत असते. याच कथेतील अद्‌भुताचा माग काढत प्रणव आपली अद्‌भुतिका रचतो. पण मला प्रणवचे कौतुक वाटते ते यासाठी की, अद्‌भुतरम्य जगात फिरण्याच्या सगळ्याच शक्यता आणि संधी असताना त्याच्यासारखा तरुण लेखक जमिनीवर पाय घट्ट रोवून रोजच्या जगण्याला भिडणाऱ्या या हिंस्र अद्‌भुत जगात शिरतो. तेवढंच महत्त्व मला रोहन प्रकाशनचेदेखील वाटते. सुरस-निरसतेच्या निसरड्या वाटेवर जाऊ शकणारी ही कादंबरी स्वीकारून प्रकाशित करणं, हेही धाडसच.

प्रणव या कादंबरीला अद्‌भुतिका म्हणत असला, तरी मला ती आजच्या रोजच्या जगण्याला अत्यंत टोकदारपणे भिडणारी वास्तववादी कादंबरी वाटते. प्रणवच्या सगळ्याच लिखाणातून हा कन्स्ट्रक्ट अगदी ठळकपणे जाणवत असतो. तो म्हणजे- आपल्या जगण्याशी संबंधित वेगवेगळे पैलू घेऊन त्यांची वाचकांना अपरिचित अशा वेगळ्याच जगात मांडणी करण्याचं त्याचं कसब. कादंबरीही वाचताना अनेक वेळा अडखळतो, कारण आपल्याला परिचित असणाऱ्या वस्तू वेगळ्याच भूमिकेतून आपल्यावर येऊन आदळतात. ज्या गोष्टी आपण रोजच वापरत असतो, त्यांचा इतका वेगळा वापर कथावस्तू म्हणून होताना आपण बघतो, तेव्हा आपल्याला सेट व्हायला काही काळ लागतो. पण एकदा का आपली नजर आणि मन स्थिरावलं की, मग आपणही मयंकसोबत त्या '९६ मेट्रोमॉल'मध्ये जाऊन उभे राहतो.

अशा प्रकारच्या संरचनाआधारित लिखाणावर स्वार होताना तांत्रिकतेच्या ओझ्याखाली मूळ सांगायची असलेली गोष्ट धूसर होण्याची किंवा विरून जाण्याची एक भीती कायम असते. प्रणवने ही भीती मनावर न घेता ही कथा सांगायचे धाडस केले आहे, ते मला महत्त्वाचं वाटतं. खरं तर या मेट्रोमॉलमध्ये प्रवेश करताना भोवताल माझ्या डोक्यात गोंधळ घालत होता आणि आपल्या वर्तमानाचा धांडोळा घेतल्याशिवाय या कादंबरीबद्दल बोलणं शक्य नव्हतं. कारण चहूबाजूंनी आक्रमण करणाऱ्या बाजाराचे अत्यंत प्रत्ययकारी रूपक म्हणजे '९६ मेट्रोमॉल' ही कादंबरी आहे.

देशात चालू असणाऱ्या कोरोनापासून वाढत्या बेरोजगारीपर्यंत, बंद असलेल्या शिक्षणापासून वाढत जाणाऱ्या आत्महत्यांपर्यंत सगळ्याच गोष्टींकडे दुर्लक्ष करून मीडियाराणी ज्या उत्साहाने व आक्रमकतेने रिया चक्रवर्तीचे लचके तोडण्यात आणि सुशांतसिंगच्या मृत्यूला आंतरराष्ट्रीय मुद्दा बनवण्यात मश्गुल आहे, त्या काळात '९६ मेट्रोमॉल' येणं हे अत्यंत महत्त्वाचं आहे.

**परेश जयश्री मनोहर,** वाघळवाडी
paresh.jm@gmail.com / Mob.9822914751

**९६ मेट्रोमॉल**
लेखक : प्रणव सखदेव
प्रकाशक : रोहन प्रकाशन, पुणे
पृष्ठे : १२८, किंमत : १५० रुपये

## तर्कतीर्थ जोशी यांच्या वाङ्‌मयाविषयी आवाहन

कोल्हापूर : महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातर्फे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे समग्र वाङ्‌मय संपादन व प्रकाशन प्रकल्प हाती घेण्यात आला असून, त्यासाठी लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासंबंधी कुणाकडे आठवणी, भाषणांसह विविध वस्तू असल्यास संपर्क साधण्याचे आवाहन संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांनी केले आहे.

यासंदर्भातील लेख, पत्रे, छायाचित्रे, साहित्यकृतींच्या पहिल्या आवृत्ती, परीक्षणे, प्रस्तावना, ध्वनिमुद्रण, छायामुद्रण, संबंधित जुनी नियतकालिके, वृत्तपत्रे, कात्रणे, हस्तलिखित, मुलाखती, भाषणे, आठवणी, वस्तू, चित्रे, पदव्या, सन्मानपत्रे, आदी साधने ज्यांच्या संग्रही असतील त्यांनी डॉ. सुनीलकुमार लवटे, 'निशांकुर' अयोध्या वसाहत सुर्वेनगरजवळ, कोल्हापूर. (Mob.9881250093) येथे प्रत्यक्ष संपर्क साधून अथवा, टपालाने पाठवून सहकार्य करावे. या प्रकल्पामध्ये मराठी विश्वकोश नोंदसंग्रह, भाषणसंग्रह (चार खंड), लेखसंग्रह (दोन खंड), मुलाखत संग्रह, प्रस्तावनासंग्रह, समीक्षासंग्रह, पत्रसंग्रह, संस्कृत हस्तलिखित सूचीसंग्रह (दोन खंड), भारतीय राज्यघटना संस्कृत भाषांतर खंड, साहित्यसंग्रह असे पंधरा खंड संपादित करून प्रकाशित केले जाणार आहेत.

अभिवादन

दिलीप धोंडगे

# कृतार्थतेने व कृतज्ञतेने आयुष्य जगलेले विक्रम साराभाई



श्रीमंत कुटुंबात जन्मलेले साराभाई यांनी अवकाशविज्ञान, संज्ञापन, हवामानशास्त्र, कृषी, भूमिउपयोग योजना, आपत्तीशोध, शिक्षण, वैद्यक इत्यादी क्षेत्रांत पायाभूत काम करून नवभारताचे स्वप्न साकार करण्याचे वयाच्या बावन्न वर्षांपर्यंत अथक प्रयत्न केले. डॉ.होमी भाभांप्रमाणेच साराभाई अल्पायुषी ठरले, नाही तर या दोघांनी भारताला वेगळाच चेहरा मिळवून दिला असता. पहिले पंतप्रधान पं.नेहरूंना या दोन्ही शास्त्रज्ञांचा मोठा अभिमान वाटत होता. प्रचलित अत्याधुनिक तंत्रज्ञानात्मक साधनांचा वापर करून भारताचा जलद गतीने विकास घडवून आणण्याचे साराभाईंचे ध्येय होते. त्या ध्येयपथावरून प्रत्येकाने जमेल तशी वाटचाल करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

'करंट सायन्स' या पाक्षिकाच्या २५ एप्रिल २०२० च्या अंकात (खंड ११८, क्रमांक ८) नेहमीच्या सदरांबरोबर विख्यात भौतिकी, अणुऊर्जा शास्त्रज्ञ, अवकाश शास्त्रज्ञ, व्यवस्थापनतज्ज्ञ, व्यावसायिक, नवभारताचे स्वप्न साकार करण्यासाठी अनेक संस्थांचे संस्थापक अशा विविध नात्यांनी दिगंत कीर्ती प्राप्त केलेले विक्रम साराभाई यांच्या जन्मशताब्दीनिमित्त (जन्म : १२ ऑगस्ट १९१९, मृत्यू : ३१ डिसेंबर १९७१) त्यांच्या बहुआयामी कर्तृत्वाला उजाळा देणाऱ्या साराभाईंबरोबर काम करण्याची संधी प्राप्त झालेल्या थोर व्यक्तींनी लिहिलेल्या सेहेचाळीस पृष्ठांचा एक विशेष विभाग समाविष्ट केला आहे. त्यामध्ये चार पृष्ठे ही साराभाई यांच्या बालपणापासून निधनापर्यंत विविध आठवणी जागृत करणाऱ्या छायाचित्रांची आहेत. 'करंट सायन्स' हे पाक्षिक करंट सायन्स असोसिएशन आणि इंडियन ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसद्वारा बेंगळुरू येथून प्रकाशित केले जाते.

या विशेष विभागात एकूण तेरा लेख आहेत आणि इस्रोचे (इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन) माजी अध्यक्ष के.कस्तुरीरंगन यांची प्रस्तावना आहे. इस्रो ही संस्था हे साराभाईंच्या सर्जनशील विचारांचे अपत्य (ब्रेन चाइल्ड) असल्याचे सर्वविदित आहे. ई.व्ही. चिटणीस हे यूआरएल : फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी, अहमदाबाद येथे कार्यरत होते. नंतर ते साराभाईंचे इस्रोतील निकटतम सहकारी होते. त्यांच्या लेखात त्यांनी सारभाईंचे वर्णन 'शास्त्रज्ञ, व्यावसायिक, दूरदृष्टीने संस्था उभ्या करणारे' असे केले आहे. इस्रोच्या अहमदाबाद येथील स्पेस ॲप्लिकेशन केंद्राचे निवृत्त संचालक प्रफुल्ल भावसार यांनी साराभाईंच्या सामूहिक (कॉर्पोरेट) कार्यपद्धतीविषयी प्रकर्षाने लिहिले आहे. अशा कार्यपद्धतीत कोणी राजा नसतो, कोणी प्रजा नसते, कोणी गुन्हेगार नसतो, कोणाला शिक्षा होत नसते. सर्व धर्माचरण (रिईच्युअल्स) करून एकमेकांचे संरक्षण करत असतात, असे एका संस्कृत श्लोकाच्या आधारे स्पष्ट केले आहे. 'वैज्ञानिक समूहात काम करताना साराभाईंएवढ्या गुणवत्तेच्या कोणाही व्यक्तीला मी भेटू शकलो नाही,' अशी प्रतिक्रिया साराभाईंच्या काही आठवणी नमूद करून भारतरत्न सी.एन.आर. राव यांनी

व्यक्त केली आहे. कृषितज्ज्ञ एम.एम. स्वामिनाथन यांनी साराभाईंचा उल्लेख वैज्ञानिकांचे वैज्ञानिक असा केला आहे. दिल्ली राज्यातील गव्हाची शेते पाहिल्यावर (१९६७ मध्ये) स्वामिनाथन यांना साराभाई म्हणाले की, हे सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. दूरदर्शनच्या साधनांचा व रिमोट सेन्सिंगचा वापर करून हे सहज शक्य वाटल्यामुळे त्यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधींना भेटून दूरदर्शनवरील 'कृषिदर्शन' कार्यक्रमाची मुहूर्तमेढ रोवली. तिरुअनंतपुरम येथील विक्रम साराभाई अंतराळ केंद्राचे संचालक प्रमोद काळे यांनी साराभाईंचा उल्लेख 'दूरदृष्टीची प्रेरणा देणारी व्यक्ती' असा केला आहे. साराभाईंच्या भाषणांमधील विचार खूपच प्रेरणादायी असल्याचे त्यांचे प्रतिपादन महत्त्वपूर्ण आहे. पुणे येथील 'नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रोफिजिक्स' संस्थेत सध्या कार्यरत असलेले व उटी येथील उंच टेकडीवर रेडिओ टेलिस्कोप बसवणारे गोविंद स्वरूप यांनी साराभाईंबरोबर ज्या चर्चा झाल्या होत्या, त्या नमूद केल्या आहेत. गोविंद स्वरूप हे टाटा मूलभूत संशोधन संस्थेत कार्यरत असताना साराभाईंनी त्यांच्यावर रेडिओ टेलेस्कोप बसवण्याची जबाबदारी सोपवली होती. मोठी स्वप्ने पाहणाऱ्या व त्यामुळे आपल्याला चंद्राकडे जाता येत आहे असे वर्णन करून अमृता शाह यांनी नावीन्यपूर्णता, उपक्रम, सुधारणा ही साराभाईंच्या कार्यपद्धतीची वैशिष्ट्ये नमूद केली आहेत. आर.बी. ग्रोव्हर (होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट, मुंबई येथील ॲटोमिक एनर्जी कमिशनचे सदस्य) व एम.आर. श्रीनिवासन (उटकमंड येथील ॲटामिक एनर्जी कमिशनचे माजी चेअरमन) यांनी संयुक्तपणे लिहिलेल्या लेखात भारतातील अणुऊर्जा विकासासाठी साराभाईंची जी दृष्टी होती, तिचा ऊहापोह केला आहे. अभिजित सेन (गांधीनगर येथील प्लाझ्मा रिसर्च सेंटरमध्ये कार्यरत) यांनी भारतीय एकसंधन (फ्युजन) कार्यक्रमाच्या साराभाईंच्या अकथित वारशाबद्दल लिहिले आहे. अवकाशशक्तीबद्दलची साराभाईंची दृष्टी व त्यासाठी केलेले काम याबद्दल बेंगळुरू येथील इस्रोत काम केलेले शास्त्रज्ञ आर.अरावमुदन यांनी लिहिले आहे. इस्रोतील यच्चयावत उपक्रमांबद्दल त्यांच्या लेखात माहिती मिळते. अरावमुदन यांनी 'इस्रो : अ पर्सनल हिस्टरी', हार्पर कॉलिन्स, २०१७ हे पुस्तकही लिहिले आहे. हे पुस्तक त्याच वेळी मी मोठ्या कुतूहलाने वाचले होते. पुस्तकाच्या मलपृष्ठावर अरावमुदन व भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम हे उकाड्यामुळे सदरा काढून बनियनवर प्रॉपेलंट बनवतानाचे छायाचित्र आहे. सुरुवातीला इस्रोमध्ये पंखे नव्हते. सार्वजनिक बस वा सायकलीने शास्त्रज्ञ ये–जा करत असत. कार्तिकेय साराभाई (साराभाईंचे सुपुत्र व अहमदाबाद येथील पर्यावरण शिक्षण केंद्रात कार्यरत असलेले) व पद्मनाभ जोशी (अहमदाबाद येथील नेहरू फाउंडेशन फॉर डेव्हलपमेंटच्या विक्रम साराभाई पुराभिलेखागारमध्ये कार्यरत) यांच्या संयुक्त लेखात विकसनशील राष्ट्रांसाठी विज्ञानाच्या योगदानाबद्दलचा ऊहापोह केला आहे. आपले पुत्र कार्तिकेय यांनी मानव आणि निसर्ग यांच्या संतुलनासाठी संस्था काढावी यासाठी साराभाईंनी प्रेरणा दिली. इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात कार्यरत असलेल्या जोसेफ फ्रैंकोब यांनी साराभाईंच्या 'क्षितिजसमांतर नियंत्रण' प्रशासनपद्धतीचा परिचय करून दिला आहे. अहमदाबाद येथील भारतीय व्यवस्थापन संस्था व इतर सर्व संस्था यांमध्ये या पद्धतीनेच कार्यसंस्कृती विकसित केली. टी–ग्रुप म्हणजे निरीक्षणातून परस्परसंबंध व संज्ञापनकौशल्ये विकसित करणे. भाभांनी रुजवलेली अंतर्निहित नियंत्रण आणि अंगीकृत कार्याशी बांधिलकी व पर्यवेक्षणाची खुली पद्धत याचेच साराभाईंनी क्षितिजसमांतर नियंत्रण प्रशासनपद्धतीत विकसन केले.

श्रीमंत कुटुंबातील साराभाई यांनी अवकाश–विज्ञान, संज्ञापन, हवामानशास्त्र, कृषी, भूमिउपयोग योजना, आपत्तिशोध, शिक्षण, वैद्यक इत्यादी क्षेत्रांत पायाभूत काम करून नवभारताचे स्वप्न साकार करण्याचे वयाच्या बावन्न वर्षांपर्यंत अथक प्रयत्न केले. साराभाईंचा मृणालिनी स्वामिनाथन या शास्त्रीय नर्तक यांच्याशी प्रेमविवाह झाला होता. कार्तिकेय हा मुलगा व मल्लिका ही मुलगी. कुटुंबातील चारही व्यक्तींना भारत सरकारने त्यांच्या योगदानाबद्दल पद्म पुरस्काराने सन्मानित केले. डॉ.होमी भाभांप्रमाणेच साराभाई अल्पायुषी ठरले, नाही तर या दोघांनी भारताला वेगळे स्थानमिळवून दिले असते. पहिले पंतप्रधान पं.जवाहरलाल नेहरूंना या दोन्ही शास्त्रज्ञांचा मोठा अभिमान वाटत होता.

प्रचलित अत्याधुनिक तंत्रज्ञानात्मक साधनांचा वापर करून भारताचा जलद गतीने विकास घडवून आणण्याचे साराभाईंचे ध्येय होते. त्या ध्येयपथावरून प्रत्येकाने जमेल तशी वाटचाल करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल.

**दिलीप धोंडगे,** सटाणा, नाशिक
dhondgedilip@gmail.com / Mob.9423182147

## प्रतिसाद

### हिंदुस्थानच्या घडणीचे भ्रमजाल

श्री. प्रभाकर देवधर यांच्या लेखामुळे (आजच्या हिंदुस्थानची घडण : २६ सप्टेंबर २०२०) बरीच कुतूहलशमक माहिती मिळाली. 'आम्ही भारतीय जनता' हिने घडविलेला 'इंडिया दॅट इज भारत' म्हणजेच देवधर यांचा हिंदुस्थान असावा! त्याचा नकाशा इंग्रजांनी बनविला, ही ऐतिहासिक माहिती त्यांनी सिद्ध केली आहे. त्यांच्याआधी इथे राजेलोक सर्रास एकमेकांशी लढत होते, पण इंग्रजांमुळे भारत 'एकत्र' आला, अशी भौगोलिक माहितीही ते सांगतात. त्यांच्या शाळेत दक्षिण भारताचा इतिहास फारच त्रोटक शिकवला गेला, याची त्यांना खंत वाटते. इतिहास व वर्तमानातील गुंतागुतीचे प्रश्न ते धारदार प्रहार करून उद्‌ध्वस्त करतात. अतिशय संघटित असलेली सेना ही एकच देशव्यापी संघटना आहे, हे हक्सले यांचे अज्ञान ते उघड करतात; कारण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही पण तशीच म्हणजे सेनेसारखी संघटना आहे, हे त्यांना म्हणजे हक्सले वगैरेंना ठाऊक नसावे, असा तर्क ते मांडतात. याचा अर्थ, नेहरूंनंतर सत्ता बळकावण्यासाठी लष्कर हे एकमेव दावेदार होते असे नसून, रा.स्व.सं. हासुद्धा तेवढाच दमदार तोडीस तोड संभाव्य दावेदार होता आणि या प्रतिस्पर्ध्यामुळेच नेहरूंनंतर लष्करशाही आली नाही आणि देशात लोकशाही स्थिरावली, हेही त्यांनी जाता-जाता चपखलपणे दाखवून दिले आहे. हे संपूर्ण नवे संशोधन असून त्याबद्दल आपण लेखकांचे आभार मानले पाहिजेत. वर्तमानाविषयीसुद्धा त्यांची माहिती अचूक व अद्ययावत आहे. देशात गरिबी हळूहळू निश्चितपणे कमी होत आहे. देशात २०१४ पर्यंत जो प्रचंड भ्रष्टाचार होता, तो नव्या सरकारने आता बराचसा कमी केला आहे. देश संघटित आहे आणि लोकशाही स्थिर आहे. आज देशात कुठल्याही जातीचा माणूस असला तरी स्वकर्तृत्वावर मोठा होऊ शकतो. स्त्रीशिक्षण सर्व समाजात पसरल्यावर आता पुरुषमंडळींचे वर्चस्व जवळजवळ नाहीसे होत आहे, स्त्री-पुरुष समानता आता सर्वमान्य होत आहे, इत्यादी. त्यांनी नोंदविलेली इंद्रलोकीची निरीक्षणे बारकाईने पाहणाऱ्या सर्व भारतीयांना रोजच्या रोजच अनुभवाला येत आहेत आणि त्यांना याचा अभिमान वाटला पाहिजे, हो की नाही? आता त्यांनी क्वचित शेरेबाजी केली आहे, जसे- पंडित जवाहरलाल नेहरू हे मग्रूर होते वगैरे. आता हा नवा शोध कुणी लावला, असा प्रश्न कृपया काढू नका. लेखक प्रत्येक विषयाचा सखोल अभ्यास करूनच अशी प्रमाणपत्रे देत असणार. देवधर यांना काही तरी नेहरूंच्या मग्रुरीचा अनुभव आल्याशिवाय का ते असे बोलतील? मॅकमहोन रेषेचा प्रश्न 'देवघेव' करूनच सोडवावा लागेल, असे देवधर यांचे ठाम मत आहे. नेहरूंना त्या वेळी १९६२ मध्ये हे देवघेव प्रकरण उमगले नाही, हीच तर त्यांची मग्रुरी नव्हे काय? विद्यमान राज्यकर्ते मात्र मग्रुरीने वागत नाहीत, मऊपणे वागतात. कारण देशात काय, परदेशात काय- देवाण-घेवाण करावी लागतेच, हे त्यांना समजते. म्हणूनच लडाख सीमा आता कशी शांत-शांत आहे! देवधर यांनी चीनप्रश्नाचे मर्म अचूक दिलखुलास मांडले आहे, याबद्दल त्यांचे आणि संपादकसाहेब, आपलेसुद्धा अभिनंदन केले पाहिजे; नाही का?

आता भारताची (म्हणजेच हिंदुस्थानची?) घडण अशा चिकित्सक रीतीने समजून घेतल्यानंतर सामान्य वाचकाच्या मनात एक छोटासा प्रश्न उरतो तो तेवढा मांडतो. श्री. देवधर यांनी या 'हिंदुस्थानला' सांधणारे पाच-सात दुवे सांगितले आहेत. त्यांच्या मांडणीचा हाच गाभा आहे आणि तेच त्यांचे मुख्य प्रतिपादन आहे. या पाच दुव्यांमध्ये क्रिकेट व सिनेमा यांच्याबरोबर इंग्रजांनी भेट दिलेली नोकरशाही आणि इंग्रजी भाषा यांनी भारताला जोडून ठेवले आहे, असे त्यांना वाटते. याच लेखात आधी 'स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या ब्राऊनसाहेबांची श्रेणी आयसीएस बदलून आयएएस केली, पण त्यांचे जनतेशी असेले संबंध जेते-जनता असेच राहिले' असे त्यांनी सडेतोड मत नमूद केले होते. या जीत-जनता संबंधांमुळेच भारत एकत्र टिकून राहिला, असे लेखकाला सुचवायचे असेल ना? सलमान खानची अर्धनग्न अदाकारी, कंगनाचा कमरमोड नृत्याविष्कार, बप्पी लाहिरींचे

कानांतील कचरा बदलून टाकणारे संगीत आणि तोकड्या स्कर्टमधले खटिया आयटम साँग (कुणाकुणाचे गुणगौरव करू? चुकभूल माफ करावी!) हे सगळे पापी पोट भरण्यासाठी नव्हे, तर भारताला एकत्र बांधून ठेवण्यासाठीच चालते, यातही शंका नाहीच!

पण ते असो. बरं का देवधरसाहेब आणि संपादक तुम्हीसुद्धा– यापेक्षा एक छोटीशी शंका मला सतावतीय, ती सांगायची का? ती शंका अशी की– 'हिंदुस्थानला' सांधणारे पाच दुवे मोजताना, या देशातील जनतेने वसाहतशाही जोखडातून मुक्त होण्यासाठी महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली जो अभूतपूर्व लढा दिला (दिला ना?) आणि त्या लढ्याच्या मंथनातून जी मूल्ये आमच्या समाजाने घडविली, अंगीकारली आणि शेवटी संविधानामध्ये प्रतिष्ठित केली; त्यांचा आपल्याला कसा काय हो संपूर्ण विसर पडला? म्हणजे काय, नेमके असे काय घडले की, आपल्याला दादाभाई–टिळक, गांधी–नेहरू, आझाद, असफअली आणि अन्य कोट्यवधी भारतीय स्वातंत्र्यसैनिकांनी अपूर्व त्यागातून हा आजचा हिंदुस्थान म्हणा– भारत म्हणा की इंडिया म्हणा– तो घडविला आहे, याचीच आठवणसुद्धा राहिली नाही? आपण एक दुवा म्हणून देशाच्या संविधानाचा गौरव केला. हे संविधान आम्हाला कोणी दान केले नाही, जसे इतर वसाहतींना इंग्रजांकडून मिळाले होते, तर ते 'आम्ही भारतीय जनतेने'च आपल्या प्रतिनिधींच्या माध्यमातून लिहविले. ते आधीची जवळजवळ शंभर वर्षे लोकआंदोलनांमधून उत्क्रांत होत होते. संपूर्ण स्वातंत्र्याच्या संकल्पाचा ठराव आमच्या लोकआंदोलनाने केला. त्या स्वातंत्र्याचा पाया माणसांचे मूलभूत हक्क असतील, हे भारतीय जनतेने स्वातंत्र्य चळवळीतच ठरवून घेतले. त्या स्वातंत्र्यात सर्वांसाठी समान संधी व श्रद्धास्वातंत्र्य राहील, अल्पसंख्याकांना समान स्थान असेल, हेही त्या चळवळीतच ठरले. कायद्याचे राज्य हे तत्त्वसुद्धा त्या लढ्यामधूनच आम्ही घडविले. 'कसेल त्याची जमीन', सर्वांना मोफत आणि सक्तीचे शिक्षण यांसारखी पुरोगामी कारभाराची मूलगामी तत्त्वे लोकआंदोलनातून वर आली. तेव्हाच आम्ही भारतीय लोक तुरुंगांमध्ये आणि रस्त्यांवर, रक्ताच्या पाटांमधून स्वातंत्र्य घडवीत असतानाच, स्वावलंबन आणि अस्पृश्यतानिवारणासारख्या सामाजिक सुधारणांची मुहूर्तमेढ रोवली. जाती–धर्मांमध्ये भाईचाराचे महत्त्व स्वातंत्र्य चळवळीनेच आम्हाला शिकविले. ही मूल्ये, स्वातंत्र्य चळवळीने दिलेला ठेवा हा भारताचा अमोल वारसा आहे. तेव्हा भारत म्हणजे केवळ समुद्रवलयांकित भूभाग नव्हे, भारत म्हणजे जीत–जेत्यांची नोकरशाही नव्हे, भारत म्हणजे दुसऱ्या कोणा देशाबरोबर गडगडाटी शत्रुत्व नव्हे आणि भारत म्हणजे सलमान खानचा सिनेमाही नव्हे; ते या सगळ्या पलीकडचे आहे. ती स्वातंत्र्यसैनिकांनी स्वतःला पणाला लावून सिद्ध केलेली मूल्यप्रणाली आहे.

**सुभाषचंद्र वाघोलीकर,** औरंगाबाद

## ते विधान मला शंभर टक्के पटले

दि.१० ऑक्टोबरचा साधना अंक आजच मिळाला. अंकातील संपादकीय 'माध्यमकर्मींनो, सिनिसिझमपासून स्वतःला वाचवा!' आजच्या माध्यमजगताचे यथातथ्य असे सम्यक् वर्णन व दर्शन घडवणारे झाले आहे. माध्यमांच्या अगदी प्राथमिक ते क्षितिज–विशाल अशी अंगभूत व मूलभूत कर्तव्ये आणि प्रयोजनाबद्दलची दोन मुख्य वैशिष्ट्ये– दर्पण व दिग्दर्शन– या संदर्भातील विवेचन आजच्या परिप्रेक्ष्यात अतिशय महत्त्वाचे ठरत आहे.

आजच्या माध्यमजगताचे दर्पणाचे कार्य–कर्तव्य हे अंतर्वक्र आरशासारखे, तर दिग्दर्शनाचे कार्य–कर्तव्य बहिर्वक्र आरशासारखे झाले आहे. ही आजची कटु वस्तुस्थिती असून, ह्या वस्तुस्थितीबद्दल त्यात सुस्पष्ट मांडणी झाली आहे. प्रारंभीच्या परिच्छेदांतून माध्यम ही संकल्पना स्पष्ट करत माध्यमांचे प्रकार, त्यांची कामे व कर्तव्ये, त्यांचा इतिहास, मिशन, व्होकेशन व प्रोफेशन ही स्थित्यंतरे आणि तत्संबंधित संकल्पना यांची क्रमवार मांडणी करीत–करीत आजच्या वस्तुस्थितीची भयकंपित करणारी/करू शकणारी वस्तुस्थिती मांडली आहे. त्यामुळे माझ्यासारख्या वाचकांना माध्यमजगताबद्दलच्या माहितीने समृद्ध करण्याचे काम साधले आहे.

संपादकीयात म्हटलेले, 'कोरोनोत्तर कालखंडात सक्षम माध्यमांना अधिक मागणी असणार, हे उघड आहे.' हे विधान मला शंभर टक्के पटले. 'नकारात्मकता, तुच्छतावाद, विरोधाला विरोध, ठोकळेबाजपणा, पोथीनिष्ठता, पूर्वग्रह यांच्यावर स्वनियंत्रण ठेवून मूलभूत भारतीय विचारधारेशी सुसंवाद साधणारी, विश्लेषणापेक्षा संश्लेषणाला प्राधान्य देणारी कार्यप्रणाली अवलंबिणे,' हे आता माध्यमकर्मींना आवश्यक आणि अनिवार्य ठरू लागेल, असेही माझे आकलन आहे.

**लखनसिंह कटरे,** बोरकन्हार, जि.गोंदिया

## तीन पैलू नमदू करणे ही एक विशेष दृष्टी

दि. ३ ऑक्टोबरच्या साधना अंकाचे संपादकीय (बिगरशेतकऱ्यांनो, शेतीविषयीचे आकलन वाढवा) फार गहिऱ्या मुद्यांबाबत मर्मग्राही लक्षवेध करणारे आहे. शेती आणि शेतकरी (सोबतच शेतमजूर) या सर्वांना कवेत घेणारे शेतीक्षेत्र आणि शेतकी समाज याबाबत २००८ पासून आढावा घेत-घेत या क्षेत्राचा मागोवा घेण्याकडे इशारा त्यात केला आहे.

'सर्वाधिक सुख जिथे असण्याची शक्यता आहे, त्या शेती व शेतकऱ्यांची अवस्था कशी आहे' हा मध्यवर्ती मुद्दा छेडला आहे. त्यानंतर, या शेतीक्षेत्राची सद्य:स्थिती, अर्थकारणात स्थान आणि त्या नावाखाली चाललेले राजकारण असे महत्त्वाचे निगडित तीन पैलू नमूद करणे ही एक विशेष दृष्टी (व्हिजन) खुणावते. याचे आकलन, सुटे-सुटे व पुढे साकल्याने समग्रपणे होण्याची निकड आहे, हा कळीचा मुद्दा शेती व बिगरशेती या दोन्ही समाजघटकांकरिता अविभाज्य आहे. त्यातच दोहोंचे हित ('विन-विन') आहे.

या लेखाने संपादकांनी फार मोलाच्या पैलूकडे ध्यानाकर्षण केले आहे. ते विरून जाणार नाही व विस्मृतीत नाहीसे होणार नाही, असे प्रयत्न करू या!

**अशोक बंग,** वर्धा

## निराशेच्या गर्तेत हरवलेलो असताना...

दि.१७ ऑक्टोबरच्या साधना अंकाचे 'डेक्कन कॉलेजचे द्विशताब्दी वर्ष आल्यावर केशवरावांच्या मनात आलेले विचार...' हे संपादकीय वाचले. खरं तर दीडशे वर्षांनंतरही एखादी व्यक्ती ही विद्यमान राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक दुरवस्थेबाबत उद्विग्नपणे रोखठोक विचार मांडते, हे सगळे खरेच कल्पनेपलीकडचे आहे. एके काळी न्याययंत्रणेत काम केलेले, पत्रकारिता केलेले आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपण ज्या डेक्कन कॉलेजमध्ये शिकलो, त्या कॉलेजचे ऋण आणि आत्मीयता एवढ्या वर्षांनंतरही जपली- त्यांच्या या वयातील स्मरणशक्तीचे कौतुक करावे तेवढे थोडेच... 'आपण आगरकरवादी आहात, तर मग मागच्या एक ऑगस्टला टिळकांवर विशेषांक का काढलात?' असा रोखठोक सवाल विचारणाऱ्या केशवराव आजोबांच्या ज्ञानाची आणि प्रतिभेची खोली मोजणे फारच कठीण... सगळ्याच बाबतींत आपण निराशेच्या गर्तेत हरवलेलो असताना, केशवराव आजोबांसारखे खरे दीपस्तंभ आशेचा किरण दाखवत आहेत. अशा अनुभवसंपन्न १५० वर्षांच्या आजोबांची अनुभूती साधनाच्या या संपादकीयामधून दिलीत, याबद्दल मन:पूर्वक आभार.

**ॲड. नकुल पार्सेकर,** सिंधुदुर्ग

## त्या काळातील विचारी माणसांच्या पिढीची शोकांतिका

दि.१७ ऑक्टोबरच्या साधनातील 'डेक्कन कॉलेजचे द्विशताब्दी वर्ष आल्यावर केशवरावांच्या मनात आलेले विचार' हा अग्रलेख खूप आवडला. अग्रलेखातले केशवराव हे शिवरामपंत परांजपे यांच्या शतकापूर्वी लिहिलेल्या लेखातले व्यक्तिमत्त्व आहे, याचा भावनिक व वैचारिक मेळ या अग्रलेखातून अत्यंत हळुवारपणे व तितक्याच सामर्थ्याने व्यक्त होतो. शिवाय शिवरामपंतांच्या लेखातील केशवरावांची तीव्र वेदनाही या अग्रलेखात सहज प्रतिबिंबित होते. यातून देश पारतंत्र्यात जखडलेला होता, त्या काळातील शिवरामपंतांचे दु:ख अधिकच ठळकपणे अधोरेखित होते. सुन्न करणारी ती त्या काळातील विचारी माणसांच्या पिढीचीच शोकांतिका बनून मनात ठसठसत राहते. मग 'साधना'तला हा अग्रलेख व शिवरामपंतांचा लेख वेगळे राहातच नाहीत, तो एक उत्कट अनुभव बनतो!

शिवरामपंतांचा पुनर्मुद्रित केलेला 'डेक्कन कॉलेजकडे पाहून केशव रावांच्या मनात आलेले विचार' हा लेख वाचल्यावर तर या अग्रलेखाची काव्यात्मक उंची आणखीनच वाढते. तसेच अग्रलेख 'असाही लिहिता येतो' याचा एक वेगळाच भावणारा परिपाठ पाहायला मिळतो. यातून संपादकाचा १९ व २० व्या शतकाचा अभ्यास व त्यापलीकडची सखोल दृष्टी हे दोन्हीही दाद देण्याजोगे आहे. तो काळ कल्पकतेने आजच्या काळाशी (समकालीन) जोडला आहे, त्यातले भावनिक नाते मनाला भिडणारे आहे! लाजबाब! खूप आनंद झाला व समाधान मिळाले! संपादकांना विनंती आहे की, शिवरामपंतांचा मूळ लेख व त्यांना लिहावासा वाटलेला हा सर्जनशील अग्रलेख याची प्रक्रिया सांगावी.

**विवेक सबनीस,** पुणे

# वरदान रागाचे

**अरुण गांधी**

अनुवाद

**सोनाली नवांगुळ**

## साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक




पृष्ठे २०८ । किंमत २०० रुपये

महात्मा गांधी यांचे सर्वांत ज्येष्ठ नातू (मणिलाल यांचे चिरंजीव आणि तुषार यांचे वडील) अरुण गांधी वयाच्या ८८ व्या वर्षीही समाजकार्यात सक्रिय आहेत. त्यांचे बालपण व तारुण्य दक्षिण आफ्रिकेत तर नंतरचे आयुष्य भारतातील इंग्रजी पत्रकारितेत गेले. निवृत्तीनंतर ते अमेरिकेत वास्तव्य करीत आहेत. ते वय वर्षे ११ ते १३ या काळात आजोबांच्या सहवासात राहिले, त्याचा सखोल प्रभाव त्यांच्या विचारांवर व कार्यावर राहिला आहे. ते स्वतःला शांती पेरणारा शेतकरी (Peace Farmer) असे संबोधतात. त्यांचे 'Legacy of Love' हे पुस्तक मराठीत 'वारसा प्रेमाचा' या नावाने गेल्या वर्षी साधना प्रकाशनाकडून आले आहे. त्याचाच उत्तरार्ध म्हणावे असे छोटे पुस्तक म्हणजे 'Gift of Anger', त्याचा हा मराठी अनुवाद.

### अनुक्रम

**प्रास्ताविक : आजोबांकडचे धडे**

१. त्यांनी संताप आणि वीज यांची तुलना समोर ठेवली...
२. तोडगा काढणे हे ध्येय असेल तर तो मार्ग योग्य असतो...
३. विक्षिप्तपणाचं त्यांना वावडं नव्हतं, मात्र...
४. गरिबीचं उदात्तीकरण त्यांना करायचं नव्हतं, आणि...
५. शांततामय जगण्याची जास्त जरुरी असते
६. कल्पनांचं वारं आपल्या भवती वाहायला हवं!
७. भौतिक स्थैर्य आणि नैतिकता यांचे संबंध व्यस्त असतात...
८. निम्मं जग कसे दिवस  काढत आहे हे पाहण्याची खिडकी
९. खोटं बोलणं आपल्याला दुबळं करत असतं...
१०. सत्याचे परिणाम भोगणं अधिक चांगलं
११. कुठलीही गोष्ट वाया घालवणं ही विकृतीच
१२. तटस्थ राहण्यातून झालेली हिंसा विनाशकारीच
१३. कमजोरांना अपमानित करणारे खरे छळवादी!
१४. मी चूक करण्याचा बोजा ते उचलत होते...
१५. मुलांना स्वातंत्र्याची ओढ असते...
१६. अहिंसात्मक पालकत्व स्वीकारण्याचा सजग निर्णय
१७. तुमचा अहंकार धगधगता असेल तर...
१८. छळाचा प्रतिकार करण्यासाठी विनयशीलतेचाच उतारा हवा
१९. प्रेमात खूप ताकद असते हे बापूजींना मान्य असलं तरी...
२०. आदर आणि सामंजस्य यांतूनच जग पुढे जाईल...
२१. बापूजींना कुणी मारूच कसं शकतं आई?
२२. नकारात्मक लाटेला सकारात्मक कृती नाहीशी करते
२३. माणसाच्या विनम्रतेतून जखमा बऱ्या व्हायला लागतात...
२४. बदल घडवायचा असेल तर दृष्टिकोन सकारात्मक हवा
२५. बदल घडतात यांवर माणसांचा विश्वास हवा
२६. सन्मान आणि समानता यासाठी लढायला हवं...

**समारोप : सगळ्यांत मोठा आनंद**

**ऋणनिर्देश**

also available at amazon.in

संपर्क

**साधना प्रकाशन** । ४३१, शनिवार पेठ, पुणे ४११०३०

Ph 02024459635 I mediasadhana@gmail.com



लोकवाङ्मय गृहाचा नविन ऐतिहासिक ग्रंथ लवकरच सर्वांच्या भेटीस येत आहे.
रावसाहेब कसबे
गांधी
पराभूत राजकारणी
आणि
विजयी महात्मा
गांधी
पराभूत राजकारणी
आणि
विजयी महात्मा
रावसाहेब कसबे
9657625064
आता
व्हॉटस्‌ॲपवर करा
पुस्तकाचे बुकींग..
खास लोकाग्रहास्तव प्रकाशनपूर्व
सवलत योजनेस ५ नोव्हेंबर पर्यंत मुदतवाढ...
मूळ किंमत :
१०००/– रुपये
प्रकाशनपूर्व
सवलत मूल्य :
फक्त
७५०/ रुपये
(मोफत घरपोच)
सवलत योजनेचा लाभ घेण्यासाठी व पुस्तक खरेदी करण्यासाठी
आजच आमच्या वेबसाईटला भेट द्या..
लोकवाङ्मय गृह
www.lokvangmaybooks.com
संपर्क : (022) 24362474 / 24376042 / 9664951922

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP- 6 /31-12-2020
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/2018-2020
Posted at PUNE PSO GPO 411001 / EveryThursday, Date of Posting : 22-10-2020 / Date of Publication : 22-10-2020

# ३१ ऑक्टोबरला प्रकाशित होणार...

## साधना साप्ताहिकाचा बाल-कुमार

### दिवाळी अंक २०२०

**पृष्ठे ४४ (संपूर्ण बहुरंगी)**
**किंमत : ४० रुपये, सवलतीत २० रुपये**
(२५ वा अधिक प्रती घेतल्या तर)

## साधना साप्ताहिकाचा युवा

### दिवाळी अंक २०२०

**पृष्ठे ६० (संपूर्ण बहुरंगी)**
**किंमत ५० रुपये, सवलतीत ३० रुपये**
(२५ वा अधिक प्रती घेतल्या तर)

प्रिय वाचकहो,

कोरोना कालखंड असल्याने आणि शाळा महाविद्यालये अद्याप सुरू न झाल्याने, या वर्षी बालकुमार व युवा दिवाळी अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणी मोहीम राबवण्यासाठी व वितरणासाठी सर्वच स्तरांवर अडचणी आहेत. हे लक्षात घेऊन आपणास अशी विनंती आहे की, पुढील तीनपैकी एक पर्याय आपण अवलंबावा आणि वाचनसंस्कृती विकसित करण्यासाठीच्या या उपक्रमात सहभागी व्हावे.

**पर्याय १ :** आपण स्वतः किंवा आपणाशी संबंधित संस्था/संघटना यांनी हे अंक शक्य तितके जास्त खरेदी करावेत आणि आपला गाव/परिसर/सोसायटी किंवा जवळपासच्या मुला-मुलींना हे अंक भेट म्हणून द्यावेत.

**पर्याय २ :** आपण हे अंक खरेदी करावेत आणि मुला-मुलींशी ज्यांचा संबंध येतो असे शिक्षक/कार्यकर्ते/डॉक्टर। सोसायटीचे पदाधिकारी/रिक्षाचालक/दुकानदार इत्यादी घटकांकडे द्यावेत आणि ‘तुमच्या संपर्कातील मुला-मुलींना हे अंक भेट द्या’, अशी विनंती करावी.

**पर्याय ३ :** वरीलपैकी दोन्ही पर्याय शक्य नसतील तर काही रक्कम साधना कार्यालयाकडे पाठवावी, आम्ही त्या रकमेतून येणारे अंक ग्रामीण व दुर्गम भागातील मुला-मुलींपर्यंत तुमच्या वतीने भेट म्हणून पाठवू...

या वर्षीच्या बालकुमार अंकात, भारतातील सहा राज्यांतील सहा बालकुमारांच्या कर्तबगारीच्या खऱ्या-खुऱ्या गोष्टी आहेत.
(अधिक तपशील पुढील अंकात)

या वर्षीच्या युवा अंकात, भारतातील व विदेशातील अशा सहा कर्तबगार युवकांच्या दीर्घ मुलाखती आहेत.
(अधिक तपशील पुढील अंकात)

संपर्क **साधना साप्ताहिक**
४३१, शनिवार पेठ, पुणे ४११०३०
Ph : 02024451724, Mob : 70282 57757 weeklysadhana@gmail.com
प्रकल्प व्यवस्थापक : **गोपाळ नेवे** Mob. 9421702841